# माणसें तत्त्वें आणि वाहाणा



बाळशंकर देशपांडे

१८६५.
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८६५
REFBK-0014368

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ४०५८७ वि: नि.बंध
क्रमांक १६६५ नों. दि. २३।५।६८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ४०३६८
संदर्भ शाखा (स्थलप्रत)

REFBK-0014368

# माणसे, तत्वे आणि वहाणा

( विनोदप्रचुर ललित निबंध )

बालशंकर देशपांडे

किंमत चार रुपये

श्रीराम प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २.

प्रकाशक :

सौ. जानकीबाई भावे,
श्रीराम प्रकाशन,
ठाकुरद्वार, मुंबई २

□ □

सर्वाधिकार :
सौ. पद्मावती देशपांडे

□ □

डिसेंबर १९६५

□ □

किंमत चार रुपये

□ □

मुद्रक :

पुरुषोत्तम विष्णु वेहेरे,
मेनका मुद्रणालय,
५६० नारायण, पुणे २

चिकित्सा आणि चिरफाड यांच्यातला भेद माझे मित्र श्री. ब. ना. जोग ( माजी संपादक विवेक ) व श्री. द. का. हसबनीस ( संपादक-सुदर्शन ) यांना चांगल्या प्रकारे ओळखता येतो. म्हणूनच त्यांच्यातला 'संपादक' माझ्या अल्पस्वल्प लेखनाचे कोडकौतुक करू शकला. या कृतज्ञतापूर्वक जाणीवेने उभयतांना सादर समर्पण.

—बालशंकर देशपांडे

अनुक्रम

१. माणसे, तत्त्वे आणि वहाणा !
२. गुरुकिल्ल्यांचा जुडगा
३. तीळ—काव्यातला आणि गद्यातला
४. फुंकर
५. उसनी वेदना
६. नवा अर्थ
७. चक्रवाकाची व्यथा
८. कानपूरचे ते श्रोते
९. अमृताचे कल्लोळ
१०. रिकामा हौद
११. बहु असोत सुंदर ...
१२. स्वप्नभूमि
१३. एकला चलो रे
१४. सतरंजी का कपडा था
१५. आकाशदिवे
१६. नैवेद्याची वाटी
१७. नेणीवेतली जादू
१८. वर्तुळातले प्रवासी
१९. टिपटॉप हॉटेल
२०. सुभद्रेचा शालू
२१. मोठेपणाची मूल्ये
२२. फुकटेगिरी
२३. ठोकून देतो ऐसा जे !
२४. खलनायक
२५. विश्वसुंदरी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४३५८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# १. माणसें; तत्त्वें आणि वहाणा !

अनपेक्षित धक्का देण्याच्या बाबतीत पाऊस, पोस्टमन आणि परीक्षक यात पहिला क्रमांक कोणाचा लागतो हे ठरविणं कठीण आहे! लघुकथेच्या शेवटी वाचकांना विस्मयाचा, आनंदाचा किंवा दुःखाचा धक्का देण्याचं कौशल्य ओ. हेन्रीनं या तिघांना गुरु करूनच आत्मसात् केलं असावं असं मला कधी कधी वाटतं !

सारं आभाळ निरभ्र झाल्यासारखं वाटून रेनकोट किंवा छत्री न घेताच घराबाहेर पडावं अन् तोच हातून घडलेल्या या प्रमादाबद्दल सचैल स्नानाचं प्रायश्चित्त घेण्याची पाळी यावी, असं कितीतरी वेळा माझ्या अनुभवास आलं आहे !

पुरुषांची अंगे जलधारांनी भिजवून शृंगाराऐवजी हास्यरसाची निष्पत्ति करणारा पाऊस अनपेक्षित दुःखाचा धक्का देण्यातहि असाच पटाईत आहे ! मृगानंतरची पहिली दोन–तीन नक्षत्रं वेळच्या वेळीं पाऊस पडून चांगली मनाजोगती जावीत, मातेच्या मधुर स्तन्यानं बाळसं धरणाऱ्या बालकाप्रमाणे वर्षाधारांखाली पिकं वाढीस लागावीत, तोच कायमची उघडीप पडून ढगांबरोबर माणसाच्याहि तोंडचं पाणी पळून जावं–ही शोकान्तिका कुणाच्या परिचयाची नाही ?

माणसाचा अपेक्षाभंग करणारं हे तंत्र पावसाइतकंच पोस्टमनला चांगलं अवगत आहे यांत शंका नाही. मनिऑर्डरीकडे डोळे लावून बसावं अन् प्रत्यक्षात मनिऑर्डरीऐवजी व्ही. पी. नाहीतर लठ्ठ नॉटपेड पत्र टपालवाल्यानं आणून द्यावं, किंवा प्रेयसीच्या प्रेमपत्राची उत्कंठेनं प्रतीक्षा करावी आणि विम्याचा हप्ता

भरण्याविषयी आठवण करून देणारं पत्र हाती पडावं—अशा प्रकारची मानवी स्वप्नांना अनपेक्षित कलाटणी देणारी पोस्टमनची ही कलात्मक लघुकथा—लेखकांच्या गुरुस्थानी शोभण्यासारखी नाही तर काय ?

पोस्टमन अन् पाऊस यांच्या प्रमाणेच प्रश्नपत्रिका काढणाऱ्या परीक्षकाचा पिंडहि विस्मयाचा धक्का देणाऱ्याच्या जातीचा आहे हे कोणताहि विद्यार्थी सांगू शकेल. बुद्धाची तत्त्वं घोकून ठेवावीत पण परीक्षेत ठगांच्या बंदोबस्ताविषयी माहिती विचारली जावी, किंवा सतीच्या चालीचा इतिहास वाचून काढावा पण निजामाच्या जनानखान्यावर प्रश्न यावा असं शालेय जगतात किती तरी वेळा घडत असतं ! परीक्षकाच्या या लहरी स्वभावाची धास्ती घेऊन माझा एक मित्र मराठीच्या परीक्षेच्या वेळीं मालिनी वृत्ताबरोबर मकर वृत्ताचीहि माहिती लक्षात ठेवीत असे आणि भूमितीची तयारी करताना व्यासाच्या अठरा पुराणांची नांवे मुखोद्गत करीत असे !

पण परीक्षक, पोस्टमन आणि पाऊस या तिघांवरहि ताण करणारी एक गोष्ट जगात आहे हे तुम्हाला ठाऊक आहे का ? देव, वृत्तपत्रांतली कोडी, लाऊडस्पीकर, खाजगी मोटार सर्व्हिस, गवई...अशी एकामागून एक भराभर नांवं तुम्ही सुचवाल. पण मनुष्याला अनपेक्षितपणाचा धक्का देण्यात वहाणेइतकी दुसरी कोणती गोष्ट वस्ताद असेल असं मला वाटत नाही ! !

घाईघाईनं चार घास पोटात ढकलून बस अगर लोकल पकडण्यासाठी झपझप पावलं टाकीत निघावं तोच वहाणेचा अंगठा तुटून पावलं आणि मति कुंठित व्हावी हा मुंबईकरांच्या नित्याच्याच परिचयातला अनुभव आहे !

हल्ली मुंबईत दिवसाढवळ्या पोलिसांच्यादेखत खून—चोऱ्यांसारखे गुन्हे करून गुन्हेगार फरारी होत असल्याच्या बातम्या दररोज ऐकावयास मिळतात. पोलीस खात्यात वाढलेलं लांचलुचपतीचं प्रमाण या ढिलाईच्या मुळाशी असावं असा काहीजणांचा समज आहे. पण लाचलुचपतीपेक्षा पोलिसांना हल्ली देण्यात येत असलेल्या पठाणी किंवा कोल्हापुरी वहाणाच या वाढत्या गुन्हेगारीच्या मुळाशी असाव्यात असं माझं स्पष्ट मत आहे ! गुन्हेगाराचा पाठलाग करता करता अवचितपणे वहाणेची पट्टी किंवा अंगठा तुटून पोलीसांच्या कर्तव्यपालनात व्यत्यय येत असला तर कोणतं नवल ?

त्या दिवशी अपोलो बंदरवर फिरावयास गेलो असता आकस्मिकपणे माझ्या

वहाणेचा अंगठा तुटल्याचं लक्षात आलं. जवळपास एकहि चांभार बसलेला दिसत नव्हता. माझ्याजवळ पिशवी किंवा एखाद्या वर्तमानपत्राचा अंक असता तर त्यात वहाणा गुंडाळून मी चार–चौघांदेखत होऊ घातलेली फजिती कशीबशी टाळली असती. पण...! वहाणांऐवजी लाजलज्जा, भीडमुर्वत यांनाच गुंडाळून ठेवून जनसंमर्दासमोर मी आपल्या फजितीचं प्रदर्शन करावं असा विधिसंकेत होता की काय कोण जाणे !

पण काही केल्या हातात वहाणा घेऊन सुशिक्षित, फॅशनेबल स्त्रीपुरुषांसमोरून जाण्यास माझं मन राजी होईना ! प्रेमभंगाची कटुता आणि यतिभंगाची हास्यास्पदता असं दोन्हीचं विचित्र मिश्रण त्या वेळच्या माझ्या मनःस्थितीत सामावलं होतं ! प्रेमभंगाच्या दुःखानं आत्महत्या करणाऱ्या प्रेमवीराला अंतकाळच्या चार–दोन घटकाच काय त्या दुःसह वाटत असतील; पण वहाणा तुटल्यामुळं मेल्यापेक्षाहि मेल्यासारखं झालेल्या माझ्यासारख्या फजितखोराला उघड्या डोळ्यांनी मरणाची भीषणता पाहावी लागते. ‘ मग महा भयंकर नार–। सिंह तो प्रगटला संरक्षावया ॥ ’ अशा प्रकारे भलत्याच ठिकाणी झालेल्या यतिभंगानं रसिकांना येणारं हसू पहायला खुद्द कवीचा तिथं पत्ता नसतो, पण नको त्या ठिकाणी वहाणा तुटल्यामुळं आजूबाजूच्या स्त्री–पुरुषांच्या गालाला ज्या मिस्किल खळ्या पडतात—खळ्या कसल्या ? फजित पावलेल्याला गारद करू पाहणारे खड्डेच ते—त्या पाहतांना जीव गुदमरून गेल्यावाचून रहात नाही !

रस्त्यातच वहाणा फेकून देऊन पसार व्हावं अन् घरी गेल्यावर त्या चोरीला गेल्याची पत्नीला थाप द्यावी असं एक वेळ मला वाटलं ! बाकी मिथ्या भाषण केल्याबद्दल स्वर्गारोहणाच्या वेळी धर्मराजाचा अंगठा गळला, पण अंगठा तुटल्यामुळं खोटं बोलावं लागण्याचं हे पहिलंच उदाहरण असावं, अशी मनात कल्पना येऊन मला हसू आलं. पण दुसऱ्या क्षणी मी असा विचार केला, चांदीच्या चमच्याऐवजी हातात खडू घेऊन जन्माला आलेल्या माझ्यासारख्या शाळामास्तरनं नव्या करकरीत वहाणा फेकून द्यायच्या... छे : ! छे : ! ‘ लहरीपणाच्या बाबतीत राजा, कवि आणि मूल यांच्याऐवजी वेड्या महंमदाशीच ह्याचं नातं अधिक जवळचं आहे ’ अशी टीका करायला उद्या लोक कमी करणार नाहीत !

वहाणा फेकून देण्याची कल्पना मी डोक्यातून काढून टाकली आणि त्या तशाच हातात वाळगीत घरी गेलो.

तसं पहायला गेलं तर स्वतःला प्रिय असलेली तत्त्वं प्रतिष्ठेच्या, अहंकाराच्या किंवा स्वार्थाच्या आड आल्यावर त्यांना बिनदिक्कतपणे बाजूला सारणारी माणसं माझ्यावरहि ताण करीत नाहीत का ?

शकुंतलेसारखं कन्यारत्न टाकून देणारा विश्वामित्र किंवा दैत्यकुळातील देवयानीच्या प्रेमाचा अव्हेर करणारा कच यांच्यात आत्मप्रतिष्ठेविषयीचाच लोभ बळावला नव्हता का ? प्रल्हादाला छळणाऱ्या हिरण्यकश्यपूनं आपल्या अहंकाराची बूज राखण्यासाठीच पितृसुलभ वात्सल्याला तिलांजली दिली नाही का ?

वेळी–अवेळी समतेचा उद्घोष करणाऱ्या माझ्या एका मित्राचा कनिष्ठ जातीतील एका मुलीशी परिचय झाला. त्या बिचाऱ्या मुलीला हा समतेचा पाईक आपणाबरोबर लग्न करील अशी आशा वाटत होती; पण—!

नाटक–कादंबऱ्यात परिचयानं लग्न होत असली तरी व्यवहारात अतिपरिचया-पासून अवज्ञाच वाट्याला येते हे कटु सत्य तिला अनुभवानं शिकावं लागलं ! उच्चवर्णीय, श्रीमंत घराण्यातील मुलगी सांगून येताच या समतेच्या पुरस्कर्त्यानं आपल्या पहिल्या प्रेयसीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या ! !

आई–बापाला विठ्ठल–रखुमाईच्या ठिकाणी समजणाऱ्या माझ्या ओळखीच्या दोन भावात वाटण्या झाल्या तेव्हा टीनचे पत्रे, कडब्याच्या पेंड्या अन् धुणी वाळत घालण्याच्या काठ्या या वस्तूबरोबर जन्मदात्या नगांचीहि वांटणी झाली आणि पंढरीला दोन निरनिराळ्या देवळात उभ्या असलेल्या विठ्ठल–रखुमाईची उपमा पूर्णोपमा असल्याचं सिद्ध केलं !

लोकजागृतीचं प्रतिज्ञा–कंकण बांधून वृत्तपत्रव्यवसायात पडलेल्या माझ्या एका संपादक मित्राचं उदाहरणहि असंच मासलेवाईक आहे ! ‘ केसरी ’चा जहालपणा, ‘ काळ ’ पत्रातला आवेश आणि ‘ नवाकाळ ’ची ध्येयनिष्ठा या तिन्हीचाहि आपल्या संपादकीय जीवनात समन्वय झालेला लोकांना पहावयास मिळेल असं बापड्याला प्रथम वाटलं होतं. पण लवकरच त्यानं आपल्या पत्रात शब्दकोड्याचा धंदा सुरू केला आणि टिळक, परांजपे नि खाडिलकर यांच्या

गुणविशेषाऐवजी सटोडिया, रेसबाज आणि लॉटरीवाला यांच्या जुगारी वृत्तीचा आपल्या ठिकाणी परिपोष झाल्याचं दाखवून दिलं ! !

अधिकार-मदानं धुंद होऊन लोकशाहीच्या तत्त्वाला हरताळ फासणारे मंत्री, गल्ल्यावर नजर ठेवून सीता-द्रौपदीला उघड्या गळ्याचे ब्लाऊज-जंपर लेववविणारे दिग्दर्शक, सवंग लोकप्रियतेखातर सद्भिरुचीचा खून पाडणारे लेखक, सौंदर्याच्या जोपासनेसाठी अघोरी औषधी गिळून स्त्रीसुलभ मातृत्वाला नख लावणाऱ्या ललना—

या सर्वांची ' आडवे आल्यावर कापून काढण्याची ' वृत्ति पाहिली म्हणजे प्रतिष्ठेपायी नव्या वहाणा फेकून देऊ पाहणारा माझा लहरीपणा अगदीच मवाळ वाटतो ! !

★

वसंत : दिवाळी अंक, १९५९

## २, गुरुकिल्ल्यांचा जुडगा

त्या दिवशी दिगूअण्णा ऑफिसमधून घरी परत आले ते चांगली सहा-सात लठ्ठ लठ्ठ पुस्तकं काखोटीला मारूनच. ' सुखी संसाराची गुरुकिल्ली ', ' संसार-सौख्याचे रहस्य ', ' यशस्वी जीवनाचा वाटाड्या ', ' यशाचा कानमंत्र ' वगैरे पुस्तकांची नावं वाचताना मी हसत हसत त्यांना म्हणालो, ' अबब, दिगूअण्णा ! तुम्ही तर गुरुकिल्ल्यांचा चांगला जुडगाच आणला आहे की आपल्याबरोबर ! '

' थट्टा करण्यासारखी गोष्ट नाही देशपांडे, पुस्तकावरले हे अभिप्राय वाच म्हणजे त्यांची योग्यता कळून येईल तुला. '

दिगूअण्णांच्या सूचनेप्रमाणं मी एकेका पुस्तकाच्या वेष्ठनावरला अभिप्राय वाचू लागलो. त्या पुस्तकाविषयी माझं अनुकूल मत बनण्याऐवजी हसू मात्र येऊ लागलं.

भागोजी दौंडे नावाच्या इसमानं लिहिलं होतं, ' आमच्या सौंसाराच्या घोड्याला आपल्या ग्रंथाचा ( पुस्तकाचा ) खरारा मिळाल्याबरोबर त्याच्यात एक नवीनच तरतरीयुक्त चैतन्यत्वपणा संचरून तो जीवनाच्या मार्गावरून पंजाबमेल-प्रमाणं ( आमची उपमा कोणाला अतिशयोक्तिमय वाटल्यास विद्युल्लतेप्रमाणं ) धावू लागला... '

वर्तमानपत्रात अशीलातर्फे नोटिसा देणाऱ्या एका वकिलानं म्हटलं होतं, ' तमाम वाचकांना आम्ही असे कळवू इच्छितो की आपण सुखात असाल किंवा दुःखात असाल किंवा दोन्हीचा थोड्या प्रमाणात अथवा फार प्रमाणात किंवा पहिल्याचा फार प्रमाणात व दुसऱ्याचा थोड्या प्रमाणात अनुभव घेत असाल की ज्यामुळे तुमच्या मनःस्वास्थ्यावर अनुक्रमे इष्ट व अनिष्ट अर्थात्

अनुकूल व प्रतिकूल परिणाम होणे शक्य होणार नाही असे म्हणता येणार नाही त्यांनी हे पुस्तक वाचल्यास पहिल्या प्रकारच्या लोकास ( म्हणजे सुखी ) किंवा दुसऱ्या प्रकारच्या लोकास ( म्हणजे दुःखी ) अथवा दोन्ही प्रकारच्या लोकास ( म्हणजे सुखी व दुःखी ) असे आढळून येईल की...'

अभिप्रायांची भाषा कुणालाहि हसू येईल अशा प्रकारची होती हे तर खरंच, पण ते वाचीत असताना मी हसत होतो ते केवळ भाषेमुळं नव्हे! भाषेपेक्षाहि माणसाला यशाचा अचूक मार्ग दाखवायला सिद्ध झालेल्या लेखकाच्या साहसाचं अन् त्यावर डोळे मिटून श्रद्धा ठेवणाऱ्या दिगूअण्णा-सारख्या भाबड्या वाचकांचं!

× × ×

एका लेखकाच्या मते वक्तशीरपणा हाच जीवनाच्या यशस्वितेचा एकमेव मार्ग होता, तर दुसऱ्या एका लेखकानं विनोदबुद्धीच्या बळावर माणसाला कोणत्याहि क्षेत्रात यशस्वी होता येईल अशी हमी दिली होती. तिसऱ्यानं एरंडेल, शीर्षासन आणि कडुलिंबाचा पाला या त्रयीच्या आश्रयानं मनुष्याला सुखी होता येईल असा विश्वास व्यक्त केला होता. तर चौथ्या लेखकानं संगीत, नृत्य, शिल्प, चित्र किंवा लेखन यापैकी कोणत्या तरी एखाद्या कलेची सेवा करून मनुष्याला सुखी होता येईल असा आशावाद प्रकट केला होता.

लेखकांच्या मतांना विरोध करण्याचं किंवा त्याना हसण्याचं वस्तुतः मला काहीच कारण नाही. आपापल्या अनुभवावरून त्या त्या लेखकांनी जी जी मतं व्यक्तविली होती, सुखी होण्याचे जे जे उपाय सुचविले होते त्याविषयी अविश्वास दाखविण्याचंहि मला काही कारण नाही; उलट निरनिराळ्या लेखकांनी अनुसरलेले निरनिराळे मार्ग त्यांना सुखाकडे अन् यशाकडे नेण्यास कारणीभूत झाले असतील हे मी मान्य करतो; पण माझं म्हणणं एवढंच की हे सारे उपाय, सारे मार्ग त्या त्या लेखकापुरतेच उपयोगी म्हणून समजायला हवेत. एकाच्या मापावरून घेतलेला कोट दुसऱ्याला 'फिट' बसेलच अशी कशी खात्री देता येईल?

पण हा साधा विचार दिगूअण्णांच्या डोक्यात शिरू शकला नाही आणि त्यामुळं त्यांचं हसं मात्र झालं!

वक्तशीरपणा हीच जीवनाची गुरुकिल्ली मानून ते घड्याळाच्या काट्याबर-

हुकूम वागू लागले तेव्हा त्यांना पदोपदी फजित व्हावं लागलं. काही मित्रांच्या आग्रहाखातर त्यांनी एका गवयाचं गाणं आपल्या घरी करायचं ठरविलं. बुवा तंबोऱ्याच्या तारा स्वरात मिळवू लागले तेव्हा दिगूअण्णा त्यांना म्हणाले, 'हे पहा बुवा! मी आहे वक्तशीर माणूस. पांच मिनिटात तारा जुळवणं, पांच मिनिटात आवाज लागणं, पंधरा मिनिटं आलापी, दहा मिनिटं ताना अन् तेवढीच मिनिटं संगीतातल्या इतर काय भानगडी असतील त्यासाठी—याप्रमाणं प्रत्येक चीज झाली पाहिजे!'

दिगूअण्णांची ही 'फर्माईश' ऐकून बिचाऱ्या बुवांना वेगळ्याच अर्थानं गळा काढण्याची इच्छा झाली तर त्याचं नवल वाटायला नको!

विनोदबुद्धीच्या बाबतीतहि दिगुअण्णांना असाच चमत्कारिक अनुभव आला. विनोदानं जीवनातली दुःखं सुसह्य होतात, त्यांची तीव्रता कमी होते, विनोदामुळं दुसऱ्यावर छाप पाडता येते वगैरे मतं त्यांच्या वाचनात आल्यापासून ते घराबाहेर पडतांना कोटाबरोबर कोट्याहि बरोबर घेऊं लागले! पण पहिल्याच दिवशी त्यांनी केलेली कोटी कशी अंगलट आली याची मजेदार हकीगत त्यांच्याच तोंडून ऐकायला हवी!

त्या दिवशी पोस्टात पाऊल टाकताच दिगुअण्णांच्या कानावर बातमी आली की त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या बायकोला पुरते दिवस भरण्यापूर्वीच मूल झालं आहे. झालं! त्या अधिकाऱ्याला भेटून ते हसत हसत म्हणाले, 'काय साहेब, 'एक्स्प्रेस डिलीव्हरी' वाटतं!' इतक्यात कुणीतरी मध्येच म्हटलं, 'ठाऊक आहे अण्णा, ही काही तुमची कोटी नव्हे! कुठं तरी यापूर्वीच मी वाचली आहे.' थोड्या वेळानं दुसरा एक कारकून दिगुअण्णांना एकीकडे नेऊन म्हणाला, 'अण्णा, साहेबांपुढं कसला भयंकर विनोद केलात तुम्ही. आजची धरून असल्या सहा 'केसेस्' झाल्या आहेत साहेबांच्या घरांत अन् त्यापैकी साऱ्याच्या साऱ्या दगावल्या?'

'आरोग्य हीच जीवनाची खरी गुरुकिल्ली आहे' हे एका ग्रंथकाराचं मत दिगुअण्णांना पटलं. त्या क्षणापासून 'पोटाचे व्यायाम,' 'कड्लिंब आणि आरोग्य,' 'टरफलांतली जीवनसत्त्वे' इत्यादि ग्रंथ त्यांच्या उशापायथ्याशी सदैव विखुरलेले दिसून येऊ लागले. त्यांच्या बैठकीतील भिंतीवर टिळक, आगरकरादिकांचे फोटो होते, त्यांच्या जागी आता इमामबक्ष, राममूर्ति वगैरे

मल्लांच्या तसबिरी लटकू लागल्या, ॲनी बेझंटबाईची जागा हमिदाबानूनं पटकाविली. आणि कपाटातील शोभेच्या वस्तूंच्या ठिकाणी मुद्गलाची जोडी, फरीगदगा, दंड काढण्याचे ठोकळे इत्यादि उपकरणं विराजमान झाली.

पण ही झाली दिगूअण्णांच्या आरोग्यसाधनेची वस्तुनिष्ठ बाजू. त्यांनी नव्यानं आरंभलेल्या बलोपासनेची 'तात्त्विक' बाजू मोठी करुणास्पद आहे. कुठलंहि आसन करताना त्यांच्या मानेतली शीर नाहीतर पाठीचा कणा लचकून ते बजरंगबलीच्या कृपादृष्टिऐवजी खोडानी नाही तर गिडवानी डॉक्टरांच्या निगराणीखाली दोन-दोन, तीन-तीन आठवडे दवाखान्यात पडू लागले. एक दिवस गार पाण्यानं स्नान केलं की चार दिवस छातीवर ॲंटिफ्लोजेस्टिनचा लेप लावून पोस्टात जाऊ लागले, आणि एक दिवस 'जीवनसत्वयुक्त' आहार घेतला की तीन दिवस हिंगाष्टकयुक्त भातावर राहण्याचा त्यांच्यावर प्रसंग ओढवू लागला.

कलेची सेवा हे मानवी जीवनसौख्याचं सर्वात प्रभावी साधन असल्याचा दिगूअण्णांना साक्षात्कार झाला तेव्हाहि अशीच फजित होण्याची त्यांच्यावर पाळी आली. त्यांनी फलकावर रंगविलेला उषःकाल त्याच्या मुलांनी लाल भोपळा समजून कितीहि वाखाणला असला आणि त्यांच्या 'वर्षाकालीन मेघपंक्तींनी' मुंबई उपनगरांतल्या तवेल्याचं प्रतिमान असल्याचा नवचित्रकारांच्या मनात केवढाहि आभास उत्पन्न केला असला तरी खुद्द दिगूअण्णांना कलेच्या क्षेत्रातली असली फसवाफसवी बिलकूल मान्य नव्हती. आपण हास्यवदन ललनेची शुभ्र दंतपंक्ति रंगविली तर ती दंतपंक्ति म्हणूनच ओळखली जावी, तिला कुणी बाजाच्या पेटीचे स्वर समजू नये आणि तबल्याची पुडी रंगविली तर तुळतुळीत डोक्याचा संजाब म्हणून कुणी आपला ग्रह करून घेऊ नये अशी त्यांची कलेच्या बाबतीत नम्र महत्त्वाकांक्षा होती. पण ती कधी काळी फलद्रूप होईल अशी त्यांना आशा वाटेना, तेव्हा त्यांनी यशस्वी जीवनाचं इंगित सांगणाऱ्या दुसऱ्या ग्रंथकारांकडे धाव घेतली.

बिचारे दिगूअण्णा! ग्रंथ हे आपले गुरु होत असं म्हणून ठेवायची कुठून आपणाला बुद्धि झाली असं लोकमान्यांच्या आत्म्याला दिगूअण्णांचं वर्तन पाहून खात्रीनं वाटत असलं पाहिजे!

× × ×

जीवनाचा मार्ग पुस्तकी ज्ञानापेक्षा स्वानुभवाच्या प्रकाशातच चोखाळायला हवा हे दिगूअण्णांना जसं उमजू शकलं नाही तसं माझ्या अवतीभवतीच्या कितीतरी जणांना जीवनाच्या यशस्वितेचं मर्म उमगलं नाही.

राजकारण, युद्ध, प्रेम, व्यापार असल्या विषयावरील ग्रंथ वाचून का कुठं त्यात मनुष्याला आपली प्रगति करून घेता येत असते? पोहण्याचे नियम तोंडपाठ न करता पोहणारा जसा चार वेडेवाकडे हात पाण्यात मारून त्या कलेत नैपुण्य संपादन करतो, अष्टविधा नायिकांची लक्षणं समजावून घेण्यापूर्वीच स्वरूपसुंदर ललना उपजत प्रेरणेनं विलोलविभ्रमांनी आपल्या वल्लभांची अंतःकरणं विद्ध करतात तसं दुसऱ्यांच्या अनुभवाच्या शिदोरीकडे आशाळभूतपणानं न पाहता जन्मजात संस्कारांच्या नि स्वानुभवाच्या पाथेयावर विसंबून राहूनच माणसानं जीवनाची वाटचाल करावयास हवी.

पण आज पहावं तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत स्वानुभवाऐवजी पुस्तकी ज्ञानाचाच बडेजाव अधिक माजवण्यात येत आहे.

कोणी संपत्ति मिळविण्याच्या सुलभ उपायावर ग्रंथलेखन करतो, कोणी मित्र जोडण्याच्या कलेचे नियम सांगतो, कोणी प्रेम कसं करावं यावर चार-दोनशे पानं लिहितो तर कोणी लेखनकलेचं तंत्र आणि मंत्र निवेदन करतो.

या सर्व विषयासंबंधी काही लिहिलं जाऊं नये किंवा तसा कोणाला अधिकार नाही असं मला चुकूनहि सुचवावयाचं नाही. असल्या प्रकारच्या ग्रंथाची उपयुक्तता मी मान्य करतो, पण ती एका विशिष्ट मर्यादेपर्यंत. त्यापलीकडे ज्यालात्याला आपापला अनुभवच योग्य तऱ्हेनं मार्गदर्शन करण्याच्या कामी उपयोगी पडू शकतो असा माझा दावा आहे. तसं नसतं तर मग हजार पाकक्रियांवरील पुस्तकं वाचून घरोघर सुग्रणी, नि अध्यापन शास्त्रावरील ग्रंथ वाचून शाळेशाळेतून आदर्श शिक्षक निपजलेले दृष्टोत्पत्तीस आले नसते का?

पाकक्रियेवरून सहज एक गमतीची गोष्ट आठवली. कोणत्याशा नभोवाणीकेंद्रावरून म्हणे पाकशास्त्रविषयीचे पाठ नित्यनेमाने देण्यात येत असत. एक सुशिक्षित महिला ते सारे पाठ मनापासून स्वतःच्या रेडिओवर ऐकत असे. एके दिवशी थालीपीठ लावण्यासंबंधीची माहिती रेडिओवरून दिली जात होती. भाजणीच्या पिठाचा घट्ट गोळा भिजवून त्याची लहान लहान गोल आकाराची थालिपीठं थापावीत; नंतर सरळ ताठ उभे राहून, आस्तेआस्ते वाकून दोन्ही

हातांची बोटे जमिनीवर टेकवावीत; पातेल्यात दोन पळ्या तेल ओतावे; नंतर डावा पाय व उजवा पाय क्रमाक्रमाने मागे न्यावा व हळूहळू सारं शरीर जमिनी-कडे झुकवावं; मात्र तेल तापण्यापूर्वीच...'

इथपर्यंत त्या महिलेनं साऱ्या क्रिया बिनबोभाटपणे, एखाद्या श्रद्धाळू भक्ता-प्रमाणे पार पाडल्या, पण तिची चिकित्साबुद्धि मध्येच एकाएकी कशी जागी झाली कुणास ठाऊक, ती साशंक मनानं रेडिओजवळ गेली तेव्हा तिला ऐकू आलं—'

'आम्ही दैनंदिन व्यायामासंबंधीचा पाठ नागपूर नभोवाणीच्या केंद्रावरून देत आहोत.'

त्या स्त्रीला आत्ता कळलं की आपल्या रेडिओत कुठं तरी बिघाड होऊन नागपूर अन् पुणे केंद्राच्या ध्वनिलहरी आलटून पालटून आपल्या कानांवर येत आहेत!!

यातला अतिशयोक्तीचा भाग सोडून देऊ आपण, पण ज्ञानसंपादनाच्या मुळाशी कित्येक वेळा जो भाबडेपणा, जी अंधश्रद्धा दृष्टीस पडते ती या चुटक्यात मोठ्या खुबीनं ध्वनित केली आहे यात शंकाच नाही.

अध्यापनाच्या क्षेत्रांतहि असली सांगितल्या बुद्धीची प्रात्यक्षिकं प्रत्यही नजरेस येत आहेत. अध्यापन हे शास्त्र आहे हे जितकं खरं, त्याहूनहि ती कला आहे हे अधिक खरं. आणि कला म्हटली की ती पुस्तकी ज्ञानापेक्षा स्वानुभवावर जोपासली जावयास हवी हे ओघानं आलंच.

पण आज अध्यापनाच्या क्षेत्रात कोणतं दृश्य दिसून येतं? प्रस्तावना, हेतु-कथन, प्रतिपादन, पुनरावृत्ति इत्यादि ठोकळेबाज, तंत्रविषयक मुद्यांच्या कुबड्या घेऊन अध्यापनक्षेत्रातली उत्तुंग शिखरं गाठण्याची बिचाऱ्या अध्याप-कांची केविलवाणी धडपड चालू आहे.

आणि मग या खटाटोपाला यायचं तेच फळ येणार!

'आग्र्याहून सुटके'चा पाठ शिकविताना प्रस्तावनेदाखल मिठायांच्या प्रकाराची चर्चा करणं आणि गृहपाठादाखल मिठाई, विठाई, धिटाई अशा-सारखे नादसादृश्य असणारे शब्द हुडकून काढण्याचा अभ्यास देणं, भास्करराव तांब्यांची 'मधुघट' कविता शिकविल्यावर 'समवाय' पद्धतीच्या मुद्याशी इमान राखण्याच्या हेतूनं कुंभाराच्या व्यवसायाचा मुद्दा उपस्थित करून

विद्यार्थ्यांकडून त्यासंबंधींची उत्तरं काढून घेणं वगैरे हास्यास्पद प्रकार असल्या खटाटोपाच्या पोटीच जन्माला यायचे.

'देअर इज मेथड इन् मॅडनेस' असं हॅम्लेटच्या तोंडी शेक्सपीयरनं एक वाक्य घातलं आहे. आजच्या गुरुमाऊलींच्या अध्यापनपद्धतीकडे पाहू लागलो म्हणजे, 'देअर इज मॅडनेस इन् मेथड' असं त्यात थोडा बदल करून म्हणावंसं वाटतं; आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्वानुभवाकडे दुर्लक्ष करणारी अशी माणसं आढळून येतात तेव्हा त्रिवाऱ्या दिगूअण्णांनी जवळ बाळगलेला गुरुकिल्ल्यांचा जुडगा मला फारसा हास्यास्पद वाटत नाही.

★

विवेक–विजयादशमी विशेषांक, १९५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम........................ दि: ......................
... ........................ नों दि ......................

## ३. तीळ–काव्यातला आणि गद्यातला

स्फोटाच्या बातम्या–मग ता अणुबाँबचा स्फोट असो, नाहीतर नवराबायकोचा घटस्फोट असो–अमेरिकन संपादकांना पत्राचा खप वाढवायला हल्ली एक हुकमी साधनच मिळाल्यासारखं झालंय !

युद्धाच्या कथा रम्य असतात असं आजपर्यंत म्हटलं जात होतं. अणुगोलकाच्या या युगात प्रत्यक्ष युद्ध झाल्यावर त्याची कथा सांगायला नि ऐकायला पृथ्वीच्या पाठीवर कुणीच शिल्लक राहणार नाही या भीषण वस्तुस्थितीमुळंच की काय अण्वस्त्राच्या युद्धपूर्व प्रयोगाच्या कथा आगाऊच प्रसिद्ध होत आहेत !

राष्ट्राराष्ट्रातल्या युद्धाप्रमाणंच नवरा–बायकोची भांडणंहि वाचकांचं चित्त वेधून घेतात हे संपादकमहाशयांनी ओळखून अलीकडे घटस्फोटाच्या बातम्याहि तत्परतेनं द्यायला सुरुवात केली आहे !

दिवाळीच्या प्रसंगी आपटबारापेक्षा तिडतिडीचीच गंमत अनुभवणाऱ्या माझ्यासारख्याच्या प्रकृतीला जागतिक युद्धापेक्षा पतिपत्नीतल्या कलहाच्या वार्ताच अधिक आकर्षक वाटाव्यात यात काहीच नवल नाही !

घटस्फोट घेतांना अमेरिकन स्त्री–पुरुषांनी जी कारणं पुढे केलेली असतात ती पाहिली म्हणजे खूप करमणूक होते माझी. एका गृहिणीनं आपले पतिराज झोपेत मोठ्याने घोरतात म्हणून घटस्फोट मागितला होता, तर दुसऱ्या एका कुलवधूनं आपला प्रियकर चुंबन घेताना घ्यावी तशी दक्षता घेत नसल्यामुळे ओठांचा रंग पुसून जातो हे घटस्फोट घेण्याचं कारण कोर्टापुढे सादर केलं होतं ! ! एकाला प्रेयसीच्या पाठीला पोक निघाल्यामुळे ती नकोशी झाली होती, तर दुसऱ्याला वल्लभेच्या गालावर स्मित करताना लाली चढत नव्हती म्हणून

तिच्यापासून फारकत घ्यावयाची होती! हिंदुस्थानात बरीच वर्षे काढलेल्या एका कवीला आपल्या प्रियतमेच्या गालावर हिंदी स्त्रियांप्रमाणे तीळ नव्हता म्हणून सोडचिठी द्यायची लहर आली होती!!

तसं पाहिलं तर हल्ली कसलंहि भांडण अन् विद्वत्ता यांना काडीचाहि आधार पुरेसा होतो! माझा एक एम्. ए. झालेला मित्र 'पेशवाईतील पत्रावळीचे टाके' या विषयावर संशोधनपर प्रबंध लिहून डॉक्टरेट घेण्याच्या विचारात आहे, तर दुसरी एक विदुषी 'काडवातीचे प्रकार' हा थिसिस् रशियांतील 'ब्रेडोमस्को' या सोसायटीकडे परीक्षणार्थ पाठविण्याच्या तयारीत आहे!

राष्ट्राराष्ट्रात भडकणाऱ्या युद्धापासून तो नवराबायकोत धुमसणाऱ्या कलहापर्यंत साऱ्यांच्या मुळाशी अशीच क्षुल्लक निमित्तं दडून बसलेली असतात.

कालच आमच्या घरात पत्नीशी माझा खटका उडाला त्याला किती जुजबी कारण पुरलं होतं. राणीसरकारनं खिचडीबरोबर चिंचेचं सार न करता नुसतं ताक वाढलं होतं. तेवढ्यावरून संसार हा 'असारा' पसारा असल्याची खात्री पटून अस्मादिकांनी डोक्यात राख घालून घेतली! आमच्या चाळीतल्या दोन शेजारणी गॅलरीत कोळशाचं पोतं ठेवण्याच्या सीमारेषेबाबत वादंग घालायला लागल्या म्हणजे दोघींचे पाय कोळशाच्या भुकटीने बरबटलेले असूनहि त्या एकमेकींना 'पांढऱ्या पायाची' म्हणून संबोधीत असतात नि दोघींच्याहि चेहऱ्यावर पावडरची पुटं चढली असली तरी एकमेकींना 'काळतोंडी' म्हणून हिणवीत असतात! गेली चारपाच वर्षे अव्याहतपणे त्यांचा वाग्यज्ञ चालू आहे. तो पाहून चाळीतल्या जनताजनार्दनाचा आत्मा संतोष पावत असला तरी दोघींतलं भांडण मिटवून निर्णयाचं पसायदान देण्याची त्याला हिंमत होत नव्हती!

नळाखाली आधी स्वतःची बादली पाहिजे या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेनं प्रेरित होणारे चाळीतले प्रयत्नवादी भगीरथ, नळातून गंगा प्रकट होण्यापूर्वीच इतरांच्या वेचाळीस पिढ्या उद्धरून मोकळे होत असतात! चाळीतले वरच्या मजल्यावरचे आणि खालच्या मजल्यावरचे हा भेद तर आफ्रिकेतल्या काळ्यागोऱ्यांच्या भेदाइतका सनातन आहे. वरच्या मजल्यावर राहणाऱ्या भाडेकरूंनी खाली कांद्याची टरफलं, केसाचे गुंतावळे अन् केळयाच्या साली

रिचवायचाच अवकाश, की खालच्यांनी वीर, रौद्र आणि बीभत्स 'वाङ्मयाचं' शेलापागोटं वरच्यांना आहेर पाठविलंच म्हणून समजावं!!

नाटकाची सुरुवात कशीहि असली तरी पर्यवसान शोकांतच व्हावयास हवं हा पाश्चात्य साहित्यशास्त्रकारांचा प्राचीन दंडक कोणत्याहि चाळीत प्रसंगविशेषी कसोशीनं पाळला जात असतो. स्वच्छतासप्ताह असो, सौजन्य आठवडा असो, सत्यनारायणाची महापूजा असो, नाहीतर गणपत्युत्सव असो, चाळकऱ्यांनी सामुदायिक रीतीनं हे प्रसंग साजरे–साजरे कसले? विद्रूपच!—करावयाचे ठरविले म्हणजे सुरुवातीला, उपरण्याला स्मरणगाठी पाडणाऱ्या गोकुळप्रमाणे वागत असलेला प्रत्येक भाडेकरू शेवटी शेवटी आतल्या गाठीच्या कमलाकराप्रमाणं वावरू लागतो आणि प्रसंगावर शोककळा पसरते!

× × ×

परवा केरकरवाडीत सर्वांनी मिळून स्वच्छतासप्ताह पाळण्याचं ठरविलं. "झाडू झिन्दाबाद! कचरा मुर्दाबाद!' 'झाडावी आपआपली घरे। भाग्य येई तदनंतरे॥', 'खराट्याविणा स्वच्छता व्यर्थ आहे', 'फिनाईल, पॉयझा, डी. डी. टी.। तेथे आरोग्याची वसती' इत्यादि सुभाषितं गॅलरीतून नि खोल्यांतून फडकूं लागली. भामिनीबाईंच्या ठिकाणची नागर संस्कृति जागी होऊन 'आपल्या मुलांनी आठवडाभर जिन्यात घाण केली नाही तर असं काय मेलं बिघडणार आहे?' अशी मनाशी समजूत घालून त्या मुलांना रात्रीं दोन घास कमी खाऊ घालू लागल्या. जिभेला पेन्सिलीचं टोक लावून लिहायची संवय स्वच्छताविरोधी असल्याचं ध्यानात येऊन कालिंदीनं सात दिवस शाळेतले गृहपाठ न लिहिण्याचा निश्चय केला. गॅलरीतून उभ्यानं शेगडीतली राख टाकायला नको म्हणून अन्नपूर्णाबाईंनी आठ दिवस खाड्यांच्या खानावळीतला डबा मागवायचं ठरविलं, एका होतकरू कवीनं—

'काड्यांची अथवा कशाचि तरि हो ही बनविली केरसू- ।
णी, स्वच्छत्वपणास राखुनि, घरेदारेहि जी ठेवि सु॥
सगळेही लवती इच्यापुढति ही पाहून हिचा थोरप।–
णा! ज्याला इचि थोरता अणुभरी ना कळ्ळि तो वेडप★॥'

---

★ येथे 'ट' अक्षर घालून मात्रादोष पदरी घेण्यापेक्षा ते अध्याहृत ठेवणेच कवीस इष्ट वाटले असावे.

अशा प्रकारची काव्यरचना करून आपली प्रतिभा समाजाभिमुख बनविण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. प्रस्तुत काव्यात रचनेची सफाई नसली तरी विषय 'सफाईचा' आहे हे लक्षांत घेऊन चाळकऱ्यांनी कवीच्या समयज्ञतेचं कौतुक करून त्याला उत्तेजन दिलं.

संगीताची आवड असलेले भाडेकरूहि स्वतःशी गुणगुणतांना समयसूचकता दाखवू लागले. 'मला कपडे धुवायचेत! साबण का हो आणुन द्या ना!' 'उगिच का कांता। शिंकता। छीः ऽऽऽ करुनी ऽ', 'सदा कल्हईविना। भांडी जरी वापरी कारभारी। होई कसेसे मना!॥', 'जो लोककल्याण साधावया धाण। मोरीतली रोजच्या रोज काढी॥' अशी प्रसंगोचित आशयाची पदं रचून गुणगुणणारे भाडेकरू व्यवहारचतुर नव्हते असं कोण म्हणेल?'

तात्पर्य, केरकरवाडीतल्या सर्व रहिवाश्यांनी अशा प्रकारे स्वच्छतासप्ताहाच्या कार्यात उत्साहाने भाग घेतला असला तरी तिसऱ्या की चौथ्याच दिवशी त्यांच्या उत्साहाला ओहोटी लागली!

× × ×

चाळीत चालू असलेल्या महान् कार्याची आठवण न राहून बबनरावानी विडा चघळीत खालच्या चौकात जो लाल शिडकावा केला त्यातल्या काही रंगछटा गॅलरीत वाळत घातलेल्या गोकळीबाईच्या पातळावर उमटल्या. त्याबरोबर गोकळीबाईंनी शेव-गाठ्याच्या पुड्याचे कागद बबनरावांच्या खोलीपुढे आणून टाकले! बबनरावांनी, 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचं स्वप्न साकार होऊ दे म्हणजे दाखवतो एकेकाला इंगा!' अशी राजकीय भूमिकेवरून तंबी दिली. यावर गोकळीबाईंच्या यजमानांनी, 'तुमी मंबई महाराष्ट्राला जोडेल तर हामी अमदाबाद मद्रासला जोडेल! त्येचा काय वांधा नाय! पन बायडीच्या साडलोवर पान खाऊन थुंकायचा म्हंजे काय?' असा व्यावहारिक पातळीवरून सवाल टाकला. त्याचं बबनरावांकडून उत्तर येण्यापूर्वीच अंगाला तेल माखीत बसलेला चिंगमस्वामी चमकून म्हणाला, 'ओ! व्हाय् डू यू टॉक ऑफ मद्रास? युवर प्रॉपर फिल्ड इज् शेअर-बझार अँड नॉट पॉलिटिक्स!'

गोकळीबाईंना इंग्रजी शब्दांचा अर्थ कळत नसला तरी 'ध्वन्यर्थ' समजण्याइतक्या त्या चतुर होत्या. आपल्या पतीला मद्राशानं टोमणा मारला आहे हे ओळखून त्या काही तरी उत्तर देणार तोच बबनराव जिंगमस्वामीची 'री'

ओढीत आपल्या मोडक्या–तोडक्या इंग्रजीत म्हणाले, ' यु आर रियल, चिंगमस्वामी ! व्हाय् ए विडो वॉटस् कुंकुम–तिलक ! '

हे ऐकून खरोखरच नवऱ्याच्या मृत्यूनंतरहि कुंकू लावणाऱ्या केसरबाईंच्या अंगाचा तिळपापड झाला. त्या जळफळत आपल्या खोलीबाहेर आल्या आणि ' रिकाम्या न्हाव्यांना भिंतीला तुंबड्या लावण्यावाचून दुसरं काय सुचणार आहे आणखी ! ' असा निषेधात्मक उद्गार काढून पाय आपटीत त्या आपल्या खोलीत चालल्या झाल्या ! तोच खालच्या मजल्यावरच्या पांडू न्हाव्याची ' आपल्याविशीच काय तरी मसलत चाललीया ! ' अशी बालंबाल खात्री होऊन त्यानं बबनराव नि चिंगमस्वामी या दोघांचीहि उलटीसुलटी केली ! संध्याकाळपर्यंत या भांडणाला महायुद्धाचं स्वरूप प्राप्त झालं ! बाचाबाचीचं खेचाखेचीत रूपांतर झालं ! !

गुजरातविरुद्ध महाराष्ट्र, मद्रास विरुद्ध गुजरात, सुधारक विरुद्ध सनातनी, श्रमजीवि विरुद्ध बुद्धिजीवी इत्यादि अनेक पक्ष उपस्थित होऊन ज्याला जो सोयीस्कर वाटला त्याला तो जाऊन मिळाला आणि...

...आणि तीन दिवसापूर्वी खाडकन् जागी झालेली केरकरवाडीतली मानवता पुनः डोळे मिटून खालच्या चौकांत राख टाकू लागली, कांद्यांची टरफलं रिचवूं लागली, जिन्याचे कोपरे रंगवू लागली....

× × ×

जी गोष्ट स्वच्छतासप्ताहाची तीच सौजन्य–आठवड्याची ! अक्काबाई मॅन्शनमध्ये मागे एकदा भाडेकरूंनी आठवडाभर परस्परांशी सभ्यतेनं वागायचं ठरविलं.

आळीतला दादा सर्वांना सुऱ्याऐवजी चेहऱ्यावर स्मित दाखवू लागला, सदानकदा मुलांच्या पाठीत धक्के घालणाऱ्या बनुताई अभिवादनासाठी हात जोडलेल्या सर्वोदयवाद्यांच्या पवित्र्यांत सर्वांच्या नजरेला पडू लागल्या, केस पिंजारून नि मुठी आवळून ओरडणारे कम्युनिस्ट वर्गणी मागायला आलेल्यांच्या मृदु आवाजांत आपला आशय दुसऱ्याच्या कानावर घालण्याची दक्षता घेऊं लागले, उठल्यासुटल्या आपल्या भसाड्या आवाजात भावगीतं गाऊन भाडेकरूंना ' दे माय धरणी ठाय ' करून सोडणारा नरसय्या आचारी भूमिगत कार्यकर्त्यांच्या अबोल वृतीनं आपल्या हालचाली करू लागला !—पण अरेरे !...

'अक्काबाई मॅन्शन' मध्ये घडून आलेला हा हृदयपालट मराठी मासिकां-सारखा अल्पायु ठरला!

'बकुळाबाईंची बेबी अजून सहा महिन्यांची झाली नाही तोच आपणाकडे पाहून जीभ बाहेर काढायला लागली!' या चंपूबाईंच्या तक्रारीनं सौजन्य-आठवड्याला गालबोट लागलं अन् पाहता पाहता त्याचं पर्यवसान साऱ्या सप्ताहाला काळं फासलं जाण्यात घडून आलं!

घटकेपूर्वी मानव्य, शांति, विकास, प्रगति इत्यादि भाववाचक नामांची देव-घेव करणाऱ्या बकुळाबाई नि चंपूबाई आता एकमेकींवर 'काळुंद्री, कोडगी, निलाजरी' वगैरे विशेषणांचा वर्षाव करू लागल्या!

'चंपूबाईंनी सप्ताहाच्या नियमांचा भंग केला, मग मूग गिळून बसायला आम्हीच नवरा-बायकोनी असं कोणतं पाप केलं?' या विचारानं अमरावती-बाई अन् पंजाबराव सप्ताहपूर्व शिरस्त्याप्रमाणे एकमेकावर तोंडसुख (काव्यमय अर्थानं नव्हे) घेऊं लागले!

जवळ जवळ पावलं टाकण्याच्या सवयीमुळं आपल्या पत्नीच्या वहाणा लवकर झिजतात हा पंजाबरावांचा आक्षेप होता, तर दूर दूर पावलं टाकण्याच्या सवयी-मुळं आपल्या नवऱ्याचं धोतर कांचून लवकर फाटतं हा अमरावतीबाईंचा त्यांच्यावर प्रतिआरोप होता.

झालं! गळ्याभोवतालची दावण तोडून मोकाट सुटलेल्या म्हशीप्रमाणं सौजन्यपालनाच्या शपथेतून मोकळे झालेले भाडेकरू एकमेकाकडे मारक्या नज-रेनं पाहूं लागले!

× × ×

अलीबाबा चाळींतल्या चाळीस भाडेकरूनी मिळून सत्यनारायणाची महापूजा केली तेव्हाहि अशाच कुरबूरी, कुरापती, खटके नि खुसपटं हे युद्धनीतीचे विविध बारकावे लोकांच्या नजरेस पडले.

कुणी प्रसादाच्या साखरेतला बराच मोठा हिस्सा कुणाला नकळत बाजूला काढून ठेवला होता, कुणी पताका-तोरणं बांधण्याचे आयास टळावेत म्हणून चोरपावलांनी सत्यनारायणाच्या मंडपांतून पोबारा केला होता, कुणी चौरंग, पाट, केळींचे खांब इत्यादि जिन्नस जमविण्याच्या बाबतीत अंगचोर-पणा केला होता, तर कुणी कथा ऐकण्यासाठी जमलेल्या श्रोतृवृन्दांतली

‘सौंदर्यस्थळं’ चोरट्या नजरेनं न्याहाळण्यापलीकडे दुसरी कोणतीहि जिम्मेदारी पत्करली नव्हती.

आणि मग प्रसाद वाटण्याच्या वेळी ते सर्व ‘कर्ते’ पुरुष समोरासमोर आले तेव्हा एकमेकांच्या ‘कर्मांचा’ जाब विचारू लागले. पण त्यांना तोंड उघडूं देण्यापूर्वीच प्रत्येकाची सहधर्मचारिणी पुढे सरसावली आणि आपापल्या मानबिंदूचं वकीलपत्र घेऊन बचावाचं भाषण करू लागली !

‘हापिसातनं घरी आल्यावर या हरिश्चंद्रांच्या न् धर्मराजांच्या कोटाचे खिसे तपासावेत म्हणजे शाईच्या बाटल्या, पेणसिली... ’

‘पुरे ! पुरे ! गांधारीबाईंच्या डोहाळजेवणाच्या वेळी भांड्यात लाडू लपवून आणले, त्यापेक्षा हापिसातनं शाई, पेणसिली आणलेल्या... ’

—एवढा नमुना पुरे !

युद्धप्रवृत्ती ही मानवी मनाच्या मूलभूत प्रवृत्तींपैकी एक मानली तरी समन्वयाची बुद्धी त्याच्या सुसंस्कृततेची, समंजसपणाची निदर्शक समजली जाणार नाही का ? ‘मेरी मुरगी की एकहि टांग !’ असं अट्टाहासानं प्रतिपादन करणाऱ्याचा हटवाद जगाला कधीच सुखी करू शकणार नाही. ढालीची एकेक बाजू पाहून तेवढीच खरी मानणाऱ्या व एकमेकावर तुटून पडणाऱ्या शिपायांप्रमाणं आपण व्यर्थ इरेला पेटत आहोत! समेटाची, सलोख्याची इच्छाच आपल्या ठिकाणी उरलेली नाही! एखादं सुन्दर चित्र चौकटीत बसवायचं झालं तर दोहोंचीहि थोडीबहुत काट–छाट करावी लागते हे आम्ही लक्षात घेत नाही. ते चित्र आहे. अशा स्थितीत ते चुरगळून वेडंवाकडं होऊन बेढब दिसू लागलं तरी आम्हाला त्याची पर्वा वाटत नाही.

मामंजीचं सोवळं कडक म्हणून सूनबाईला वेगळी चूल मांडावीशी वाटते, सूनबाईला नटण्या–मुरडण्याची हौस म्हणून सासूबाईला तीर्थयात्रेला जाण्याची इच्छा होते, नणंदेच्या गाण्यामुळं भावजयीचं डोकं उठतं, धाकट्या भावंडांच्या शिक्षणाचा खर्च परवडत नाही म्हणून मोठा भाऊ जमिनीची वाटणी मागू लागतो !

चार भिंतीच्या टिचभर विश्वात जो प्रकार दृष्टीला पडतो तोच भिंतीबाहेरच्या जगातहि दिसून येतो !

सत्तेच्या बळानं धुंद झालेल्या राजकीय पक्षाला इतर पक्षांशी तडजोडीची

भाषा करण्यात कमीपणा वाटतो, गिरणीमालकांना मजुराशी हातमिळवणी करण्यांत प्रतिष्ठेचं दिवाळं वाजण्याची भीति वाटते, जमीनदारांना शेतकऱ्याबरोबर समझोता करताना अवघडल्याप्रमाणं होतं, प्रबळ राष्ट्राला दुर्बळ राष्ट्राबरोबर मिळतं घेण्याची कल्पना असह्य होते !

'नवरा लवकर झोपल्यावर आपणाला एकट्याला रात्री जागावं लागतं' या सबबीवर कोर्टाकडून घटस्फोट मिळविणाऱ्या पाश्चात्य स्त्रीचं व्यक्तिमत्व जागृत झालं आहे असा कुणी विश्वास बाळगीत असतील तर बाळगोत बिचारे ! मला मात्र असल्या वेव्हूट युवती पाहिल्या की, खलील जिब्रानचे—

'मच इन यू इज स्टील मॅन
ॲण्ड मच इन यू इज नॉट यट् मॅन
बट ए शेपलेस पिग्गी, दॅट
वॉक्स अस्लीप् इन् द मिस्ट
स ंग फॉर इट्स ओन अवेकनिंग'

हे उद्गार आठवून असल्या स्त्रियांविषयी कीव वाटू लागते ! नवऱ्याला झोपच काय,पण महानिद्रा लागली तरी त्याच्यावर अचल प्रीति ठेवणाऱ्या सावित्रीची ज्वलंत जीवननिष्ठा कुठं आणि एवढ्याशा कारणानं संसाराचा डाव उधळून नवा प्रपंच थाटणाऱ्या पाश्चात्य ललनांची व्यभिचारी, चंचल भोगप्रवणता कुठं !

प्रेयसीच्या गालावर तीळ नाही म्हणून तिला सोडचिठी देणारा प्रियकर काव्यसृष्टींत शोभून दिसत असेल, पण व्यवहारात एक तीळ सात जणात वाटून देणारी गद्य वृत्तीच अधिक खुलून दिसते यात मुळीच शंका नाही !

★

वसंत, १९५५

## ४. फुंकर

प्राचीन कवींनी विरहाला दिलेल्या अग्नीच्या उपमेत काव्य असावं असा विरहापूर्वी माझा समज होता. पण त्या उपमेत काव्यापेक्षा गद्याचंच प्रमाण अधिक आहे हे मला लग्न झाल्यानंतर उमगून आलं.

पत्नीच्या अनुपस्थितीत सकाळ संध्याकाळ शेगडीवरून भाताचं पातेलं उतरविताना किंवा पोळ्या भाजताना हाताला चटके बसू लागले तेव्हा विरहानलाचं काव्यापेक्षा गद्याशीच अधिक जवळचं नातं आहे हे स्वानुभवानं मला पटू लागलं.

त्या दिवशीच्या अनुभवानं तर माझ्या या समजुतीला विशेषच बळकटी आली. त्या दिवशी सकाळी पाणी तापविताना, दुपारी थालिपीठ लावतांना अन् संध्याकाळी स्टोव्हवर चहाचं आधण ठेवताना अस्मादिकांच्या हातावर चारपाच ठिकाणी तप्तमुद्रा उमटल्या.

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते' या सुभाषितापासून तो 'भयचकित नमावे तुज रमणी' या उद्गारापर्यंत स्त्रीजातीचे महात्म्य सूचित करणारी सारी सुभाषितं, त्या त्या कवीवर चुलीपुढे बसण्याचा प्रसंग आल्यावर जन्माला आली असावी याबद्दल मला तिळभरहि शंका उरलेली नाही.

हातात पाळण्याची दोरी बाळगणारी स्त्री पूर्वी जगदुद्धारक म्हणून ओळखली जाई. संततिनियमनाच्या या युगात या निकषावर श्रद्धा ठेवणाऱ्या महिलेला स्वतःच्याच बेचाळीस पिढ्या उद्धरून घ्याव्या लागतील याची मला खात्री आहे. उलट 'ज्यांच्या हाती पोळपाट लाटणी त्याच देतील जगाला कलाटणी' ही नवी म्हणच खऱ्या स्त्री सामर्थ्याची कल्पना आणून देणारी नाही का?

पत्नी माहेरी गेल्यावर पतिदेवाला तिच्या मोठेपणाचा साक्षात्कार घडावा असा नियतीचा हेतु असला तरी तो पूर्णांशानं सफल होतो असं नाही. माझ्या बाबतीतलंच उदारण पहा ना. त्या दिवशी स्टोव्हची अन् शेगडीची आराधना करताना चार पाच ठिकाणी पोळल्यावर बायकोच्या सुग्रणपणाच्या आठवणीऐवजी चंदनाचं खोड उगाळीत बसणं हेच माझ्यापुढे अधिक महत्त्वाचं कर्तव्य नव्हतं का? विरहकालात यक्षावर स्वतः स्वयंपाक करण्याची बहुधा पाळी आली नसावी. नाहीतर त्याने मेघाजवळ मनोव्यथेऐवजी पोळल्याच्या जखमांचंच वर्णन करायला कमी केलं नसतं.

पोळलेल्या जागी योग्य तो उपचार करूनहि सबंध दिवसभर मनाला चैन पडत नव्हतं. चंदनाचा लेप, कसलेसे जालीम मलम इत्यादि सारे उपाय मी योजून पाहिले. नाही म्हणायला तोंडानं फुंकर घातली म्हणजे किंचित् हायसं वाटे.

फुंकर! जखमेचा दाह अंशतः शमविणारा हा बिनखर्ची उपाय मनुष्य-मात्राला उपलब्ध झाला, तसाच त्याचा मनःस्ताप निवविणारा उपायहि निसर्गानं त्याला बहाल केला आहे हे आपणापैकी कितीजणांना ठाऊक असतं? एखादी मनाविरुद्ध गोष्ट घडल्यावर तिच्याकडे विनोदवृत्तीनं पाहण्याची आपण आपल्या मनाला संवय लावून घेतली तर मनक्षोभाची तीव्रता कितीतरी कमी करता येते असं मानसशास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

अपेक्षाभंग झाला म्हणजे माणसाला दुःख होणे साहजिक आहे. पण अशा वेळी मनाला ते फारसं लावून न घेता विनोदबुद्धीनं त्याकडे पहायला शिकलं पाहिजे. दुःखाचा फार मोठा आघात झाल्यावर विनोदबुद्धीचं त्यापुढे काही चालणार नाही हे कबूल. पण मनुष्याच्या आयुष्यात हरघडी उत्पन्न होणाऱ्या दुःखांचं, अपेक्षाभंगांचं स्वरूप किरकोळ असणार ही गोष्ट उघड आहे. अशा वेळी ते दुःख विसरायला लावणारं विनोदासारखं दुसरं कोणतंच प्रभावी औषध त्याला सापडणार नाही.

एका व्याख्यात्याचं रटाळ भाषण काही केल्या संपेना. श्रोते अगदी कंटाळून गेले होते. खरं म्हणजे मनातल्या मनात संतापलेच होते. इतक्यात वेळ बराच झाला असल्याची जाणीव होऊन वक्ते म्हणाले, 'या हॉलमध्ये घड्याळ

दिसत नाही कुठं ? ' तेव्हा श्रोत्यांपैकी एकजण हळूच मिस्किलपणानं म्हणाला, ' पाठीमागं कॅलेंडर आहे की पण तुमच्या ! '

पाल्हाळिक भाषणाला विटलेल्या त्या श्रोत्याचा मनस्ताप त्या विनोदी सूचनेनंतर नाहीसा झालाच, शिवाय ज्याला ज्याला म्हणून ते वाक्य ऐकू गेलं त्या प्रत्येकाच्या चर्येवर हास्याची सुक्ष्म लकेर उमटली.

कुठल्यातरी मासिकांत आलेला हा चुटका कदाचित् काल्पनिक असेल म्हणून सोडून देऊ. प्रत्यक्षात घडलेली अशा प्रकारची हवी तेवढी उदाहरणं काढून दाखविता येतील. मला वाटतं आचार्य अत्र्यांच्याच बाबतीत घडलेला प्रसंग आहे हा. कुठल्याशा सभेत भाषणाला सुरुवात करतांना अत्र्यांनी ' सभ्य गृहस्थ हो ! ' असे शब्द उच्चारले, तेव्हा समोरच्या गॅलरीत बसलेल्या कांही वात्रट तरुणांनी ' ओ ऽ ' म्हणून साद दिली. दुसरा एखादा वक्ता असता तर तो प्रकार न खपून तो चिडून काहीतरी म्हणाला असता. पण जात्याच खिलाडू वृत्तीचे असलेले अत्रे त्या खोडसाळ तरुणाकडे एक दृष्टिक्षेप टाकून हंसत हंसत म्हणाले, ' माफ करा, मी तुम्हाला उद्देशून म्हटलं नव्हतं ! '

समयसूचकता आणि हजरजबाबीपणा अंगी असल्यावाचून सभेत असला उत्स्फूर्त विनोद कोणाला साधणार नाही हे मी कबूल करतो. पण दररोजच्या व्यवहारात मनुष्याच्या वाट्याला येणारी दुःखं, निराशा अन् अपेक्षाभंग यावर मात करायला आवश्यक ती विनोदबुद्धी मात्र प्रयत्नाने अंगी बाणून घेतां येईल असा माझा विश्वास आहे.

जिल्हा लोकलबोर्डाच्या ओबडधोबड सडकेवरून धावणाऱ्या मोटारीनं प्रवास करतांना आपणाला वैताग आलेला असतो अगदी. अशा वेळीं मोटारीत बोर्डाचा एखादा वरिष्ठ अधिकारी भेटला म्हणजे त्याच्या अनागोंदी कारभारावर खूप सडकून टीका करण्याचं आपल्या मनात येणं अगदी स्वाभाविक आहे. पण आपण कितीहि त्वेषानं बोललो तरी साहेबाच्या मनावर त्याचा यत्किंचित्तहि परिणाम होणं शक्य नसतं ! असली बोलणी निर्विकारपणानं ऐकून घ्यायची त्याला चांगली संवय झालेली असते. तेव्हा ज्याला विनोदबुद्धि आहे असा प्रवासी प्रत्यक्ष अधिकाऱ्याला किंवा त्याला ऐकू जाईल अशा बेतानं दुसऱ्या एखाद्या प्रवाशाजवळ म्हणेल, ' बाकी आपल्या या सडकेचा एक मोठाच

फायदा आहे हं ! अडलेल्या बाळंतिणीनं या रस्त्यानं प्रवास केला तर एका मिनिटांत तिची सहीसलामत सुटका झाल्याशिवाय राहणार नाही ! '

या मिस्किल टीकेत मनाला डाचणारं रस्त्याविषयीचं दुःख अन् सरकारी गोंधळाविषयीचा संताप हलका करण्याचं सामर्थ्य नाही असं कोण म्हणेल ?

खानावळींत तेच ते ठराविक चवीचं अन्न खाऊन कंटाळलेल्या एखाद्या मेंबराच्या आमटीत जळकी काडी सापडली आहे अशी कल्पना करा. अशावेळी त्याच्या मनांत आधीपासूनच खानावळींच्या कदन्नाबद्दल धुमसत असलेला असंतोष भडकायला तेवढ्या काडीचा आधारहि पुरेसा होईल. पण मनातली आग कितीहि पाखडली तरी खानावळींच्या मालकाची तितिक्षा अग्निकाष्ठ भक्षण करणाराच्याहि पलीकडे गेलेली असते हे कटु ( आणि दाहक ) सत्य ओळखणारा मनुष्य सहसा त्या मार्गाचा अवलंब करणार नाही. त्याच्या ठिकाणी थोडासा विनोदबुध्दीचा अंश असेल तर मात्र तो मालकाला थट्टेच्या स्वरात विचारील, ' काय मालक, आपल्या भारत सरकारनं विड्यांची थोटकं अन् जळक्या काड्या यांचा पूरक अन्नांत कधीपासून समावेश केला ? '

त्या उपरोधिक टोमण्यानं खानावळींचा मालक एकेरीवर न येता वरकरणी हंसल्यासारखं करून म्हणेल, ' समजलो ! पण काय करावं, हल्ली हे नोकर लोक कामात लक्षच घालीनासे झाले आहेत ! '

नाटकात कामं करतांना तर ही विनोदबुद्धी नटांना केवढी तरी उपकारक ठरते. एकच प्याल्याचा चौथा अंक चालू असताना सुधाकराची नकली मिशी गळून पडली. झालं ! प्रेक्षक त्या अभावित विनोदानं खो खो करीत हसत सुटले. पण सुधाकराची भूमिका करणारा नट त्यामुळं चिडला नाही की गडबडला नाही. उलट, जणू काही हसण्यासारखं काहीच घडलं नाही अशा आविर्भावाने तो म्हणाला, ' साऱ्या शहरात छीः थू झाल्यामुळं निराशेनं काल मी न्हाव्याकडून मिशी उतरवून घेतली. पण वेटी दारूमुळं चिकटून तिथंच बसली होती हे आता लक्षात आलं माझ्या !... '

त्या समयस्फूर्त, प्रसंगोचित खुलाशानं भाबडे प्रेक्षक हसावयाचे तर थांबलेच पण ज्यांना ते वाक्य नटानं स्वतःच्या पदरचं घातल्याचं उमगून आलं त्यांनी त्याच्या चातुर्याची मनातल्या मनात प्रशंसाच केली.

अगदी प्राचीन काळापासून जाणते पुरुष विनोदाचं हे महत्त्व ओळखून जीवन

सुसह्य करण्याकडे त्याचा उपयोग करीत आले आहेत हे स्पष्ट दिसून येतं. श्रीकृष्णाजवळ विनोदबुद्धि होती म्हणूनच ना सत्यभामेच्या जळफळाटानं किंवा बलराम दादाच्या संतापानं त्याची वृत्ति विचलित होऊं शकली नाही? पूर्वीचे राजे लोक आपल्या पदरी खुषमस्करे पाळीत, त्याच्या मुळाशीहि हास्या-विषयीचं हेच सत्य दडलेलं नसेल का? सत्ताबलानं धुंद झालेल्या सम्राटाची मर्जी एवढ्या तेवढ्याशा कारणानंहि खप्पा होत असेल, अन् मग त्याच्या पद-रचे खुषमस्करे आपल्या चातुर्यानं अन् विनोदी स्वभावानं राजेसाहेबांचा रोष घालवून देत असतील. राज्यातल्या साऱ्या जावयाना सुळावर चढविण्याचा हुकूम सोडणाऱ्या कोणत्याशा लहरी राजाचं ते फर्मान किती मूर्खपणाचं अन् अव्यवहार्य होतं हे त्याच्या ध्यानात आणून द्यायला प्रधानाची विनोदबुद्धीच उपयोगी पडली नाही का? त्या प्रधानानं तयार करविलेल्या सुळात एक सोन्याचा व एक चांदीचा एक असे आणखी दोन सूळ होते. राजेसाहेबांनी याबद्दल खुलासा विचारला तेव्हा प्रधानानं उत्तर दिलं, 'महाराज हा सोन्याचा सूळ आपणासाठी अन् चांदीचा माझ्यासाठी तयार केलेला आहे. आपणहि आपापल्या श्वशुरांचे जामात आहोतच की!'

मनाच्या आत्यंतिक अगतिक अवस्थेतहि केव्हा केव्हा मनुष्याची विनोद-बुद्धी त्याचा दुःखभार हलका करण्यास उपयोगी पडते असं काही उदाहरणां-वरून दाखवून देता येईल. म. गांधीच्या देहावसानानंतर महाराष्ट्रभर झालेल्या जाळपोळीच्या व दंगलीच्या वेळची गोष्ट आहे ही. सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते भालजी पेंढारकर यांचा प्रभाकर स्टुडियोहि हुल्लडबाजांच्या दंगलीस बळी पडला. मराठ्यांच्या पराक्रमाच्या पार्श्वभूमीवर ज्या ध्येयवादी कलावंतानं एका-मागून एक सुन्दर चित्रपट काढून महाराष्ट्राच्या वीरवृत्तीचा परिपोष करण्याचा प्रयत्न केला त्याच्याच समाजबांधवांनी त्याच्या ध्येयमार्गावर जळते निखारे पसरून ठेवावेत ही घटना जितकी दुर्दैवी तितकीच मनस्तापाची तीव्रता वाढ-विणारी नाही का? भालजींकडे त्यांचे काही मित्र सांत्वन करायला गेले तेव्हा त्यांच्या अंतर्यामांत दुःखाचा केवढा तरी कढ उफाळून आला असेल! पण स्थितप्रज्ञाच्या कोटीला पोचलेल्या त्या थोर अंतःकरणाच्या कलावंतानं जे उत्तर दिलं ते लक्षात ठेवण्यासारखं आहे. भालबा म्हणाले, 'आता यापुढं माझं कसं होणार म्हणून काय विचारता? जन्मभर कोळशाचा व्यापार करता येईल अशी

जनतेनं सोय करून ठेवलीय की माझी!'

दंगलीत जळून खाक झालेल्या 'प्रभाकर स्टुडियो'वर अश्रूपूर्ण दृष्टिक्षेप टाकून भालबांनी हे विनोदपूर्ण उत्तर द्यावं यातच विनोदबुद्धीच्या सामर्थ्याची ग्वाही अनुस्यूत नाही का?

अंदमानातल्या खडतर हालअपेष्टा भोगीत असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनीहि वेळोवेळी असाच विनोदबुध्दीचा आश्रय करून आपल्या शारीरिक नि मानसिक वेदना विसरायचा यत्न केला होता हे अनेकांना ठाऊक असेलच. तुरुंगातल्या राजबंद्यांचा अमानुषपणे छळ करणाऱ्या बारीसाहेबाच्या निष्ठुरपणाबद्दल उठल्यासुटल्या जळफळून काही उपयोग होण्यासारखा नव्हता हे ओळखून सावरकर त्याच्या स्थूल देहाकडे पाहून आपल्या जिवाची करमणूक करून घेत. बारीसाहेबाच्या विशाल उदरप्रदेशाभोवतालचा बेल्ट पाहून त्यांना पृथ्वीवरल्या विषुवद्वृत्ताच्या पट्ट्याची सुचलेली कल्पना किंवा काथ्या कुटण्याच्या परिश्रमाचा परिहार व्हावा म्हणून साऱ्या विश्वाचा व्यापार हाच कसा एक भव्य काथ्याकूट आहे यासंबंधी विचार व्यक्तविताना त्यांनी प्रकट केलेली विनोदबुध्दीसुद्धा वरील विधानाची साक्ष सहज पटवू शकेल.

मानवी दुःखाचा परिहार करण्याची विनोदातली ही शक्ति लक्षात घेऊन कोणत्याशा इंग्रज लेखकानं 'देअर इज नो ह्यूमर इन् हेवन!' असं विधान केलं ते किती मार्मिक अन् समर्पक आहे! जिथं औषधालाहि दुःख मिळावयाचं नाही अशा स्वर्गलोकात विनोदाची आवश्यकता तरी का उत्पन्न व्हावी?

★

विवेक, विजयादशमी विशेषांक, १९५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..................... वि: ...................
क्रमांक ..................... नों. दि. ...................

# ५. उसनी वेदना !

पुण्या–मुंबईची चतुःसीमा फारशी न ओलांडलेले लेखक खेडेगावच्या शोभेची व तिथल्या जीवनांतील वैशिष्ट्यांची कथाकादंबऱ्यांतून वर्णनं करू लागले म्हणजे माझी निराळ्याच अर्थाने करमणूक होत असते. या लेखकाच्या कथाविश्वांत ऐन श्रावण झडीतहि मोटा करकरू लागतात, कथानायकाची ‘ कारबारीन ’ पऱ्हाटीच्या वाफ्यांना पाणी देण्यात मग्न झालेली असते, राताळ्याच्या वृक्षाखाली बायजा अन् सखाराम प्रेमाच्या गुलगुल गोष्टी बोलत कांदा भाकरीची लज्जत अनुभवीत असतात, पोटऱ्यात आलेल्या कण्हेरीच्या वेलीकडे पाहताना बायजाला का कुणास ठाऊक, उगीचच लाजल्यासारखं होतं, फांदी फांदीवर लटकलेले अननस पाहतांना रंगील एकाद्या लेकुरवाळ्या स्त्रीचे चित्र पहात असल्याचा सुखद भास होतो, मधून मधून तिची नजर झाडावरच्या एका घरट्याकडे जाते, त्या घरट्यातली चिमण्यांची पिले आपापल्या मातेच्या कुशीत दडून निश्चितपणे स्तनपान करीत असलेली तिच्या दृष्टोत्पत्तीस येतात अन् मग तिची मातृत्वाची लालसा...वगैरे वगैरे.

अशा विलक्षण नमुनेदार चिजा पाहाताना माझी एकापेक्षा अनेक अर्थांनी का करमणूक होऊ नये तुम्हीच सांगा ? ज्या जगांत भुईमुगाचं खळं लागतं, मिरच्या उपलल्या जातात अन् वाटाण्याबरोबरच तुरीच्या वेलीहि सरसर रांगू लागतात त्याची नवलाई पहातांना माझं का मनोरंजन होऊं नये ?

आठ गुणिले दहाच्या शहरी खुराड्यांत उभी हयात घालविणाऱ्या लेखकाला ग्रामीण जीवनाचा नि दृश्यांचा तपशील बरोबर वर्णन करून सांगता आला नाही तर त्याचं मला विशेष नवल वाटत नाही. पण ज्यांनी खेडेगावात

दहापाच पावसाळे काढले आहेत असे कवि-लेखकहि खेड्याविषयी, तेथील लोकांच्या जीवनाविषयी वाटेल तशा थापा मारू लागले म्हणजे माझ्या आश्चर्याला सीमा रहात नाही. हे साहित्यिक खेड्याविषयीच्या भौगोलिक वा निसर्गवर्णनाच्या बाबतीत कदाचित् फारशा चुका करणार नाहीत, पण तेथील लोकांचे आचारविचार, दैनंदिन व्यवहार, स्वभावविशेष इत्यादींचे वर्णन करतांना मात्र वास्तवतेपासून कितीतरी योजनं दूर गेलेले असतात !

झुळझुळ वाहणाऱ्या ओढ्याच्या काठी बसलेले ते टुमदार चंदनपूर, त्यांतली साधी भोळीं, निरागस वृत्तीची, निर्व्यसनी माणसं, त्यांना परस्परांबद्दल वाटणारा जिव्हाळा, त्यांना मुखोद्गत असलेले तुकोबारायाचे अभंग... हे कधी काळच्या लेखकांनी कथा कादंबऱ्यातून करून ठेवलेलं वर्णन त्यांनी वाचलेलं असतं आणि त्याचाच मागोवा घेत ते आजच्या घटकेलाहि त्याच थाटाची वर्णने करून वस्तुस्थितीचा विपर्यास करीत असतात. आजच्या लेखकाला निरागस नि निर्व्यसनी वाटणारी ‘ धरतीची लेकरं ’ सारा दिवस हॉटेलांत चहा ढोशीत, विड्या फुंकीत अन् फिचरवर आंकडे लावीत बसलेली असतात, तुकोबाच्या अभंगाऐवजी ‘ साल्या, रध्या, ह्यो काय च्या हाय का मोराडाचं पानी ठिवलंस रे आमच्या फुडं ? ऑं ? ’ हे वाङ्मय जिभेवर घोळवीत असतात, हातभट्टीच्या धंद्यात स्पर्धा करणाऱ्याचा कायमचा काटा काढून टाकण्याचे मनसुबे रचीत असतात.

दुपारच्या वेळचा शेतातला न्याहारीचा प्रसंगहि आमच्या लेखकांनी वस्तुस्थितीपेक्षा स्वतःच्या कल्पनाशक्तीवर विसंबूनच वर्णिलेला आढळून येतो. ‘ न्याहारीचा वखुत होईल ’ म्हणून ‘ मैतरणीला बिगीबिगी ’ पावले उचलायला सांगणारी घरधनीण एकाद–दुसरीच असणार. इतर जोडप्यात दुपारच्या जेवणाच्या वेळीं जो काही सुखसंवाद चालत असेल त्याचं स्वरूप साधारणपणे असंच नसेल का ?–

‘ अहाहा काय पन झुनका केलास ! म्हशीपुढं ठिवायचं आंबोन यापरीस पुरवलं... ’

‘ इकडश्यान होटलांतलं श्येन खायची चटक लागलीया, मग घरची भाकर अन् कोरड्यास कुठली खात्रस यायला ? ’

त्या बाईचा दादला हॉटेलात जाणारा नाही अशी कल्पना केली तरी दररोज त्याच त्या चवीचं कदान्न खाऊन खाऊन विटलेल्या त्याच्या जीभेवर

वरच्यासारखे कडवट उद्गार येत नसतील असं नाही ! मनुष्याची वृत्ति कितीहि समतोल अन् समाधानी असली तरी आर्थिक ओढघस्तीनं मेटाकुटीस आल्यावर त्याच्या मनाचा तोल थोडातरी ढळतोच की नाही ? त्याच्या समाधानी बृत्तीला थोडा तरी तडा जातोच की नाही ? एरवी सुरात वाजणारं वाद्य कुठंतरी उलल्यावर त्यातून चिरचिरा स्वर उमटणारच ! पण ही साधी गोष्ट आमच्या लेखकांच्या लक्षात येत नाही. किंबहुना जाणूनबुजून वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून ते अवास्तवाच्या चित्रणात आनंद मानीत असतात. कठोर, रुक्ष सत्यापेक्षा मोहक, मुलायम असत्याचीच त्यांना अधिक परवड वाटत असते.

× × ×

आणि एकट्या लेखकानाच कशाला दोष द्यायला हवा ? जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आज असत्याचा, आभासाचा बडिवार माजविण्यात जो तो गढून गेलेला दिसून येत नाही का ? आपण सत्याचे पुजारी आहोत असा दावा करीत करीतच प्रत्येकजण असत्याला गोंजारीत असतो, त्याच्या प्राणप्रतिष्ठेत कृतकृत्य झाल्याचं समाधान उपभोगीत असतो. घराण्याच्या साऱ्या वैभवाला ओहोटी लागली तरी पूर्वीच्याच मानापमानाच्या नि प्रतिष्ठेच्या कल्पना उराशी बाळगून नस्त्या मोठेपणाचा आव आणणारी काही वतनदार मंडळी आमच्या विदर्भात कोठे कोठे दृष्टीस पडतात. मोठेपणाच्या भ्रामक समजुतीनं झपाटलेली माणसं पाहताना मला डॉन क्विझोटची आठवण होऊन हसू आवरता येत नसे. पण आज आवतीभोवती सारे डॉन क्विझोटचेच अवतार वावरताना पाहिले म्हणजे माझ्या ओठावर फुटू पाहणारे हसू कुठल्याकुठे मावळून विषादाने मन झाकळून जाते.

माझ्या ओळखीच्या एका शिंप्याने नुकताच आपला फोटो काढून घेतलेला मला दाखविला. फोटोत त्याच्या हातांत ‘ केकावलि ’ दिसत होती. केकावलीच काय पण त्या पठ्याने उभ्या आयुष्यात गुलबकावलीची कथासुद्धा वाचली असेल की नाही शंकाच आहे. केकावलीऐवजी त्याने टेप, कात्री किंवा अंगुस्तान यापैकी एकादे आयुध हातात घेऊन फोटो काढला असता तर त्यातच त्याचे खरेखुरे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित झाले नसते का ? उद्या एकाद्या चित्रकाराने मारुतिरायाच्या हातात गदेऐवजी वॉकिंग स्टिक असल्याचे दाखविले किंवा भगवान् शंकराच्या मस्तकावर गंगेऐवजी झिरमिळ्यांची पुणेरी पगडी अन्

गळ्यात सर्पाऐवजी रेशीमकाठी उपरणे असल्याचे चित्रित केले तर ते वस्तुस्थितीला कितपत धरून होईल? क्रॉमवेलप्रमाणे 'पेंट मी अ‍ॅज आय् अ‍ॅम्' असे या पौराणिक मंडळींचे आत्मे या पृथ्वीतलावर येऊन ओरडून सांगणार नाहीत हे खरे, पण मर्त्य लोकातल्या माणसांनी ही आपली विटंबना चालविली आहे असा विचार त्याच्या मनाला स्पर्शून गेल्याशिवाय राहील का?

कुठल्याहि फोटो स्टुडिओत तुम्ही पाऊल टाका. सत्याला दडवून ठेवून, सत्याभासाच्या पाठीमागे लागणाऱ्या मनुष्याच्या या प्रवृत्तीची शेकडो प्रत्यंतरे तुम्हाला तिथे मिळतील. उदा. हे खानावळवाले मामासाहेब खाडे! पाने वाचण्यापेक्षा वाढणे हाच ज्याच्या जीविताचा स्थायीभाव, त्या सद्‌गृहस्थानेहि मचाच्या शिंग्याप्रमाणे आपल्या उजवीकडल्या टेबलावर जाडजूड ग्रंथांची भलीमोठी चळत ठेवलेली दिसून येत आहे. याज्ञवल्क्य स्मृति काय, मंडुकोपनिषद् काय, तैत्तरिय संहिता काय! अग्निहोत्री राजवाड्यांनी मरताना आपल्या ग्रंथसंपत्तीचा वारसा या प्राण्याकडे सोपविला की काय असे त्या थाटामाटावरून वाटल्यावाचून रहात नाही. पण 'कणिक-नीतीत' पोळ्या लाटण्यासंबंधी ऋषिमुनींनी काही लिहून ठेवले असेल या श्रद्धेने मामांनी ते प्रकरण चाळून पाहिले होते हा नाजूक किस्सा ज्यांना ठाऊक आहे ते मामांच्या 'ज्ञानयोगाचं' यथार्थ मूल्यमापन केल्यावाचून कसे राहतील? मामांनी खरं म्हटलं तर गल्ल्यावर बसूनच आपला 'फोटू' काढून घ्यायला हवा होता! त्यांनी आयुष्यभर मनोभावे केलेली तीच खरीखुरी 'साधना' नव्हती का? ही चंद्रा नायकीण, हे परब मास्तर, हा म्हादू पहिलवान, हे नटवर्य पांडोबा, यांपैकी कुणीहि आपल्या फोटोत स्वतःच्या व्यवसायाचं वा जीवनव्यवसायाचं पुसट प्रतिबिंबहि पडू दिलं नाही. प्रत्येकानं अस्सल दडवून ठेवून नकली जीवननिष्ठेचंच प्रदर्शन करण्याचा जणू विडा उचलला होता! चंद्रानं भंग्याच्या संपात सामील झाल्याचा बहाणा करून हातात झाडू घेतला आहे; म्हादू पहिलवानानं गांधी सप्ताहानिमित्त पेळू पिंजण्याची दीक्षा घेतल्याचा आविर्भाव आणला आहे; त्रिताल आळवायचा असतो की वाजवायचा, याविषयी सदा संदेहावस्थेत असणाऱ्या परब मास्तरांनी पुढ्यात हार्मोनियम घेऊन आपली छबी उतरविली आहे. असे एक ना दोन, किती म्हणून नमुने सांगावेत?

प्रखर सत्याकडे उघड्या डोळ्यानी निर्भयपणे पहायची सवय दिवसेंदिवस नष्ट होत चालल्यामुळे म्हणा वा कल्पनेनं निर्मिलेल्या सत्याचा मधुर साक्षात्कार अनुभवायची मनाला चटक लागल्यामुळे म्हणा, वास्तवापासून क्षणाक्षणाला आम्ही दूर दूर जात आहोत. एरवी कालगतीनं सिद्ध झालेल्या सत्याकडे, निश्चित केलेल्या सिद्धान्ताकडे साशंकतेनं, बुजरेपणानं पाहण्याची दुर्बुद्धि आम्हाला का आठवली असती ?

रक्ताचा थेंबहि न सांडता स्वातंत्र्य मिळाल्याची कल्पना कितीहि मोहक असली तरी ती खरी नव्हे, इतिहासाला धरून नव्हे, हे कितीजणांच्या ध्यानात रहाते ? उलट, अहिंसेच्या मार्गाने स्वराज्य संपादन केल्याची मोहक पण मिथ्या भाषाच आमच्या मनाला भुरळ घालीत आली नाही का ? बलोद्धतांच्या प्रमादाची उपेक्षा करताना क्षमावृत्तीपेक्षा आमच्या भीरुतेचं नि दुबळेपणाचं ओंगळ प्रदर्शन होत आहे हे भीषण सत्य आम्ही आजवर दुर्लक्षित करीत आलो नाही का ?

पोटाला चिंध्या गुंडाळून गर्भारपणाची सुखस्वप्ने पाहणाऱ्या वंध्या स्त्रीचा मर्मभेदी उपहास तुकोबारायांनी एका अभंगात केला आहे ना ? आसन्नप्रसवेच्या वेदनांचे नाटक करणारी ती ढोंगी निपुत्रिका नि आभासात्मक सत्यावर प्रीति करणारे आम्ही यांच्यात कोणते अंतर आहे ? आणि मग शहरी संस्कृतीच्या प्रभावाने खेड्यापाड्यांना येत चाललेली अवकळा नेणिवेत बुडवून त्यांच्या रमणीयतेचं नि निरामयतेचं कल्पनाचित्र रेखाटणाऱ्या बिचाऱ्या लेखकालाच काय म्हणून दोष द्यायचा ? प्रत्यक्षाकडे पाठ फिरवून ग्रामीण जीवनाची काल्पनिक चित्रं रेखाटणारे कविलेखक काय, पोटाभोवती चिंध्या गुंडाळून गर्भारपणाचा आव आणणारी निपुत्रिका काय किंवा जीवनाच्या इतर क्षेत्रात वावरतांना वास्तवाऐवजी अवास्तवाच्या ध्यासानं वेडावणारे तुम्ही आम्ही काय, सारे एकाच माळेचे मणी म्हणावयाचे !

विवेक, विजयादशमी विशेषांक १९६१

*

# ६. नवा अर्थ

मुंबईतल्या त्या टिचभर जागेत फर्निचरची मनाजोगती कलात्मक मांडणी करता येईनाशी झाली म्हणजे मी मनाशी म्हणत असतो—'खुराड्यात कबूतरांनी रहायचं असतं, चंडोलांनी नव्हे!'

फर्निचरचाच काय, पण कुठल्याहि गोष्टीचा षोक मुंबईच्या चाळींत जोपासता येणं कठीण असल्याचं आजपर्यंत माझ्या अनुभवास आलं आहे.

स्त्री–पुरुषांच्या शरीरांना सूक्ष्म गंध असल्याचं वैद्यकशास्त्र सांगत आलं आहे. मृगनक्षत्राच्या वेळच्या मृद्‌गंधासंबंधीहि थोड्याथोडक्या कवींनी प्रशंसोद्गार काढले नाहीत! पण फिनाईल, डी. डी. टी. अन् झुरळनाशक पावडरीच्या संमिश्र, उग्र दर्पानं नाकीं नव आलेल्या माझ्यासारख्या मुंबईकराला या सत्याचा कसा पडताळा यावा?

विजेवर रेडिओ चालतो हा झाला वैज्ञानिकांचा अनुभव. पण कुठल्याहि चाळकऱ्याला विचारा, तो तुम्हाला याच्या उलट आपलं मत सांगेल!

रेडिओ लावून एखादं सुंदर भावगीत ऐकत बसावं, तोच गॅलरीत कोळशाच्या पोत्याला पोतं किंवा नळावर भांड्याला भांडं लागून त्या घर्षणातून विजा कडकडू लागाव्यात अन् मग वैतागानं रेडिओ बंद करून चडफडत बसण्याची पाळी यावी हा माझ्याप्रमाणं कोणत्या भाडेकरूला अनुभव आला नसेल?

एखाद्या वाचलेल्या सुंदर ग्रंथावर किंवा नियोजित लेखनविषयावर तास–तास एकांतांत विचार करीत पडून राहणं हा माझा विद्यार्थीदशेपासून अगदी आवडता चाळा होता. पण मुंबईला आल्यापासून चिंतनसमाधी राहोच, साधी डुलकी घेण्याइतका निवांतपणाहि गेल्या कित्येक वर्षांत मला मिळालेला आठ-

चत नाही! घरमालकांनी फुटलेली टाकी दुरुस्त केल्याचं किंवा एखाद्या आठवड्यात बिनखड्यांच्या तांदुळाची विलक्षण जात रेशनच्या दुकानात आली असल्याचं अद्‌भुतरम्य स्वप्न मिटल्या डोळ्यांपुढे तरळत असावं, तोच चाळीतल्या गोंगाटानं (यात मुलांच्या रडण्यापासून तो मातांच्या ओरडण्यापर्यंत, प्रेमिकांच्या भावगीतापासून तो पेन्शनरांच्या खोकल्यापर्यंत आणि कलहांतरितेच्या पाय आपटण्यापासून तो रामा गड्याच्या भांडी आदळण्यापर्यंत साऱ्या आवाजांचा समावेश होतो!) त्या स्वप्नाच्या ठिकऱ्या उडाल्यात हा आमचा मुंबईकर रहिवाशांचा नित्याचाच अनुभव आहे!

त्या दिवशी मला आमच्या चाळींचा राग आला तो निराळ्याच कारणानं! माझ्या एका मित्रानं एका अमेरिकन स्त्रीचं सुंदर चित्र भेट म्हणून मला दिलं होतं. पण ते आमच्या चाळींच्या दगडी भिंतीवर कसं टांगायचं? तब्बल तासभर खटपट करूनहि कुठंच खिळा रोवला जाण्याचं चिन्ह दिसेना. तेव्हा मी चिडून मनाशी म्हटलं,

'सुलतानांनी दुष्मनांना दगडी भिंतीत चिणून ठार केल्याच्या क्रूर घटना इतिहासातच वाचायला नकोत काही! हौसेनं चार चित्रं घरात लावू पाहणाऱ्या माझ्यासारख्याच्या कलात्मक वृत्तीची दगडी भिंतीत होणारी गळचेपीहि तितकीच अनुकंपनीय नाही का?'

खिन्न मनानं मी ते चित्र टेबलावर ठेवलं अन् त्याकडे टक लावून पहात राहिलो. गोकर्णाच्या पाकळींप्रमाणं शोभणारे त्या लावण्यलतिकेचे निळसर डोळे, गुलमोहराची आठवण करून देणारी लालचुटक जिवणी, सकाळच्या उन्हात न्हाऊन निघालेल्या भाताच्या रोपट्याप्रमाणं चमकणारा सोनेरी कचपाश आणि साऱ्या अवयवांतून ठळकपणे दृग्गोचर होणारे तिचे ते मोहक, पुष्ट स्तन...!!

... चाळीशी उलटली असूनहि आस्थेनं सौंदर्याची निगा राखणाऱ्या त्या पाश्चात्य सुंदरीच्या रसिकतेचं मनाशी कौतुक करता करता मी एकदम चपापलो!

अवयवाचं सौष्ठव कायम राहावं म्हणून जन्मभर अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या त्या अमेरिकन स्त्रीची सौंदर्यलोलुपता काय किंवा तिच्या रूप-

संपदेचे कण अधाशीपणानं डोळ्यांनी टिपून घेणारी माझी रसिकता काय, दोन्ही जीवनपराङ्मुखच म्हणू नयेत का ?

साहित्य, संगीत, नृत्य यात रममाण होणारी माझी वृत्ती कलात्मक खरी, पण ती जीवननिरपेक्ष असल्याची दाहक जाणीव माझ्या अंतःकरणाला पोळू लागली !

लेखन करताना मनासारखा शब्द सापडला नाही अगर कल्पना सुचली नाही म्हणजे मी रात्रभर अंथरुणावर तळमळत पडतो ! पण त्या जागरणानं डोळ्यात चढणारी लाली लेखनात कोठून उतरणार ? त्यासाठी अक्षरशः स्वतःच्या रक्तानं काव्यपंक्ति लिहिणाऱ्या गुणाढ्य कवीची ज्वलंत निष्ठाच हवी !

माझ्या लिहावयाच्या मेजावरली एखादी वस्तु इकडची तिकडे झाली किंवा खोलीत आमच्या दिलीपनं केरकचरा केला की डोक्यात राख घालून घेण्यापर्यंत माझ्या सौंदर्यदृष्टीची मजल जात असते ! पण हाती खराटा घेऊन समाजाला स्वच्छतेचे धडे देणाऱ्या सेनापति बापटांसारख्या ऋषितुल्य, महापुरुषाच्या ठिकाणची जीवनासक्ति पाहिली म्हणजे वाटू लागतं, विरक्तीच्या पार्श्वभूमीवर खुलून दिसणारं सेनापतीसारख्या जीवननिष्ठेचं भव्योदात्त चित्र; कुठं नि घरात केर झाल्याच्या एवढ्याशा कारणानं डोक्यांत राख घालू पाहणाऱ्या माझ्या तकलुपी सौंदर्योपासनेच्या पार्श्वभूमीवरील लटक्या वैराग्याचं विद्रूप चित्र कुठं !

धुळीनं लिंपित झालेल्या बालकाच्या अवखळ वृत्तीत काव्य गवसायला कालिदासाची दिव्य प्रतिभा किंवा आईचं विशाल हृदयच जन्मास यावयास हवं ! माझ्यासारख्याच्या जडवादी सौंदर्यदृष्टीला त्यात काव्याऐवजी ' हायजिन '-च्या तत्त्वाचाच आढळ व्हावयाचा !

माझ्या संग्रही असलेलं एका इटालियन शिल्पकाराच्या हातचं नग्न स्त्रीचं मॉडेल सर्वोदयवाद्याच्या गांभीर्यानं कुणी पाहू लागला म्हणजे त्याच्या अरसिकतेला मी मनातल्या मनात हसे. पण माझ्या त्या अरसिक मित्रांपैकी कित्येकांना अर्धनग्न हिंदी जनतेच्या चालत्याबोलत्या चित्राचं जवळून दर्शन घेण्याइतकी सहृदयता नि अवलोकनशक्ति लाभली होती या वस्तुस्थितीचा मला पत्ताहि नव्हता !

नित्याच्या वापरासाठी चोखंदळपणानं अत्तराची निवड करणाऱ्या माझ्या

सुगंधप्रिय वृत्तिपेक्षा भंग्यांच्या वस्तीत मुक्काम करणारी युगंधराची साधना अधिक जीवनाभिमुख होती यात तिळमात्रहि शंका नाही!

एखाद्या नायकाच्या शयनागाराचं वर्णन करताना आम्ही लेखक मारे सुंदर वेलबुट्टी काढलेले उशीवरले मखमलीचे अभ्रे अन् परांच्या गाद्या यांचा अपूर्वाईनं उल्लेख करीत असतो. शरपंजरी विद्ध होऊन पडलेल्या महर्षींच्या योगनिद्रेतली महान् कलासिद्धी राहोच, ढेकणाच्या खाईत रकट्यावर घोरत पडलेल्या अगर श्रमजीवी मजुराच्या 'कर्मयोगातलं कौशल्य' जाणण्याइतकी साधी माणुसकीहि आज आमच्यात शिल्लक राहिली नाही!

साहित्य, चित्र, शिल्प इत्यादींच्या षोकाप्रमाणेच मी आपल्या गानलुब्ध वृत्तीचेहि आजवर असेच चोज पुरवीत आलो आहे. एखाद्या गायिकेच्या कंठातून दाणेदार तानेची श्रुतिमनोहर निपज झाली म्हणजे ती कर्णसंपुटात साठवून ठेवण्यासाठी किती अधीर, किती उतावळा होत असतो मी! पण सभोवती उठणारे पीडितांचे विलाप, भयभीतांच्या किंकाळ्या, दलितांचे टाहो, अपहृत स्त्रियांचे हंबरडे, रुग्णजर्जरांचे कण्हणे, अपंगांचे निःश्वास...या साऱ्या भीषण, विराट सुरावटीतून प्रतीत होणाऱ्या जीवनभैरवीकडे मी कधी लक्ष दिले नाही हा माझ्या अरसिकतेचा, हृदयशून्यतेचाच पुरावा नव्हे काय?

माझी नृत्यकलेबद्दलची आवडहि याच प्रकारची म्हणावी लागेल. एखाद्या नृत्यांगनेचे कमनीय पदविन्यास पाहात असता नि तिच्या पायातील नूपुरांचा मंजुळ झणत्कार ऐकत असता पार्थिवतेचे पाश तटातट् तोडून एका निराळ्याच अलौकिक विश्वात वावरत असल्याचा विलक्षण सुखद संभ्रम माझ्या मनाला होत असतो! पण काही झालं तरी विश्वाच्या पुनर्रचनेपूर्वी साऱ्या जुन्या सृष्टीला भस्म करू पाहणाऱ्या प्रलयंकर महादेवाच्या तांडवनृत्यात ज्या जीवनदर्शी कलात्मकतेचा उत्कट आविष्कार झालेला असतो त्याच्या सहस्रांशानंहि माझ्या नर्तनविषयक प्रीतीत दिसून येऊ नये हे विचार मनाला अस्वस्थ करून सोडतात.

भगवान शंकराची तांडव नृत्यातली कला जेवढी भव्य तितकीच त्याची 'रसज्ञता'हि असाधारणच म्हटली पाहिजे! फुलाफुलातला मकरंद लुटणाऱ्या मधुकराशी आम्ही कलावंत आपलं नातं जोडीत असतो! पण मधुकराशीच काय, एखाद्या मारवाड्याच्या घराण्याशी कलावंतानं आपलं नातं जोडलं म्हणून

त्याची ‘ रसप्रीति ’ विश्वकल्याणासाठीं हलाहल प्राशन करणाऱ्या नीलकंठाच्या दिव्य अभिरुचीशी बरोबरी करू शकेल काय ?

सीतामाईनं स्वतःच्या कंठातला मुक्ताहार हनुमंताला प्रेमानं बक्षीस म्हणून दिला, तेव्हा त्यातला प्रत्येक मणी फोडून त्याने आत रामाची मूर्ति गवसते की काय हे पहावयास आरंभ केला. मारुतीरायाच्या या कृत्यात माकडचेष्टेपेक्षा सौंदर्याविषयीचं एक मौलिक तत्त्व अनुस्यूत झालं आहे असं मला वाटतं. ज्या सौंदर्यात जीवनानुभूति नाही त्यात मारुतीला राम वाटू नये हेच स्वाभाविक नव्हतं का ?

सबंध युरोपखंडभर ज्या ऑस्कर वाईल्डच्या कलेचा नि कलाविषयक मतांचा बोलबाला झाला होता, त्याच्यासंबंधी महात्मा गांधींना इंग्लंडमध्ये कुणीतरी मत विचारलं, तेव्हा महात्माजींनी त्याला उत्तर दिलं होतं, ‘ ऑस्कर वाईल्ड हा कलावंत आहे मी मान्य करतो, पण मानवी जीवनाशी जोपर्यंत त्याची कला सुसंवादी राहू शकत नाही तोपर्यंत त्याच्याबद्दल मला कधीहि आकर्षण वाटणार नाही ! ’

टॉलस्टॉय, रस्किन इत्यादि थोरथोर व्यक्तींनीहि महात्माजींप्रमाणंच कलेविषयीचा आपला दृष्टिकोन व्यक्त केला आहे.

पंतकवींच्या वाग्विलासातलं पाटव डोळ्यांना क्षणभर दिपवील, पण त्या डोळ्यात तृप्तीचे अश्रू तरळायला जिवंत जिव्हाळ्यानं ओथंबलेली तुकोबारायांची कवित्वकलाच हवी !

प्रमदेच्या पुष्ट स्तनात यौवनाला भुलविणारी जादुगिरी असेल, पण साऱ्या मानवतेला मंत्रमुग्ध करण्याचं सामर्थ्य वत्सल मातेच्या पान्हावलेल्या स्तनयुग्मांतच एकवटलेलं आहे, हे विसरून कसं चालेल ?

त्या दिवशी, मोठ्या प्रयासानं भिंतीला खिळा रोवून मी ते चित्र तिथं टांगलं खरं, पण ते केवळ मित्रानं प्रेमानं दिलेली भेट दृष्टिआड करण्याचं माझ्या जिवावर आलं म्हणून !

बाकी, मी त्या चित्राकडे जेव्हा जेंव्हा पहातो तेव्हा त्या अमेरिकन स्त्रीची छबी तिथून नाहीशी होऊन त्या जागी एक गलितगात्र, लेकुरवाळी स्त्री प्रकट झाल्याचा विलक्षण आभास—छेः, मनाला पटलेला रसिकतेचा नवा अर्थ—रंगरूप धारण करून दृष्टिसमोर तरळू लागतो !

★

वसंत, १९५३

## ७. चक्रवाकाची व्यथा

शस्त्रक्रियेच्या मेजावर बसताना माझ्या पोटात भीतीचा गोळा उठला होता नुसता! धडधडत्या अंतःकरणानं बोहल्यावर चढणारी वधू किंवा परीक्षेच्या दालनात प्रवेश करणारा विद्यार्थी यांच्यापेक्षा वधस्तंभाकडे जाणाऱ्या चारुदत्ताचीच अवस्था मी अनुभवीत होतो!

आधीच दवाखान्याविषयी माझं फारसं अनुकूल मत नव्हतं. 'माणसाच्या मरणाचा मार्ग डॉक्टरच्या घरावरून जातो' हे गडकऱ्यांच्या एका सुभाषिताच्या चालीवर माझ्या एका मित्रानं रचलेलं नवं सुभाषित आणि अशा अर्थाची दुसरी अनेक वचनं पाहून इस्पितळाविषयी माझं मत अधिकच प्रतिकूल बनलं. 'डॉक्टर मारी त्याला कोण तारी?' 'गुण नको, पण बील आवर,' 'यमाची व्हावं शिकार, पण डॉक्टरचा होऊ नये पेशंट' वगैरे म्हणी अन् वाक्प्रचार ऐकल्यावर दवाखान्याविषयी मनात अढी न बसली तरच नवल! त्यातून ऑपरेशनसारखा प्रसंग— प्रसंग कसला? असंगाशी संगच म्हणायचा तो!

तो टळावा म्हणून गेली दोन तीन वर्षे टॉन्सिल्सवर (घशातल्या गाठी) निरनिराळे बाह्य उपचार करून पाहिले. आयुर्वेदापासून यूनानीपर्यंत नि होमिओपाथीपासून बायोकेमिस्ट्रीपर्यंत सर्व पद्धती पालथ्या घातल्या. पण एकीचीहि मात्रा लागू पडली नाही! सर्व औषधं रामबाणाऐवजी बूमरँग ठरली!

होमिओपाथीच्या डॉक्टरांनी त्यांच्या चिकित्सापद्धतीस अनुसरून माझ्या नाडीऐवजी आमच्या घराण्याचा इतिहासच तपासला! त्यांचं म्हणणं पडलं, 'आर्यांची उत्तरेकडील बर्फमय प्रदेशातली मूळ वसाहत, माझ्या आजोबांची तोंड उघडं टाकून घोरण्याची सवय नि माझी आईसफ्रूटची आवड या तिन्ही

कारणांच्या प्रतिक्रियात्मक प्रक्रियेतून (का प्रक्रियात्मक प्रतिक्रियेतून कुणास ठाऊक!) माझ्या वशांत शीतग्रंथी (कोल्ड ग्लँड्स) उद्भवल्या.'

इतर पद्धतींच्या बाबतीतहि थोड्याफार फरकानं मला हाच अनुभव आला असल्यामुळं केवळ नाईलाजास्तव मी शस्त्रक्रिया करून घ्यायला तयार झालो.

ऑपरेशनच्या आदल्या रात्री सारखा या कुशीवरून त्या कुशीवर होत होतो मी! रात्र ही विरहीजनांची वैरीण असते, असं लेखक-कवि सांगत असतात. विरहीजनांच्या जोडीला रुग्णाईतांचाहि उल्लेख करायला हवा असं आता मला वाटू लागलं!

शेजारी पत्नी आणि मुलं गाढ झोपली होती. इकडे मी अंथरुणावर उद्याच्या चिंतेनं तळमळत पडलो आहे, अन् बायको-मुलं मात्र खुशाल...

त्या विचारासरशी माझ्यातला वेदांती खडबडून जागा होऊन 'का ते कांता कस्ते पुत्रः संसारोऽयमतीव विचित्रः' इत्यादि चरण गुणगुणू लागला. उद्या-पासून डॉक्टर आपल्याला नुसत्या चहावर रहायला सांगणार अन् माझी पत्नी, मुलं मात्र वालाची उसळ, काकडीची कोशिंबीर, वाटल्या डाळीचं थालीपीठ...

आठ दिवस अन्नावाचून काढायची कल्पनाच मला शक्य कोटीतली वाटेना. एखाद्या रविवारी जेवणाला नेहमीपेक्षा थोडासा उशीर होताच दुर्वासाच्या क्रुद्ध नजरेनं पत्नीकडे पाहणारा, कम्युनिस्टाच्या पोटतिडकीनं 'भूक! भूक!' म्हणून केस पिंजारून अन् मुठी आवळून घरभर थैमान घालणारा आणि इतिहाससंशोधकाच्या चिकाटीनं फळीवरले डबे धुंडाळणारा हा जीवात्मा उद्या उपवासाला कसा तोंड देणार हेच मला कळेना.

उपवासाइतकंच आणखी दोन गोष्टींच्या बाबतीत मला मोठं संकट पडलं होतं!—ऑपरेशननंतर बर्फ घालून थंड केलेला चहा पिणं, अन् दोन-तीन दिवस कुणाशीहि एक शब्दहि न बोलणं—

एक वेळ कढीबरोबर बिस्किटं किंवा आंबरसाबरोबर पापड खाता येतील, पण चहाबरोबर बर्फ? छे:!

ईश्वर आणि लेखक यांनाच विरोधाभास अलंकार आवडतो अशी माझी आजपर्यंत समजूत होती. पण थंड चहाच्या प्याल्याचं चित्र डोळ्यापुढे तरळू लागताच तो अलंकार डॉक्टरांच्याहि आवडीचा असल्याची मनानं ग्वाही दिली!

तसं पाहिलं तर मौनवृत्ति हाहि मनुष्याचा अलंकार आहे यात शंका नाही! पण कर्णाला जन्मतःच मिळालेल्या कवचकुंडलासारखा तो उपजत मिळाला असला तरच त्याची शोभा नाहीतर माझ्यासारख्या शाळामास्तरापासून तो शेअरबाजारातल्या दलालापर्यंत, विद्वत्परिषदेतल्या आचार्यापासून तो खाणावळीतल्या आचाऱ्यापर्यंत, आणि खुंटावरच्या न्हाव्यापासून तो गुत्त्यातल्या दारूबाजापर्यंत सर्वांच्याच बाबतीत मौन हे अलंकाराऐवजी गळफासासारखं ठरणारं आहे!

खाण्यापिण्याच्या बाबतीत एक वेळ जिभेवर नियंत्रण घालता येईल, पण तिच्या भाषणस्वातंत्र्यावर गदा आणणं महाकर्मकठीण! मानवालाच काय, पण ईश्वरालाहि वाचाळाची तोंडं बंद करता येत असल्याचं सर्टिफिकेट अजून कुण्याहि सुभाषितकारानं बहाल केलेलं नाही! मौन म्हणजे तोंडच्या गोष्टी नव्हेत हे एकापेक्षा अनेक अर्थांनी मला पटलं आहे!

एक ओळखीची स्त्री–डेंटिस्ट माझे दात तपासीत असता, 'पुरुषांना तोंड मिटायला भाग पाडणाऱ्या स्त्रियांना फक्त लेडी–डेंटिस्टच काय त्या अपवाद असतात' असं तिला म्हणून दाखवण्याचा मोह जिथं मला आवरता आला नव्हता, तिथं जिभेला लगाम घालण्याची कल्पना शक्य कोटीतली कशी वाटावी ?

एका सामाजिक नाटकात मी हृदयक्रिया बंद पडून मरण पावल्याचा करुण प्रसंग वठवीत असता, 'आई, काय झालं ग आपल्या भाऊंना?' असं नाटकातल्या मुलीनं विचारतांच ताडकन्, 'हृदयक्रिया बंद पडून मरण पावलो बरं बाळ!' असं मी अनवधानतेनं उत्तर दिलं ते माझ्या वाग्विलासप्रियतेचंच निदर्शक नव्हतं का ?

या माझ्या स्वभावदोषामुळेच मी स्टुडिओ अन् सलून शक्यतो टाळीत आलो आहे! कॅमेऱ्यासमोर हंसरा चेहरा करताकरता रडकुंडीला आल्यावर फोटोग्राफरनं 'स्टेडी प्लीज' म्हणताच अस्मादिकांच्या मुखातून 'छान झालं बुवा' असा उद्गार बाहेर पडावा अन् ओठांची हालचाल झाल्यामुळं फोटोग्राफरमहाशयांनी कपाळावर हात हाणून घ्यावा असं आजपर्यंत अनेकदा घडलं आहे!

सलूनमध्ये शिरल्यावरहि असाच नमुनेदार अनुभव मला घ्यावा लागतो.

कारागिराचा वस्तरा ओठावरून फिरत असतांना, ‘ स्वदेशी हत्यार नाही ना रे बाबा तुझं ! ’ असा उगीचच खवचट प्रश्न विचारण्याचा मला एकदा मोह झाला अन् त्या देशद्रोहाच्या पातकाबद्दल नंतर तीन-चार दिवस मला डॉक्टरकडे मलमपट्टी करून घेण्यासाठी जावं लागलं !

शस्त्रक्रियेच्या मेजावर चढून बसताना हे सारे अनुभव आठवून मी अधिकच काळजीत पडलो.

...ऑपरेशन सुखरूपपणे पार पडेल ना ? की एका गावठी दंतवैद्यानं रोग्याचा दुखरा दात काढता काढता त्याची मानच छाटून टाकली असा मार्क ट्वेनच्या विनोदी गोष्टीत एक प्रसंग आहे तसं...पुढ्यातल्या स्टुलावर ठेवलेली लखलखत्या पात्यांची शस्त्रसामुग्री दृष्टीस पडताच भीतीनं गपकन् डोळेच मिटले मी !

आठवतील तेवढ्या देवदेवतांची नावं घेऊन मी तोंड उघडलं अन्...

अन् काय आश्चर्य ? अवघ्या पंचवीस मिनिटांच्या आतच शस्त्रक्रिया आटोपली आणि मी माझ्या कॉटवर जाऊन पडलो. पायातला काटा काढताना जे शल्य अनुभवावं लागतं तेवढंसुद्धा ऑपरेशन होत असताना मला अनुभवावं लागलं नाही. ऑपरेशनच्या वेळी पेशंट सावध असल्यास तो डॉक्टरांचा हात धरून त्यांच्या कामात अडथळा आणतो, दुसरीकडे तोंड वळवतो, तोंडावाटे रक्त येऊ लागताच मूर्छित होतो, इत्यादि अनेक खऱ्याखोट्या गोष्टी मी ऐकल्या होत्या, पण त्यापैकी काही–काहीसुद्धा माझ्या बाबतीत घडलं नाही !

घशात साचलेलं रक्त थुंकून टाकताना किंवा आवंढा गिळताना दुपारी थोडा त्रास होत होता खरा, पण तो ‘ न भूतो न भविष्यति ’ अशा स्वरूपातला मला मुळींच वाटला नाही. बर्फ घातलेला चहा पिववणार नाही असं वाटत होतं; पण अनुभवानं तीहि कल्पना खोटी ठरली. जखमांनी घसा दुखत असल्यामुळं उष्ण पेयावरली वासनाच उडाली होती !

दुसऱ्या दिवशी सकाळीं ब्रेडबरोबर ब्रह्मांडहि आठवेल असं वाटलं होतं; पण तसं काही झालं नाही. शरीरावर आत्म्याचा विजय होत चालल्याच्या जाणिवेनं मनातल्या मनात आनंदून गेलो. पण दुसऱ्याच क्षणी वाटलं, सृष्टींतलं कावळे सकाळी ओरडत असले तरी पोटातल्या कावळ्यांची कावकाव दुपारीच सुरू होत असते. आपल्यासारख्या शाळामास्तरला वर्गातल्या पन्नास विद्यार्थ्यांचा

आरडाओरडा एका मिनिटात थांबवता येत असला तरी मध्यान्हीची ही कावकाव--

पण काय आश्चर्य ? सकाळच्या ब्रेडप्रमाणं दुपारच्या जेवणाचा मोहहि मी सहज टाळू शकलो. नुसत्या भाताचाच नव्हे, तर बातांचा हव्यासहि माझ्या जिभेनं आवरता घेतला !

एरव्ही बायकोनं अबोला धरल्यावर स्वगत भाषणाच्या पुनरुज्जीवनाची ढाल पुढे करून ( उदाहरणार्थ, ' हे आर्यपुत्रे ! आज आमटीत मीठ घालावयाचे राहून गेले आहे असे नाही तुला वाटत ? ' किंवा, ' बा मना ! तुझ्या छत्रीचे टाके उसवले आहेत, ते कोण बरे पुनः ठाकठीक करणार ? ' इ. इ. ) मी जिभेचा पट्टा चालवीत असतो ! पण त्या दिवशी अंथरुणावर पडल्यापडल्या एकाग्रतेने एका लघुकथेचं कथानक मनात घोळवीत होतो.

त्यानंतरच्या दोन-तीन दिवसात मी इतकं वाचन नि चिंतन करू शकलो की तुरुंगाच्या खालोखाल दवाखाना हेच साहित्यसेवेसाठी योग्य ठिकाण आहे अशी माझी खात्री झाली. दोन दिवसांच्या लंघनानं अशक्तता आली होती खरी; पण त्यामुळंच शरीरशुद्धी होऊन एक प्रकारचा उत्साह वाटू लागला !

गेले कित्येक दिवस ऑपरेशनच्या प्रसंगाचं जे चित्र—चित्रं कसलं, बुजगावणंच ते—मी आपल्या मनश्चक्षूंसमोर उभं केलं होतं, त्यातली अवास्तवता लक्षात घेऊन आता मला हसू येऊ लागलं. कल्पकतेच्या पोटी कवितेप्रमाणंच भीरुताही जन्माला येते हेच खरं ! आपली पुष्कळशी दुखं काल्पनिक स्वरूपाची असतात हे थोड्याशा अंतर्मुख वृत्तीनं विचार केल्यास सर्वांना पटण्यासारखं आहे.

चक्रवाक पक्षी व त्याची मादी यांच्यात फक्त कमळाची पाकळी आड आली तरी ती दोघं रात्रभर विरहव्यथेनं टाहो फोडीत असतात असा एक कविसंकेत आहे ना ? त्या पक्ष्याच्या संवेदनेप्रमाणंच आपल्या कित्येक मनोव्यथा कल्पनेतून उगम पावलेल्या असतात !

शुकनलिका-न्याय म्हणून एक न्याय साहित्यशास्त्रात प्रसिद्ध आहे. त्यातूनहि हेच सत्य सूचित झालं आहे. पोपटांना पकडण्यासाठी पारधी अशा काही खुबीनं रानात नळ्या टांगून ठेवतात की त्यावर ते पक्षी येऊन बसताच त्या त्यांच्यासह एकदम उलट्या व्हाव्यात. यामुळं भीतीनं गांगरून गेलेल्या पोपटांना

उडून जाण्याचं भानच राहत नाही. आपण पायांनी घट्ट धरलेली नलिका सोडली तर खाली पडून प्राणास मुकू ही कल्पित भीति त्यांच्या मनाला विद्ध करून सोडते, आणि बिचारे व्यर्थ पारध्यांची शिकार बनतात!

काव्यसृष्टीतल्या संकेत आणि न्यायाबरोबरच व्यवहारातला एक गद्यदृष्टान्त देण्याचाहि मोह मला इथं आवरता येत नाही. कुंभार आपल्या पांच-पंचवीस गाढवांना रात्रीच्या वेळीं एकत्र जमवून एका हातभर दोरीनं प्रत्येकाच्या पाया-भोवती सरकफासा घातल्याचं नुसतं नाटक करीत असतो. गाढवांना आपला एक पाय खरोखरच जखडला गेल्याचा भास होतो आणि रात्रभर उरलेली तीन-चतुर्थांश शक्ति एकवटून ते झुंजार वृत्तीचा सुकाळ करतात!

माझ्या ओळखीच्या एका स्त्रीनं लग्न झाल्यावर तब्बल अठरा वर्षं आपल्या घरात पाळणा हलू दिला नव्हता! अर्थात् तिच्या या धोरणाला अर्थशास्त्रापेक्षा गणितशास्त्रच अधिक जबाबदार होतं! हल्ली शेकडा नव्याण्णव बायका बाळंत-पणानं दगावतात असं कुणीतरी तिच्यासमोर आकड्यानिशी प्रसूतीतल्या धोक्या-वर प्रवचन केल्यामुळं बिचारीनं जो धसका घेतला तो जवळ जवळ दीड तप! पुढे मातृत्वाची उर्मी अनावर होऊन तिला निसर्गाच्या हाकेला ओ द्यावी लागली, हा भाग वेगळा!

मराठीत ग्रंथरचना करून स्त्रीशूद्रादिकांना मोक्षाची कवाडं खुली करून दिली तर आपल्याला नरकवास पत्करावा लागेल ही ज्ञानेश्वरकालीन पंडितांना वाटलेली भीतीहि कल्पनेच्या पोटीच जन्माला आली नव्हती का? आगरकरांनी सुधारणेची तुतारी फुंकली तेव्हा सनातन्यांच्या उरात जी धडकी भरली तिचं स्वरूपहि केवळ काल्पनिकच नव्हतं का?

—पण हे सत्य कळायला व्यक्तीनं काय, किंवा समाजानं काय, अंतर्मुख होऊन आत्मसंशोधन करायला शिकायला हवं.

मग त्या आत्मसंशोधनाचा ओनामा शस्त्रक्रियेसारख्या लहानसहान प्रसंगाच्या निमित्तानं होवो, वा दुसऱ्या कोणत्याहि कारणावरून होवो!

★

मोहिनी दिवाळी अंक, १९५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों. दि: ....................

## ८. कानपूरचे ते श्रोते

मुशायऱ्याचा कार्यक्रम चालू असताना काव्यगायकावर 'बहोत अच्छे !' 'माशाल्ला !' 'वाहवा ! वाहवा !' अशी प्रशंसोद्‌गारांची खैरात करणारे उत्तर भारतातले भाबडे श्रोते पाहिले म्हणजे माझ्या मनात कधी कधी असा विचार येतो, या दिलेर वृत्तीच्या मंडळींनी आपल्या रसिकतेचा पहिलावहिला आविष्कार केला असेल तो आपल्या जन्मदात्रीच्या मांडीवर पडून तिच्या लोरीला ( अंगाईगीत ) दाद देऊनच !

काय तो त्यांचा उतू जाणारा उत्साह ! काव्यगायकाच्या मुखावाटे एखादा शब्द निघायचा अवकाश, की तो अलगद झेलायला यांच्या 'वाहवां'च्या ओंजळी तयारच ! अर्थामागोमाग वाणी धावत येते असे प्रतिभासंपन्न साहित्यिकांच्या बाबतीत म्हटले जाते. पण उर्दू मुशायऱ्याच्या समारंभाच्या वेळी सर्वांत पुढे श्रोते नि त्यांच्यामागून अर्थ आणि वाचा असा धावण्याच्या शर्यतीतला क्रम असतो असं म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वरातीत सामील झालेले काही उत्साही वऱ्हाडी बँडबाजेवाल्यांच्याहि पुढे तुरुतुरु चालत जातात अन् पुन्हा मागे परततात. वर उल्लेखिलेल्या श्रोत्यांचा उत्साहहि याच जातीचा म्हटला पाहिजे.

काही वर्षांपूर्वी मी कानपूरला अखिल भारतीय शिक्षणपरिषदेच्या अधिवेशनासाठी गेलो होतो. त्यावेळी रसिकमंडळींच्या अघळपघळ दिलदारपणाचा मला असा काही अनुभव आला की तो या जन्मात मी विसरणार नाही. अधिवेशनासाठी जमलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी काही निवडक कवींच्या काव्यगायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यांत आला होता. एखाद्या कविरायांच्या

ओठांची नुसती हालचाल व्हायचा अवकाश, की इकडे साऱ्या श्रोत्यांची शरीरे घुसळून निव्वत! उत्कट काव्यामुळे रसज्ञांच्या बृत्ति हेलावत असतात अशीच आजपर्यंत माझी समजूत होती. पण बृत्तीबरोबर शरीरातील सारी हाडे अन् स्नायू ढवळून काढण्याचीहि त्याच्या ठिकाणी शक्ति आहे हा त्या दिवशी मला नवा साक्षात्कार झाला. हे श्रोते काव्यगायन ऐकत आहेत की पोटाच्या व मानेच्या व्यायामाचे प्रकार करीत आहेत हेच मला कळत नव्हते. कविमुखावाटे उमटणाऱ्या प्रत्येक शब्दावरून प्राण पाखडावयाला उत्सुक झालेल्या अन् कानावर येणाऱ्या शब्दागणिक तऱ्हेवाईक अंगविक्षेप करणाऱ्या त्या श्रोतृबृंदाकडे पाहताना, 'बोल भुजाही आविष्करे आलिंगावया' हा ज्ञानेश्वरांचा उद्गार असा वाच्यार्थाने प्रतीत होईल याची मला स्वप्नातहि कल्पना नव्हती. पण त्या श्रोत्यांच्या भाबडेपणाची मला त्या दिवशी खरी प्रचीति आली ती एक वृद्ध, चिडखोर कविराय रंगमंचावर येऊन उभे राहिल्यानंतर! 'इसे हटा दो यहाँसे पहले' असे शब्द त्या वृद्ध कवीच्या तोंडून बाहेर पडताच साऱ्या सभागृहात 'वाहवा! वाहवा!' चा एकच जल्लोष सुरू झाला. काहीतरी क्रांतिकारक, जोमदार विचार आता आपणाला ऐकायला मिळणार या कल्पनेने जो तो जीवाचे कान करून ऐकू लागला. पण लगेच त्यांचा भ्रमनिरास झाला. ते कविराज कार्यक्रमाच्या व्यवस्थापकांना म्हणत होते, 'अजी जनाब, इस माईकको यहाँसे हटा दो!' व दुसऱ्याच क्षणी ते श्रोत्यांकडे पहात म्हणाले, 'क्या अजीब बेवकुफी है यह! बिगडा हुवा माईक पोरोगराममे कबसे खलल डाल रहा है यह भी आप नही समझ सकते? अफसोस! बडा ताज्जुब है जो तालिया बजा रहे है आप!'

एखादीच्या तिरप्या नजरेच्या कस्यारीचं कौतुक करायला जावे तो ती जन्मतःच तिरळी असल्याचं ध्यानात यावं असाच काहीसा तो प्रकार घडला होता.

कोणाचीहि तोंडभरून तारीफ करणाऱ्या असल्या माणसांच्या औदार्याचा मला कधी कधी हेवा वाटतो. या उदारात्म्यांना कांद्याचा वास येवो नाहीतर केवड्याचा येवो, दोहोवरहि यांची मर्जी बहाल! यांच्या दृष्टीस ताजमहाल पडला तरी हे निहायत खुश, अन् पत्र्याची चाळ पडली तरी तितकेच खुश! माझ्या ओळखीचे एक सेवानिवृत्त मुख्याध्यापक आहेत. गृहस्थ तसा मोठा

बहुश्रुत नि मर्मज्ञ आहे. पण धोरण म्हणून म्हणा अथवा स्वभावातील जन्मजात सौहार्दामुळे म्हणा, ते सहसा कुणाच्याहि न्यूनाचा उच्चार करणार नाहीत. त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या काही शिक्षकानी एकदा एका ऐतिहासिक नाटकाचा प्रयोग केला होता. खरं म्हटलं तर प्रयोग यथातथाच झाला. नाटकांतील ऐतिहासिक वातावरणाशी समरस होण्याचा फारसा प्रयत्न कोणत्याच नटाने अगर नटीने केलेला दिसून येत नव्हता. येसूबाईने आपल्या चोळीला गळ्यापाशी फाऊन्टंन पेन अडकविलं होतं, संभाजीराजांनी तुळशीसाठी भरजरी शालूचा नजराणा पाठविला होता तो चक्क शहाडे-आठवल्यांची जाहिरात छापलेल्या कागदी पिशवीतून, आणि कवजी कलुषा खुशाल अंगरख्याच्या खिशातून ‘ व्हिक्स ’ची कांडी काढून मधून मधून हुंगीत होता. म्हणजे येसूबाईच्या हातात ‘ स्क्रिन ’चा अंक आणि संभाजी महाराजांच्या खांद्यावरून ट्रान्झिस्टरच काय तो लोंबकळायचा बाकी राहिला होता. असे असूनहि त्या मुख्याध्यापकांनी प्रत्येक नटाला अन् नटीला शाबासकी दिली होती. प्रत्येकाच्या कामाची मुक्तकंठाने स्तुति केली होती, एवढेच नव्हे, तर मध्यंतराच्या वेळी गौरवपर भाषण करून प्रत्येकाला लहान मोठे पारितोषिकहि दिले होते.

अशी माणसे एका अर्थी भाग्यवान खरी ! त्यांना रेशनिंगच्या तांदळातले खडे बोचत नाहीत; ‘ गवळ्याची करणी अन् दुधांत... ’ कायसे म्हणतात ती भानगड अस्वस्थ करून सोडीत नाही; खानावळीतल्या पोळ्यांच्या काठाविषयी यांना काहीच म्हणावयाचे नसते; किंवा एखाद्या नवशिक्या शिक्षकाने अफजुलखानाच्या वधावरला पाठ विद्यार्थ्यांपुढे देऊन शेवटी समवाय पद्धतीने (कोरिलेशन) पोटातल्या आंतड्याच्या रचनेशी मुख्य विषयाची सांगड घातली तरी त्याबद्दलहि त्यांची फारशी तक्रार नसते. सारांश, ज्याप्रमाणे होकायंत्र कसेहि फिरविले तरी त्यांतील सुईचे टोक उत्तर दिशेकडेच वळलेले असते, तसे कोणत्याहि परिस्थितीत या उदारमनस्क माणसांची वृत्ति संतुष्टतेकडे, समाधानाकडेच झुकलेली असते.

अशा माणसांचा मला हेवा वाटतो असे मी मघाशी म्हटले खरे, पण तो कधीकधी वाटतो असेहि त्याबरोबर मी म्हटले आहे. ज्या असमाधानी वृत्तीमुळे चोखंदळपणाची जपणूक मला करता आली, ज्या असंतुष्टतेमुळे अस्सलाविषयीची, चांगल्याविषयीची ओढ माझ्या मनात सदैव कायम राहू शकली,

त्या असंतुष्टतेला पारखे व्हावे असे मला कधीच वाटणार नाही. माझ्या या असमाधानी वृत्तीमुळे मी आजवर अनेकांचा रोष माझ्यावर ओढून घेतला आहे, अनेकांच्या टीकेचा विषय झालो आहे. काहीजण तर मला चक्क 'सिनिक्' ठरवून मोकळे झाले आहेत. अन् याला कारण काय, तर हल्लीच्या नाटककारांपैकी शंभरात एखादाच माझ्या पसंतीस उतरतो; हल्लीचे गायक गळा लावीत नाहीत, गळा काढतात अशी मी त्यांच्यावर टीका करतो; आजच्या साहित्याचे मूल्यमापन करताना कीलो नाही तर क्विंटल याशिवाय दुसरे निकष लावण्याची सोय राहिली नाही, असे ज्याला त्याला मी सांगत सुटतो; चिन्यांनी उत्तर सीमेवर हल्ला केल्यावर सिनेमा नटनट्यांना संरक्षणनिधि जमा करण्याच्या कामी झुंपणाऱ्या प्रशासकांचे लढाऊ वृत्तीपेक्षा विनोदबुध्दीशी अधिक जवळचे नाते आहे. अशी मी श्रद्धा बाळगतो.

या सर्व कारणांमुळे माझ्या परिवारातल्या मंडळींत आणि स्नेह्यासोबत्यांत मी अप्रिय ठरलो आहे. मला त्याची पर्वा नाही. आतेष्टांना केवळ बरे वाटावे म्हणून सद्सद्विवेकबुद्धीचा निवाडा अमान्य करावा हे मला पटत नाही. असल्या आत्मवंचनेने इतरांना न दुखवल्याचे थोडेफार श्रेय पदरी पडत असेल, पण त्याहेपेक्षा त्यांना फसवल्याचा जो प्रमाद अंगी चिकटण्याचा संभव आहे तो फार मोठा आहे असा माझा दृढ विश्वास आहे. भारतीय क्रिकेटसंघाचे परदेशी खेळाडूंबरोबर ब्रेबोर्न स्टेडियमवर जेव्हा सामने होतात तेव्हा ते पहाण्यासाठी मुंबईकर क्रिकेटशौकिनांची केवढी झुंबड उडते, स्टेडियमवर प्रवेश मिळावा म्हणून प्रत्येकाच्या जीवाचा केवढा आटापिटा चाललेला असतो, एकेका तिकिटासाठी शेसव्वाशे रुपये मोजणारे बहाद्दरहि अहमहमिकेने कसे पुढे येतात, हे सारे गेल्या वीस एकवीस वर्षांच्या मुंबईच्या वास्तव्यात मी पहात आलो आहे. असे असले तरी क्रिकेट शौकिनांच्या या मेळाव्यात सामील होण्याची मला कधीच इच्छा झाली नाही. क्रिकेटबद्दल मला नावड आहे म्हणून नव्हे, किंवा भारतीय खेळाडू क्रिकेटच्या खेळात कधीच चमकणार नाहीत अशा आशयाची टीका प्रत्यही कानावर येते म्हणूनहि नव्हे, तर मी विद्यार्थी-दशेत असतांना लक्षावधि प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे नायडू–देवधरांचे जे क्रीडानैपुण्य पाहण्याची मला संधि मिळाली होती, तसलं आता पहावयास मिळणार नाही, या नैराश्यपूर्ण जाणिवेतून आजची क्रिकेटविषयीचा

दा. क. ९७३६८

उबग माझ्या मनात निर्माण झाली आहे.

ज्या ज्या गोष्टीबद्दल मला आज फारशी उत्सुकता वाटेनाशी झाली आहे तिच्या मुळाशी हाच तुलनात्मक दृष्टिकोन आहे. नाटकाचीच गोष्ट घ्या. खेडे-गावात मंत्र्याच्या भाषणाला पाच श्रोते मारूनमुटकून आणून बसवावेत त्याप्रमाणे चार इकडच्या तिकडच्या—नटनटी गोळा करून कसेतरी आज नाट्य-प्रयोग उभे केले जातात. असल्या कामचलाऊ भाडोत्री कलावंतांनी नाट्यवस्तूचा विचका न केला तरच नवल! 'रक्ताने माखलेल्या हातांनी द्रौपदीची वेणी घालण्याची प्रतिज्ञा' करणाऱ्या रंगभूमीवरल्या पात्राला उद्देशून जिथे 'हे द्रौपदी नाटक नव्हे! सावित्री आहे!' असे विंगमधून सांगावं लागतं आणि, 'लेका तू भीम नाहीस आज, यमधर्मराज आहेस!' असा इशारा द्यावा लागतो तिथे त्या नाटकातल्या सत्यवानाला जीवदान मिळाले तरी एकंदर नाट्यवस्तूचा प्राण कंठाशी आल्याशिवाय रहात असेल का? नाट्यकलेशी इमान राखून जीवाभावानं ज्यांनी रंगभूमीची सेवा केली त्यांनी वठविलेले नाट्य-प्रयोग आठवले म्हणजे आजहि माझे हृदय भरून येते. गतकालातल्या त्या रम्योदात्त चित्राच्या तुलनेनं आजच्या नाट्यलीला पहिल्या म्हणजे अबलख वारूच्या शेजारी टांग्याला जुंपलेलं मरतुकडं घोडं उभं करावं तशातला प्रकार वाटतो. रंगभूमीच्या पडत्या काळातहि या कलावंतांचे इमान चळले नव्हते, निष्ठा ढळल्या नव्हत्या. कंपनीचा मुक्काम हलायचा असला म्हणजे सामानानं भरलेली पेटी डोक्यावर घेऊन ही मंडळी चिखल तुडवीत दुसऱ्या गावी जाई. रंगभूमीवर गाडाभर अन्न मागणाऱ्या बकासुराला दिवस दिवस नुसत्या चहावर काढावे लागत; अन् रात्री भरजरी पीतांबरात शोभणारा कृष्णकन्हैया दिवसा ठिगळे लावलेलं नि गाठी मारलेले धोतर नेसून खालच्या मानेने गावात वावरे!

या कलावंत मंडळींनी जन्मभर दैन्य भोगलं म्हणून त्यांना श्रेष्ठ म्हणायला हवं असं मला चुकूनहि सुचवावयाचं नाही. दैन्याचे चटके बसत असताहि यांची नाट्यतपस्या अभंग राहिली, अबाधित राहिली, हा त्यांचा खरा मोठे-पणा मला तुमच्या ध्यानात आणून द्यायचा आहे. कलेविषयीची ही अव्य-भिचारी निष्ठा, ही नितान्त श्रद्धा आज एका तरी नटाच्या वा नटीच्या बाबतीत दिसून येत आहे काय? मग, केवळ पोटभरू वृत्तीने या क्षेत्रात शिरून

कशीतरी सोंगं साजरी करणाऱ्यांबद्दल मला काय म्हणून आदर वाटावा? काय म्हणून मी त्यांचं कोडकौतुक करावं? तसेच गाण्याचेहि! मुंबईत इतके चांगले गाणे ऐकायला मिळते की, त्यामुळे सामान्य गायकगायिकांच्या बैठकीस हजर राहण्याचं माझ्या अगदी जीवावर येतं! उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी गेलो म्हणजे माझे जुने दोस्त मोठ्या हौसेने माझ्यासाठी एक-दोन मैफली घडवून आणीत असतात. मित्रांची माझ्याविषयीची ही आपुलकी पाहून मी भारावून जातो, अशा वेळी जुने स्नेहसंबंध अधिक दृढ होतात, हे सारे खरे आहे. पण 'याद पियाकी आये' अन् 'पन्नाशीची झुळुक लागली' ही दोन्ही एकाच तालासुरात नि ढंगात आळवणाऱ्या माझ्या त्या मित्रांच्या स्वरसाधनेला दाद देण्याचं साहस काही मला करवत नाही!

मुंबईतहि काही ठराविक, मोजक्या कलावंतांच्याच कार्यक्रमास हजर राहण्याचे मी कटाक्षाने ठरविले आहे. केसरबाई, बडे गुलाम अली, मोघूबाई, भीमसेन जोशी, कुमार गंधर्व अशा निवडक गायकगायिकांच्या स्वरविलासाने केव्हा केव्हा वृत्ति धुंद बनतात तेव्हा तेव्हा तुकोबारायांच्या अभंगातल्या पंक्ति मला हटकून आठवतात. त्यांनी म्हटले आहे, 'उदंड त्या झाल्या। गाई, म्हशी, शेळ्या। परि त्या निराळ्या। कामधेनु॥' तुकोबांनी ती मार्मिक उपमा कोणत्याहि संदर्भात दिलेली असो, आवाजाच्या दुनियेतल्या एकेका स्वरसम्राटाच्या ऐश्वर्याचा विचार करू लागलो म्हणजे त्या दृष्टान्ताची समर्पकता मला पटू लागते. झोपेतल्या घोरण्यासारखा खर्ज लावणारे नि तार सप्तकातल्या तानेचा नुसत्या हातवाऱ्याने सारांश सांगणारे अनेक बुवा अन् बाया 'उदंड त्या झाल्या' पैकीच मला वाटू लागतात!

एका हिंदी संतकवीचे एक पद आहे. बहुधा ब्रह्मानंदाचे असावे ते. 'हो तो ऐसा हो' असे त्या पदाचे पालुपद आहे. भक्त असावा तर असा असावा शत्रु असावा तर असा असावा, शूर असावा तर असा असावा, उदार असावा, तर असा असावा, असे सांगताना त्या त्या गुणाचा उच्चांक गाठणाऱ्या एकेका पौराणिक व्यक्तीचा कवीने त्या पदात निर्देश केला आहे. त्याच चालीवर मलाहि असे म्हणता येईल, गायक असावा तर अल्लादियाखाँसारखा असावा, चित्रकार असावा तर रविवर्म्यासारखा असावा, क्रिकेटपटू असावा तर नायडू—देवधर यांच्यासारखा असावा, वक्ता असावा तर सावरकर—जयकर यांच्यासारखा असावा.

काही–काही गोष्टींच्या बाबतीत तरतमभाव उपयोगाचा नसतो हेच खरे! प्रीति, देशद्रोह, पातिव्रत्य, व्यभिचार अशा काही गोष्टींच्या बाबतीत कमी-अधिक ते काय असू शकणार? एका इंग्रजी सुभाषितात हीच कल्पना एक मार्मिक उदाहरण देऊन स्पष्ट केली आहे. सुभाषितकार म्हणतो, ' देअर इज नो सच थिंग ॲज ए लिटल् प्रेग्नन्सी!'

मला वाटते रसवत्तेलाहि हाच न्याय लागू करणे योग्य आहे! कमी कस असलेल्या कलेचे, किंवा वैगुण्य असलेल्या सौंदर्याचे कौतुक करणाऱ्या वृत्तीला फार तर औदार्याचे प्रशस्तिपत्र बहाल करता येईल, रसिकतेचे नाही! कानपूरच्या त्या श्रोत्यांना रसिक म्हणता येईल का ते तुमचे तुम्हीच ठरवा आता!

★

विवेक, मार्च, १९६४

## ९ अमृताचे कल्लोळ

' जिच्या मांडीवर तंबोरा आहे, जिच्याजवळ बदक बसलं आहे, जिनं सफेद पातळ गुंडाळलं आहे, शंकर वगैरे देव जिला हमेशा रामराम करतात ती सरस्वती माता माझी जाडी कमी करो... '

नवव्या इयत्तेत शिकणाऱ्या एका शिष्यवरानं संस्कृत श्लोकावर चढविलेला हा मराठीचा पेहराव—चढविलेला कसला ? मूळ श्लोकांतील शब्दसंपत्तीचे केलेले वस्त्रहरणच म्हणायचं ते !—पाहून हसावे की रडावे असा क्षणभर मला प्रश्न पडला.

तसे पाहिले तर भाषिक वस्त्रहरण पाहण्याचा माझ्यासारख्या शिक्षक पेशातल्या माणसावर नेहमीच प्रसंग ओढवत असतो. ' दर्पण 'ऐवजी ' तर्पण ' नि ' यौवनसुलभ मोहा 'ऐवजी ' यवनसुलभ मोह ' अशी विडंबने पाहण्याचा मला नित्याचाच सराव होऊन बसला होता.

देशाच्या दुःस्थितिमुळे रामदासस्वामींच्या ' अंतःपुरात ' कालवाकालव झाल्याचा निर्वाळा देणारे, महात्मा गांधींनी इंग्रजांना विदेशी ' प्रणय ' करण्यास भाग पाडल्याचा नाजुक शोध लावणारे व ' अभिनय ' भारत ही क्रांतिकारकांची गुप्त संघटना असल्याचा दावा मांडणारे असंख्य विद्यार्थी नित्यशः माझ्या आढळात येत असतात. ' या कातरवेळी पाहिजेस तू जवळी ' हा उद्गार एकाद्या शिंप्याने आपल्या प्रेयसीला उद्देशून काढला असावा अशी खातरजमा करून घेऊन किंवा ' मदनरतीसम रूप विलक्षण ' या शब्दसमूहाचा ' मैदानातल्या रेतीसारखे विलक्षण सौंदर्य ' असा अन्वयार्थ लावणारे अनेक शिष्योत्तम मी पाहिले होते. ' संपदा चपल चरणा ' या काकासाहेब खाडिलकरांच्या

सुप्रसिद्ध पद्यपंक्तीतून एका विद्यार्थ्याने कोणता अर्थ काढला असावा असे तुम्हाला वाटते ? ' चप्पल हीच पायाची संपत्ति म्हणजे खरे भूषण होय ! ' असे त्या ओळीवर त्याने केलेले भाष्य पाहून लक्ष्मीधरालासुद्धा त्याच्या मूर्ख-पणाचे हसू येऊन निराळ्याच अर्थानं भुईवर लोळण घेण्याची इच्छा झाल्यावाचून राहणार नाही असा माझा विश्वास आहे.

स्वतःच्या इच्छेस येईल त्या अर्थानं शब्दांचा उपयोग करणारे किंवा दुसऱ्यानं योजलेल्या शब्दातून हवा असलेला अर्थ निष्पन्न करणारे अनेक विद्यार्थी आजवर मी पहात आलो असलो तरी सरस्वतीवंदनाचा उपरोक्त मराठी अनुवाद वाचताना मात्र ' परंतु या सम हा ' हा उद्गार नकळत माझ्या तोंडून बाहेर पडला.

पण मी या मुद्द्यावर सूक्ष्म विचार करू लागलो म्हणजे विद्यार्थ्यांचे शब्दाच्या बाबतीतले हे अज्ञान काहीच नव्हे हे सत्य मनाला पटू लागते. ओंगळ शब्द-योजना किंवा विपरीत अर्थनिष्पति यांच्या मुळाशी त्याचे स्वाभाविक अज्ञान तरी असते, पण जाणूनबुजून शब्दांतून अप्रस्तुत अर्थ निष्पन्न करणारे, विशिष्ट संदर्भात अप्रयोजक शब्दांचा वापर करणारे नवकवि किंवा लेखक शब्दांच्या व्याप्तिविषयी, त्यांच्या स्वयंभू सामर्थ्याविषयी बेपर्वाई दाखवू लागले म्हणजे मात्र त्यांच्या आचरट साहसाचा संताप आल्याशिवाय रहात नाही.

म्हणे ' रेडिओ गाणं ओकत होता ! ' रेडिओ ओकाऱ्या देतो तर मग कॉलऱ्याची लागण झालेला मनुष्य काय आलाप घेत बसतो ? की तानबाजी करीत सुटतो ? एका लेखकमहाशयांनी लिहिलेलं आठवतं, ' दिवस कुंथू लागला होता. ' दुसरे एक नवकवि लिहून जातात, ' रात्रीला आचके लागत होते. '

रूढार्थाहून निराळ्या अर्थाने सूज्ञ साहित्यिक शब्दांचा वापर करीत नसतात असे नाही. लक्षणा, अभिधा व व्यंजना या शब्दाच्या तिन्ही शक्ति ध्यानात घेऊन त्यांचा आपल्या लेखनात चातुर्याने उपयोग करणारे कितीतरी समंजस लेखक आजमितीलाहि दाखवून देता येतील. पण आशयाची परिणामकारकता वाढविण्याच्या हेतूने योग्य त्या संदर्भात लक्षणार्थानं शब्दांची योजना करणे वेगळे आणि रसपरिपोष किंवा अर्थाभिव्यक्ति यांचा बिलकूल विचार न करता मुलखावेगळी, तऱ्हेवाईक शब्दयोजना करून नवनिर्मितीच्या हव्यासाचे प्रदर्शन

करणे वेगळे. असल्या जगावेगळ्या शब्दयोजनेतच काव्य दडलं आहे अशी स्वतःची समजूत करून कोणत्या महाभागांना कोणतं विशेषण द्यावं हेच कळेनासं होतं. साहित्याच्या प्रांगणात धुडगूस घालणारे साहित्यशौंड निरर्थक शब्द तरी योजतील किंवा अर्थनिष्पत्ति करावयाची झाली तर ती अश्लील, औचित्यहीन, अमंगल अशीच राखण्याकडे ते जिवाचा आटापिटा करतील. 'विवस्त्रा धरित्रीवर आकाश वाकलं होतं' अशा स्वरूपाची वाक्ये आधुनिक लेखकबुवांच्या कथांतून मी वाचतो तेव्हा धरित्रीऐवजी खुद्द लेखकानंच कमरेचं सोडून डोक्याला गुंडाळलं असल्याची माझी खात्री होते. अर्थशून्य शब्द-योजना करणाऱ्या आचरट साहित्यिकांपैकी असली वेढूर, ओंगळ, हिडीस विधाने करून सरस्वतीच्या मंदिरातले पावित्र्य भ्रष्ट करणारे लेखक समाजाचे कट्टर शत्रू आहेत यात शंका नाही. अर्थहीन, दुर्बोध वाङ्मयाची निर्मिति ही क्लीबांच्या शृंगारासारखी निरर्थक मानून त्याकडे दुर्लक्ष तरी करता येईल, पण वाग्देवतेच्या सौंदर्यावर घाला घालून तिच्या शीलाचा बुद्ध्या अपहार करू पाहणाऱ्या नव्या लेखकांचे व कवींचे चाळे उन्मत्त गुंडांच्या समाजविघातक लीलांहून फारसे निराळे नाहीत हे सत्य कदापि विसरता कामा नये.

'शब्द जैसे कल्लोळ अमृताचे' किंवा
'निवालिया अमृताचा कल्लोळ ।
तैसा कोंवळा आणि रसाळ'

हे ज्ञानदेवांनी केलेलं शब्दसौंदर्याचं वर्णन चिंतनीय नाही असं कोण म्हणेल?

'तैसे शब्दांचे व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाहातया भावज्ञा फावती गुण । चिंतामणीचे ॥'

या ओळीत ज्ञानेश्वरांनी शब्दांच्या व्यापकपणाचा नि सामर्थ्याचा केलेला गौरव लेखनकामाठी करू इच्छिणाऱ्या उद्याच्या वाङ्मयोपासकांनी तरी अवश्य ध्यानात ठेवावा. शब्दांत सामावलेल्या सौंदर्याविषयी अन अभिव्यंजते-विषयी या शब्दसृष्टीच्या ईश्वरानं आपल्या भावार्थदीपिकेत जागजागी मोठं रसाळ, मार्मिक विवरण केलं आहे, ते सर्वच्या सर्वच नव्या लेखकांनी एकवार तरी दृष्टीखालून घालावं. शब्दांच्या बाह्य सौंदर्याची रसिकमनाला भुरळ पडणे कसे स्वाभाविक आहे हे विशद करताना ज्ञानोबाराय एके ठिकाणी म्हणतात,

'ऐस वरचिलीचि बरवा ।
सुख जावो लागले फावा ।
तव रसास्वादाचिया हावा ।
लाहो केला ।
परि तैसे हे नोहेचि देवा ।
देखिला अक्षरांचा मेळावा ।
आणि विस्मयाचिया जीवा ।
विस्मयो झाला ।।'

साहित्यात शब्दांची निवड किती कसोशीने व्हावयास हवी याविषयी दण्डी वामन, विश्वनाथ इत्यादि साहित्यशास्त्रकारांनी अतिशय काटेकोरपणाने आपापल्या ग्रंथांतून विवेचन केलं आहे. क्लिष्ट, अन्यार्थ, अयुक्तिमत, श्रुतिदुष्ट, अर्थदुष्ट, कल्पनादुष्ट इत्यादि दहा प्रकारच्या शब्द–दोषांचा उल्लेख करून ते कटाक्षाने टाळण्याविषयी त्यांनी निक्षून सांगितले आहे. भामहाने तर त्यात आणखी दहा-पंधरा दोषांची भर घालून त्यापैकी खऱ्या कवीनं एकालाहि आपल्या साहित्यात थारा देऊ नये असा स्पष्ट इशारा दिला आहे!

पूर्वसुरींनी शब्ददोषांचा जसा उल्लेख केला तसा त्यांच्या गुणांचाहि निःसंदिग्ध निर्देश केला आहे. ओज, प्रसाद, समता, समाधि, माधुर्य, सौकुमार्य, उदारता, अर्थशक्ति, कान्ति वगैरे दहा प्रकारचे शब्दगुण त्यांना अभिप्रेत असून प्राचीन कवींच्या काव्यातून त्यांनी त्यांची वेचक उदाहरणेहि दिली आहेत. ती सर्व आमचे कविलेखक दृष्टीखालून घालण्याचे परिश्रम घेतील तर--

तर काय? 'जिनं सफेद पातळ गुंडाळलं आहे...' अशा थाटाचे शब्दप्रयोग करण्याचे धाष्टर्य त्यांना करवणार नाही!

*

विवेक, विजयादशमी विशेषांक, १९५९

## १०. रिकामा हौद

माझा आहार ऐसपैस कधीच नव्हता. आहाराशी काव्याची कुणी तुलना करीत नाही, पण ती करायचीच झाली तर, महाकाव्य नव्हे अन् किंचित् काव्यहि नव्हे, अशा दोहोंच्या मध्ये पडणाऱ्या, वेताच्या लांबीरुंदीच्या स्फुट कवितेसारखा माझा आहार आहे असे म्हणता येईल.

पण मुंबईला नोकरीच्या निमित्ताने रहायला आल्यापासून मात्र या स्फुट काव्याचे खंडकाव्यात रूपांतर झाले होते! सकाळी इराण्याकडला मस्का स्लाईस, मधल्या सुट्टीत शाळेच्या कॅंटीनमधली मिसळ, दुपारी डब्यातले जेवण, तीन वाजता मामा काण्यांकडचे थालीपीठ किंवा बटाटेवडा, अन् रात्री घरचे जेवण अशा हप्त्याहप्त्याने क्षुधाग्नीत हवि टाकल्यानंतर अस्मादिकांच्या यज्ञकर्माची सांगता होत असते!

तसे पाहिले तर मुंबईची हवा पचनक्रियेला पोषक आहे अशातला भाग नाही. इथली हवा काय किंवा पाणी काय, दोन्ही पचनाला प्रतिकूलच आहेत असे डॉक्टर वैद्य सांगत असतात. घाम गाळूनहि मुंबईकराच्या भुकेच्या ज्वाला कधी भडकलेल्या कुणी पाहिल्या नाहीत. इथल्या स्मशानभूमीवरच्या सभेत ढाळल्या जाणाऱ्या अश्रूंचा अन् दुःखाचा फारसा संबंध नसतो त्याप्रमाणे इथल्या घामाचेहि भुकेशी विशेष नातं नसतं!

भूक नसता वेळच्या वेळी पाटावर बसणारा मुंबईचा मनुष्य केवळ लोकसंग्रहार्थ कर्म करीत राहणाऱ्या एखाद्या मुनिवराइतकाच मला आदरणीय वाटतो. पण आमच्या हिला मात्र मुनिवरापेक्षा जनावराच्याच जातीला शोभण्यासारखी ही वृत्ति वाटते! 'गाई–म्हशीप्रमाणे दिवसभर चरत फिरायचं अन् घरी

आल्यावर ताटाकडे ढुंकून न पाहता स्वस्थपणे रवंथ करीत बसायचं' असा तिच्या हिशेबी या 'मुनिवृत्तीचा' अन्वयार्थ आहे. हवेपेक्षा, सतरा वेळ हॉटेलात गेल्यानेच लागावी तशी भूक लागत नाही, असा सौभाग्यवतीच्या म्हणण्याचा स्पष्ट आशय आहे.

तिचे म्हणणे अगदीच खोटे नव्हते. दिवसातून तीन-चार वेळा घराबाहेर खाल्ल्यानेच लागावी तेवढी सपाटून भूक लागत नाही हे माझे मलाच आताशा जाणवू लागले होते. कोर्ट, दवाखाना नि हॉटेल या तिहींची पायरी चढण्यात फारसा शहाणपणा नसतो हेच खरं!

× × ×

ज्ञानाच्या अन् इतर कित्येक भुकांच्या बाबतीतहि मला वाटतं मनुष्याची आज अशीच अवस्था झाली आहे. हाती लागतील ती भलीबुरी वृत्तपत्रे अन् वेड्याविद्या कथा-कादंबऱ्या चघळल्याने ज्ञानाची भूक तृप्त होईल असे आम्हाला वाटत असते, पण प्रत्यक्षात आपणा सर्वांच्या अनुभवाला काय येते? आजच्या पाचवी-सहावीतल्या विद्यार्थ्याला सात-आठ तरी विषय शिकावे लागतात. याशिवाय दररोज कानावर पडणाऱ्या नभोवाणीच्या श्रुतिका, चित्रपटांची कथानकं, पुढाऱ्यांची भाषणं, शनिवारचे हिंदीचे वर्ग, रविवारच्या कथामाला अशा कितीतरी गोष्टी त्याच्या डोक्यात अहोरात्र 'ज्ञान' कोंबीत असतात. पण पण त्याच्या ज्ञानाचं मोजमाप करायला बसलो तर काय आढळून येतं? तास दोन तास पाण्याची तोटी चालू ठेवूनहि रिताच राहणाऱ्या हौदाची उदाहरणं गणिताच्या पुस्तकात दिलेली असतात. हौदांत पाणी रिचवलं जात असतानाच ते दुसऱ्या तोटीनं बाहेर पडत असतं असा गणितकर्त्यानं खुलासा केलेला असतो. हल्ली माणसाच्या धारणाशक्तीलाहि अशीच गळती लागलेली आहे यात शंका नाही. अन् म्हणूनच ज्ञानसंपादनाची क्रिया सतत चालू असूनहि त्याची खोली वाढत नाही, पातळी उंचावत नाही. वखवखलेल्या वृत्तीनं चार ठिकाणी खाण्याचे पदार्थ चिवडल्यावर भूक मरगळून जाणार नाही तर काय?

सुप्रसिद्ध तबलावादनपटु अहमदजान तिरखवाँना कुठलीच लिपी लिहिता-वाचता येत नाही असं म्हणतात. पण त्यावाचून त्यांची ज्ञानलालसा काही अडून राहिली नाही. तपस्येसाठी त्यांनी जे क्षेत्र निवडले त्यात केवळ श्रवणाच्या अन् मननाच्या बळावर त्यांना अशी काही कलेची उंची गाठता आली

की इतरेजनांनी त्यांच्याकडे नुसतं चकित दृष्टीने पहात रहावं! आमच्या गावात एक वयोवृद्ध पुराणिकबुवा आहेत. गावच्या म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष कोण अन् सेक्रेटरी कोण हे त्यांना बरोबर सांगता येईल की नाही शंकाच आहे. पण अठराहि पुराणांतली आख्यानोपाख्यानं अन् त्यातल्या व्यक्ति यांची खडान्खडा माहिती त्यांना विचारून घ्यावी! भागवतावर त्यांचा एवढा अधिकार की, मठात त्यांचा पाठ चालू असताना ते नाममात्र पोथीची पानं डोळ्यापुढून उलटतात. त्या महान् ग्रंथातले श्लोकामागून श्लोक त्यांनी आपल्या स्मृतिसंपुटात साठवून ठेवले आहेत. श्लोकांच्या एखादद्दुसऱ्या शब्दावरून नजर फिरविताच संहिताच्या संहिता त्यांच्या मुखावाटे प्रगट होतात. ज्ञानाचे असे सनातन अमृतकण ज्याच्या जिव्हाग्री सदैव वास करीत आहेत त्याला क्षणजीवि, नश्वर संस्थांचे अध्यक्ष नि सेक्रेटरी यांची जंत्री लक्षात ठेवायची का आवश्यकता वाटावी?

तुकाराम, कबीर यांनीहि शास्त्राध्ययन केल्यांचे पुरावे कुठं उपलब्ध नाहीत. कबीरांनी तर, 'मसि कागद छुओ नही, कलम गही नही हाथ' अशा स्पष्ट शब्दांत आपल्या निरक्षरतेचा निर्वाळा दिला आहे. पण या दोघाहि साधुश्रेष्ठांनी मानवी जीवनग्रंथाचा असा सूक्ष्म, सखोल अभ्यास केला होता की त्यांच्या दिव्य ज्ञानाच्या प्रकाशझोतानं युगायुगातल्या संभ्रान्त प्रापंचिकांचा जीवितपथ उजळून निघावा!

× × ×

आमची संगीतविषयक रुचीहि आज अशीच बिघडली आहे, विकृत झाली आहे. रेडिओ, चित्रपट, स्नेहसंमेलने, मेळे यांच्याकडून अष्टौप्रहर प्रत्येकाच्या घरी संगीताचा रतीब घातला जात आहे. पूर्वी नाटकांतल्या पद्यांना चाली देणाऱ्याचं अन् ती बसवून घेणाऱ्यांचं नावगावहि कुणाला ठाऊक नसे. पण हल्ली भावगीतांना किंवा चित्रपटाच्या पदांना अठरा चालींच्या मिश्रणात बुचकळून काढणाऱ्या संगीत दिग्दर्शकांचा कोण गाजावाजा! सीतेला रावणानं पळवून नेल्यावर रामानं कोणत्या सुरावटीत आपली व्यथा प्रकट करावी? 'रॉक एन् रोल'च्या चालीवर तो जेव्हा 'हा सीते! हा लक्ष्मणा—' असा उद्गार काढतो तेव्हा सुजाण प्रेक्षकांना मर्यादापुरुषोत्तम प्रभुरामचंद्राऐवजी एखाद्या उडाणटप्पू कॉलेज युवकाची भूमिका आपण पहात आहोत की काय असा भास झाल्या-

वाचून रहात नाही. अन् मग ' गवताऐसे उदंड ' वाढलेलं हे संगीत चार-दोन महिन्यातच खाली माना टाकून भुईसपाट व्हायला लागतं तेव्हा त्याचा कुणाला खेदहि वाटत नाही की चुटपुट लागत नाही ! हयातभर खानदानी संगीताचा रियाज करणाऱ्या, पाच-पाच तास मैफल रंगविणाऱ्या मरहूम रहिमतखाँ, अल्लादियाखाँसाहेब यांसारखे प्रचंड वृक्ष कुठे आणि अल्पकाळातच नष्ट होणारी ही क्षुद्र तृणाची पाती कुठे !

उत्तान चित्रपटकथा, मासिकावरली स्त्रियांची अनावृत्त चित्रं, चाळीच्या गॅलरीत, स्टेशनवर, सार्वजनिक उद्यानात दृष्टोत्पत्तीस पडणारी प्रणयाराधनेची सवंग दृश्यं, छचोर वेषभूषा यामुळे आजच्या पिढीतली प्रणयाची उत्कटताहि कशी क्षीण होत चालली आहे हे पहावयाचे असल्यास ' संसारातला आनंद मनमुराद लुटविण्याची ' हमी देणाऱ्या जालंदर, अमृतसरच्या जाहिरातींना आलेला उत लक्षात घ्यावा ! शिवाय, सुखी संसाराचा गुप्त कानमंत्र द्यायला मुंबईसारख्या शहरात नाक्यानाक्यावर ठाण मांडून बसलेले बंगाली प्रोफेसर, आश्चर्यकारक इलाजाची जाहिरात करणारे हकीम, डॉक्टर, बसच्या प्रत्येक स्टॉपजवळ दवाखना थाटून बसणारे जडीबुटीवाले वैदू या सर्वांच्या धंद्याला आज आलेली तेजी पाहिली म्हणजे दिवसभर जिभेचे चोचले पुरविणाऱ्या नि ऐन जेवणाच्या वेळी नुसती भाताची शितं चिवडीत बसणाऱ्या मुंबई-करांची अन् त्यांच्या पाठोपाठ गणिताच्या पुस्तकातल्या त्या रिकाम्या हौदाची मला आठवण होते– दुसरं काय ?

★

विवेक १९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.............................. दि: ..........................
क्रमांक .............................. नों. दि: ..........................

## ११. बहु असोत सुंदर .... !

एखादी निसर्गवर्णनपर कविता किंवा गद्य उतारा मुंबईच्या विद्यार्थ्यांना शिकवायची पाळी आली की माझी मोठी चमत्कारिक अवस्था होते. न्हाणीतली मोरी तुंबल्यावर आजूबाजूला साचणाऱ्या पाण्यापलीकडे ज्याला 'जलाशय' ठाऊक नाही, रेल्वेलाईनीच्या कडेने वाढणाऱ्या खुरट्या गवतावरून ज्याला 'हरित-तृणांच्या मखमली गालीच्या'चा अंदाज बांधावा लागतो, आणि सांडपाण्याची टाकी फुटली म्हणजे ज्याला धबधब्याच्या स्वरूपाचं काहीसं आकलन करता येतं अशा मुंबईच्या विद्यार्थ्याला निसर्गसौंदर्याचा साक्षात्कार घडवू पाहणे— छे:! छे:! नाक चोंदलेल्या इसमाच्या पुढ्यात साक्षात् कस्तुरी मृग आणून उभा केला तरी त्याच्या गंधसंवेदनेला कुठून अन् कसं आवाहन होणार? खोलीभर पसरलेल्या, पितृदेवाच्या विडीच्या वा सिगरेटच्या धुरासारखेच धुके असेल असा ज्याचा होरा वाहतो, आरक्त छटा फक्त जिन्याच्या कोपऱ्या कोपऱ्यातच उमटू शकतात अशी ज्याची सीमित श्रद्धा असते, आणि बहिऱ्याचा जन्म मिळाल्याशिवाय निसर्गातल्या नीरवतेचा आनंद वाट्याला येण्याचा जिथं सुतराम् संभव नसतो अशा मुंबईच्या छात्रगणाला कुणीहि झाला तरी प्रकृतीच्या सौंदर्याची अनुभूति कशी आणून देऊ शकणार?

पृथ्वीला गंधवती म्हणतात हे मुंबईचा विद्यार्थी मान्य करील. मग तो गंध उन्हाळ्यात पिघळणाऱ्या रस्त्यावरच्या डांबराच्या उग्र दर्पापेक्षा फार वेगळा असतो या गोष्टीवर त्याचा काही केल्या विश्वास बसणार नाही. खोताच्या वाडीतील गल्ल्यांवरून खेडेगावच्या पांदीचा निरुंदपणा तेवढा मुंबईकर विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देता येईल. पण पांदीतल्या रानफुलांच्या संमिश्र वासाची

कल्पना काय खोताच्या वाडीतल्या लसणीच्या फोडणीवरून, नाहीतर पॉयशाच्या फवाऱ्यावरून त्याला आणून द्यायची ? पांदीतल्या दोन्ही बाजूंच्या कुंपणावर पसरलेल्या वेलींची शोभा गल्लीतल्या कठड्या-कठड्यावर वाळत घातलेल्या दुपट्यांवरून अन् चड्डयांवरून का अजमावयाला त्याला सांगायचं ? पांदीतल्या रातकिड्यांचे किरकिरणे म्हणजे नळावरल्या कुरबुरण्याचाच एक प्रकार आहे अशी का त्याची समजूत करून द्यायची ? गिरण्यांच्या भोंग्याकडून पंचपंच उषःकालाच्या आगमनाची वर्दी ऐकायची सवय झालेल्या त्याच्या कानांना खगवृंदांच्या मंजुस्वनाची भानगड फारशी उमजू नये हेच स्वाभाविक नाही का ?

म्हणूनच बालकवि किंवा टिळक यांची एकादी निसर्गवर्णनपर कविता शिकविताना विद्यार्थी असे काही मख्ख चेहेरे करून बसतात की जणू काही ते मायावादाचं विवेचन करणारं वेदान्तपर प्रवचनच ऐकत बसले आहेत. 'लता-वलये', 'बुदबुद लहरी', 'निर्झरिणी' वगैरेसारखे शब्द त्यांना वेदान्तातील अपरोक्षानुभूति, विशिष्टाद्वैत, प्रकृति-पुरुष या परिभाषेसारखे गूढ, अनाकलनीय वाटू लागतात; अन् अशी कविता त्यांना वाचायला सांगितली म्हणजे धर्मगुरु-समोर पापाचा पाढा वाचणाऱ्या एकाद्या खिरस्ती माणसाच्या मुद्रेवर दिसावी तशी विषादाची, कारुण्याची नि अनुतापाची संमिश्र छटा त्यांच्या चेहऱ्यावर उमटत असते.

ही वस्तुस्थिति लक्षात आल्यापासून निसर्गवर्णनपर निबंध किंवा परिच्छेद विद्यार्थ्यांना लिहायला सांगायचं म्हटलं तर माझ्या छातीत धस्स होतं. 'केवड्याच्या डेरेदार वृक्षाच्या अंगाखांद्यावर विहार करणाऱ्या त्या पोपईच्या वेली, इतस्ततः फुलांचा सडा घालणारी ती उंबराची झाडं, भ्रमराभोवती रुंजी घालणारे ते गुंजारव, 'बिस्कि-स्लाय'वर जगणारे ते कुमुदिनींचे थवे, माडांच्या राईतून घुमणारी ती मंद सुशीतल अन् कंठमधुर कूजने, इत्यादींसारख्या एका-हून एक अद्भुत व भयंकर चिजा पाहताना, 'अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा। भयेन च प्रव्यथितं मनो मे।' अशी अर्जुनासारखी माझी अवस्था झाल्यास नवल नाही.

पण हा विषाद थोडा वेळच मला अस्वस्थ करून सोडतो. माझ्या मनाला सतत डाचणारे शल्य निराळेच आहे. निसर्गातल्या विविध सौंदर्याचा आस्वाद आजच्या विद्यार्थ्यांना घेता न आला तर न येवो, पण मानवी अंतःकरणाची

अनेकविध सौंदर्यं रसिकतेनं टिपता आली पाहिजेत, त्यांच्या दर्शनानं त्यांच्या वृत्ति उचंबळून आल्या पाहिजेत असं मात्र मला मनापासून वाटत असतं. हिमालयासारखी उत्तुंग, सागरासारखी विशाल, गंगेसारखी विशुद्ध हृदये भवती वावरत असताना त्यांच्याकडेहि आजच्या पिढीचं दुर्लक्ष व्हावं या गोष्टीचं दुःख माझ्या मनाला सदैव विद्ध करीत असतं !

झुळझुळ वाहताना विश्वात आनंदाची नि चैतन्याची उधळण करणाऱ्या निर्झरासारखे कलावंत, पानांआड दडून आसमंतात सुगंध पसरविणाऱ्या मुग्ध कळीसारखे अबोल वृत्तीचे परोपकारी जीव, भयाण, अंधाऱ्या रात्री पांथस्थाला धीर देणाऱ्या नक्षत्रांसारखे कर्मयोगी महात्मे, चंद्रकिरणातल्या शीतलाईची जाणीव करून देणारी वत्सल जननी, या साऱ्यांच्या जीवनातले सौंदर्यकण ज्यांचा चित्तवेध करू शकत नाहीत त्यांना पर्वतांचे नि नद्यानाल्यांचे पार्थिव सौंदर्य कळून तरी काय उपयोग आहे, असाहि एक प्रश्न माझ्या मनात उत्पन्न होत असतो.

तसं पाहिलं तर आमचा विदर्भ काश्मीरसारखा, गोमांतकासारखा किंवा कोंकणासारखा निसर्गशोभेनं नटलेला प्रदेश नाही. सह्याद्रीच्या मानाने विदर्भातला अजिंठा पर्वत म्हणजे भवानी तलवारीपुढे स्वयंपाकघरातली विळीच. कोकणांतल्या नारळ–पोफळीच्या अन् काजू–फणसाच्या शोभेपुढे आमच्या वऱ्हाडातली जोंधळ्याच्या अन् कापसातुरीच्या वावरांची शोभा म्हणजे मैफलीतल्या बंदिस्त चिजेपुढे ‘ वाईट खरोखर ही दा–। रू असते सांगू कितीदा ? ’ अशा थाटाच्या रचनेचे मेळयांतले पद्य ! असं असलं तरी वर्षातून एक वेळ तरी त्या प्रांतात जाऊन येण्यासाठी मी आसुसलेला असतो. मनाला थक्क करून सोडणारा गोव्यातला ‘ दूधसागर ’ आमच्या वऱ्हाडात नसेल, पण ‘ मिल्क् ऑफ ह्यूमन काईंडनेस् ’ म्हणून शेक्सपीयरने मानवाच्या ज्या दयाबुद्धीचा गौरव केला ती विदर्भाच्या भूमीत पदोपदी प्रत्ययाला येते ही काय कमी सद्भाग्याची गोष्ट आहे ? तिथल्या काळ्याभोर जमिनीत जशी अपार ओल साठली आहे तसा काळ्यासावळ्या विदर्भीयांच्या अंतर्यामांतहि मायेचा, सहानुभूतीचा असीम ओलावा दडलेला असतो. तो अनुभवताना काश्मीरच्या वा दार्जिलिंगच्या शीतल वायुलहरींचं कौतुक मनाला वाटलं नाही तर त्यात त्याचा थोडाच दोष आहे ? म्हणूनच वऱ्हाडच्या वाट्याला फारसे सृष्टिसौंदर्य आले नसले तरी त्याचा मला

यत्किंचित्‌हि खेद होत नाही. विदर्भाची स्तुति करण्याचा माझा मुख्य उद्देश नाही. निसर्गशोभेपेक्षांहि मानवी अंतरंगाच्या सौंदर्यानं हे जग अधिक रमणीय झालं आहे, अन् त्याची उपेक्षा करण्यासारखा दुसरा कोणताहि मोठा प्रमाद नसेल हे मला मुख्यतः सांगायचं आहे. पण दुःखाची गोष्ट अशी की शहरी संस्कृतीत वाढणारे तुम्ही आम्ही सर्वचजण निसर्गसौंदर्याबरोबरच मानवी मनाच्या सौंदर्याकडेहि ढुंकून पाहिनासे झालो आहोत. विद्यार्थ्यांनाच काय दोष द्यायचा? एका गरीब कर्जबाजारी माणसाच्या घरावर जप्ती आणून त्याचे सामान उघड्यावर टाकणाऱ्या आणि त्या माणसाच्या पत्नीकडे साभिलाष नजरेने पाहणाऱ्या, कुसुमाग्रजांच्या कवितेतल्या त्या सावकाराच्या विकृत सौंदर्यदृष्टीसारखी आमची सौंदर्यदृष्टि गढूळली आहे. वरवरचे कातडीचे सौंदर्य आम्हाला भुरळ घालू शकते, अंतर्विश्वाचे लावण्य आमच्या डोळ्यांना दिसत नाही, आमच्या मनाला आकर्षून घेऊ शकत नाही, ही खरी आजची शोकांतिका आहे!

× × ×

गाजावाजा न करता निष्ठेने कुटुंबपोषणाचे कर्तव्य करणाऱ्या, देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या, मांगल्याची आणि त्यागाची जोपासना करणाऱ्या असंख्य स्त्री–पुरुषांच्या जीवितकार्याची आपण दखलहि घेत नाही. त्यांच्या निर्वाणानंतर त्यांच्या दहनाच्या जागी एकादी पणती लावण्याइतकी किंवा चिरा ठेवण्याइतकी कृतज्ञताहि आम्ही प्रकट करीत नाही' असे कविवर्य बोरकरांना खेदोद्गार काढावे लागतात ते आमच्या या अक्षम्य उपेक्षावृत्तीमुळेच नाही का? हरिततृणांची मखमली लव आम्हाला कळली नाही तरी चालेल, पण मखमलीपेक्षाहि मृदुतर असलेल्या सज्जनांच्या हृदयाचे सौंदर्य आम्हाला कळायला हवे. लतावल्लयांबरोबर फुगडी खेळणाऱ्या बालनिर्झराने आमचा लक्ष्यवेध केला नाही तरी चालेल, पण जीवनांतली दुःखे पचवून संतांच्या वृत्तीने विश्वाला आनंदाचं आवार घालू पाहणाऱ्या कलावंतांच्या कलात्मतेची आम्हाला बूज राखता आली पाहिजे. आषाढातल्या गुरुगंभीर घनगर्जितांतली भीषणरम्यता आम्हाला आकलन झाली नाही तरी चालेल, पण मदांध सत्ताधीशांना त्यांच्या उन्मत्तपणाची जाणीव करून देणाऱ्या निर्भय पुरुषांच्या धीरगंभीर, निश्चयी, कणखर वाणीतला 'रौद्र' आम्हाला कळला पाहिजे, त्यातल्या सौंदर्याने आमची अंतःकरणे

विद्ध झाली पाहिजेत. आणि ही सौंदर्यदृष्टि आमच्या ठिकाणी बाणल्यानंतर, प्राकृतिक सौंदर्याचा आस्वाद आम्हाला घेता आला नाही तरी त्याचे दुःख आम्ही मनाला लावून घेणार नाही. फार काय, या प्राकृतिक सौंदर्यावाचूनहि आमचे फारसे अडून राहणार नाही.

'निसर्गशोभेच्या बाबतीत इतर देश अगर प्रांत महाराष्ट्रापेक्षा अधिक संपन्न असले तर असोत, मला माझी महाराष्ट्रभूच प्रिय आहे' असे कोल्हटकरांनी आपल्या एका गीतात म्हटले ते भौतिक सौंदर्यापेक्षांहि निराळ्याच श्रेष्ठतर सौंदर्याची महती त्यांना पटली होती म्हणूनच ना ?

★

विवेक, १९६२

## १२. स्वप्नभूमि

दरवर्षी, नाही म्हटलं तरी दहा–बारा सचित्र कॅलेंडरं माझ्याकडे भेटीदाखल येत असतात. विश्वाची सूत्रं हलविणाऱ्या परमेश्वरापासून तो सूत कातणाऱ्या पुढाऱ्यापर्यंत आणि आकाशातल्या बाप्पापासून तो पाळण्यातल्या बालकापर्यंत अनेकविध विभूति अन् व्यक्ति दिनदर्शिकेत चित्रित करण्यात येत असल्या तरी माझ्या बैठकीच्या खोलीत मात्र एक साधं—कुणाचंहि चित्र नसलेलं—कॅलेंडर टांगून ठेवलेलं तुम्हांला दिसेल !

अर्जुनाच्या केसांची ठेवण राजकपूरच्या फॅशनशी मिळती–जुळती असते अन् सुभद्रेच्या चेहऱ्याची ठेवण नर्गिसच्या वळणावर गेलेली असते ही हल्लीच्या चित्रांविषयीची टीका वस्तुस्थितीला धरून असली तरी ती चित्रं खोलीत न टांगण्याचं माझं कारण मात्र निराळंच आहे. बाबूराव पेंटर किंवा दलाल यांच्यासारख्या सुबुद्ध, कुशल कलावंतांच्या चित्रांनी विभूषित झालेली कॅलेंडरंसुद्धा खोलीत टांगण्याचं माझ्या अगदी जिवावर येतं !

‘अर्जुन–विषादयोगा’च्या प्रसंगावर दलालांनी काढलेल्या चित्राचं एक कॅलेंडर माझ्या संग्रही आहे. अर्जुनाच्या दृष्टीतली संमोहाकुलता नि भगवंतांच्या मुद्रेवरील स्थितप्रज्ञ भाव दलालांनी अशा काही कौशल्यानं अन् तन्मयतेनं चित्रित केला आहे की पाहणाऱ्याच्या मनावर त्या धीरोदात्त प्रसंगाचा कायमचा ठसा उमटावा.

...पण तसा तो उमटत नाही ! चित्रातील उदात्ततेची प्रचीति घेत असतानाच त्याच्या दोन्ही बाजूस छापलेल्या गजकर्णावरील मलमाच्या जाहिरातीकडे माझं लक्ष वेधलं जातं अन् दिव्यत्वात विहार करणारं माझं मन क्षणार्धात वास्तव-

तेच्या मरुभूमीवर येऊन आदळतं! दिनदर्शिकेतल्या एखाद्या युवतीच्या सौंदर्याचं निरीक्षण चालू असतानाच चावी छाप घासलेटच्या विज्ञापनाकडे माझी नजर जाते अन् मग सौंदर्यानुभूतीचा तो दिव्य क्षण घासलेटच्या पिंपात कुठल्या कुठं विरून जातो! दत्तात्रेयाच्या चित्रासोबत एखाद्या औषधी कारखानदारानं केलेली कफनाशक गोळ्यांची जाहिरात किंवा रामकृष्ण परमहंसांच्या चित्राबरोबर छापलेली गंगावनाविषयीची शिफारसपत्रे माझ्या पाहण्यात आली म्हणजे सोवळं नेसून विड्या फुंकणाऱ्या किंवा त्याच अवस्थेत चामड्याची पादत्राणं पायात घालून मिरविणाऱ्या उत्तर हिंदुस्थानी लोकांची आठवण झाल्यावाचून राहात नाही!

मनुष्याला कफनाशक गोळ्या, गंगावनं किंवा घासलेट नको असं मला म्हणायचं नाही! पण शारीरिक गरजांप्रमाणंच आत्म्याच्याहि काही गरजा असतात, आणि पहिल्यांचं दुसऱ्यांवर आक्रमण होता कामा नये, हा साधा हिशेब आज आपण सर्वचजण विसरत चाललो आहोत. आज पहावं तिथं मनुष्याच्या शारीरिक गरजा त्याच्या आत्मिक गरजांवर मात करीत असलेल्या दृष्टीस पडत आहेत! दिव्य आणि पार्थिव, अलौकिक आणि लौकिक, चिन्मय आणि जड यांच्यातल्या सीमा-रेषा पुसट होत चालल्या आहेत!

दिव्यतेचा ध्यास, अलौकिकाची ओढ ही आत्म्याच्या उत्थापनासाठी अत्यंत आवश्यक गोष्ट आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे. पत्नीच्या अधरोष्ठात अमृताऐवजी ओव्हलटाईन असल्याचा दावा मांडणारे नवकवि स्वतःच्या वास्तववादी दृष्टिकोनाबद्दल आपली कितीहि पाठ थोपटून घेवोत, पण मला मात्र बिचाऱ्यांच्या या भावनाशून्य, निर्जीव, जड वास्तववादाची कीव आल्यावाचून रहात नाही! भगवंतांच्या हातात शंख, चक्र, गदा, पद्म, या आयुधांऐवजी छत्री, भाजीची पिशवी, रेशनकार्ड आणि किर्लोस्करचा अंक देणारे नि गरुडाऐवजी सायकलरिक्षात त्याची स्थापना करणारे शिल्पकारहि आपल्या आत्म्याला शरीराची गुलामगिरी पत्करायला लावीत आहेत यात मला मुळीच शंका वाटत नाही!

मुंबईच्या गजबजलेल्या वातावरणाचा उबग येऊन मी एखाद्या सुट्टीच्या दिवशी जुहूच्या किनाऱ्यावर, वरसोवा नजीकच्या बेटावर किंवा घारापुरीच्या डोंगरावर जाऊन बसत असतो. पण आताशा तिथंहि हौशी स्त्री-पुरुषांची इतकी

गर्दी होत असते की एका काळच्या या रम्य, निवान्त स्थळांना बाजाराची अवकळा आलेली दिसून येते! भेळ–गंडेरीवाले, चणे–कुरमुरेवाले, नि नारळपाणीवाले यांच्या जोडीलाच मालीशवाले, चंपीवाले अन् बूटपॉलिशवाले हेहि तिथं गर्दी करून सोडतात आणि मग आत्म्यावर शरीराचं आक्रमण होत असल्याचा माझा सिद्धान्त बरोबर आहे असं माझं मन ग्वाही देतं!

निसर्गाच्या प्रशान्त, पवित्र वातावरणातहि आम्ही आपल्या दैनंदिन तहान–भुका विसरू शकत नाही, सृष्टीच्या रमणीय सान्निध्यातहि आम्ही बुटाला उजाळा देण्याचीच चिंता वहात बसतो! अंतराळातून झिरपणाऱ्या चंद्रिकेच्या किरणा-किरणांत, डोंगरमाथ्यावरून येणाऱ्या वायुलहरींच्या स्पर्शा-स्पर्शांत अथवा सागरलाटेतून उसळणाऱ्या तुषारांच्या कणाकणात संजीवनीचं चैतन्यदायित्व असताना आमच्या सुस्तावलेल्या वृत्ति मालीश अन् चंपीवाचून तरतरीत बनू नयेत यापरता आमच्या आत्मिक गुलामगिरीचा आणखी कोणता पुरावा शोधावयास हवा?

पश्चिमेकडे कुठंतरी उसळलेली विश्वसुंदरीस्पर्धेची लाट आमच्या देशाच्या किनाऱ्यावरहि येऊन आदळली अन् तिच्यातून भारतसुंदरी, प्रांतसुंदरी, जिल्हासुंदरी–फार काय, ग्रामसुंदरी, बोळसुंदरी––असे लहानमोठे शिंतोडे चौफेर उधळले गेले!

अप्सरांनाहि न सुचलेली सौंदर्यस्पर्धेची कल्पना मानवाला सुचावी यात आमच्या बुद्धिमत्तेचा विजय असेल कदाचित्; पण या कल्पनेतच मानवी आत्म्याच्या पराभवाची कबुलीहि आम्ही देऊन बसलो आहोत हे कितीजणांच्या ध्यानात येत असेल? सौंदर्यस्पर्धेच्या कल्पनेला उचलून धरणाऱ्या चाळींचाळींतल्या बुटक्या बकुळाबाई, काटकुळ्या कोकिळाबाई किंवा मेणकटल्या मथुराबाई एखाद्या नाटकात फार तर विनोदाचा विषय होऊं शकतील. पण जगन्मोहिनीविषयींची भव्योदात्त कल्पना ज्या देशानं जगापुढं मांडली त्याच देशातल्या रूपवान् स्त्रिया आपलं लावण्य उघड्यावर प्रदर्शित करण्यासाठी अहमहमिकेनं पुढं सरसावू लागल्या म्हणजे 'भयचकित नमावे तुज रमणी!' हे भास्करराव तांब्यांचे उद्गार निराळ्याच अर्थानं माझ्या तोंडून बाहेर पडतात! 'ब्रह्मेंद्ररुद्रमुनिमोहनशीललीलां। चंडी समस्तसुरमूर्तिमनेकरूपाम्' या स्तोत्रात व्यक्त झालेली भुवनसुन्दरीची विशाल कल्पना कुठं नि युवतींचे अवयव

चाचपून त्यांच्या रूपाविषयीचा निर्णय घेणारा आजच्या युगाचा वेढूट, क्षुद्र दृष्टिकोन कुठं ?

पुण्याच्या पंचक्रोशीत भरणाऱ्या बहुतेक जत्रांना हजर राहणारे एक हौशी गृहस्थ माझ्या परिचयाचे आहेत. चिंचवड, देहू, आळंदी, जेजुरी वगैरे क्षेत्री जत्रेसाठी जाण्याचा त्यांचा गेली कित्येक वर्षं परिपाठ आहे. पण त्या स्थळांहून परत येताना ते आपल्याबरोबर काही उच्च आध्यात्मिक संस्कार आणीत असतील म्हणता का ? छेः ! छेः ! कुठल्या जत्रेत कोणत्या वस्तु स्वस्तात मिळतात याची त्यांच्याजवळ भली मोठी नोंद आहे. त्यांनी खरीदलेल्या वस्तूत गवती चहापासून तो गावठी वहाणांपर्यंत साऱ्यांचा समावेश झालेला असतो ! प्रापंचिकाच्या ऐहिक उपाधीचा निरास करून त्याला मोक्षपदाचा अधिकार प्राप्त करून देण्याचं ज्या पुण्यक्षेत्रांचं सामर्थ्य, तिथंच अशाश्वत-संग्रह करण्याचा मनुष्याचा मोह अनावर व्हावा, हे कशाचं लक्षण आहे ?

अमेरिकेतल्या एका कल्पक शास्त्रज्ञाला म्हणे मालाची जाहिरात करण्याची एक अभिनव कल्पना सुचली असून त्यासंबंधी त्याचे प्रयोगहि चालू आहेत ! सिगरेटीतून निघणारा धूर हवेत नुसताच विरून जातो, तो तसा फुकट न जाऊ देता त्यातून निरनिराळ्या मालाच्या जाहिराती उमटाव्यात अशी त्या संशोधकाची महत्वाकांक्षा आहे ! त्याचा हा प्रयोग व्यावहारिकदृष्ट्या कितपत यशस्वी होईल हे सांगता येत नाही; पण धूम्रपान करणाऱ्या शौकीन मंडळींच्या वतीनं या प्रयोगासंबंधी मत द्यायचं झालं तर ते प्रतिकूल द्यावं लागेल, यात मला तिळमात्र शंका वाटत नाही. धूम्रपानाचा मला मुळीच अनुभव नाही. तथापि या व्यसनात मनुष्याला घटकाभर वास्तवतेचा विसर पाडायला लावून त्याला एका निराळ्याच तंद्रील, धूमिल वातावरणात नेऊन सोडण्याची विलक्षण जादू असली पाहिजे असं इतरांकडे पाहून अनुमान बांधावंसं वाटतं ! पण उद्या त्या अमेरिकन् संशोधकाच्या प्रयोगाला यश आलं अन् जाहिरात करणाऱ्या सिगरेटी अस्तित्वात आल्या तर मात्र धूम्रवलयातली ही मोहक जादू नष्ट होऊन सिगरेट पिणाऱ्याला क्षणोक्षणी भोवतालच्या वस्तुस्थितीची दाहक जाणीव होत जाईल हे सांगावयास नको !

वातावरणात विलीन होण्यापूर्वी ही वलयं त्याच्या जीविताच्या नश्वरतेची आठवण देऊन त्याला विमा उतरायला सांगतील, चुंबनामुळे भयंकर प्राणघातक

रोगजंतूंचा प्रसार होतो असा गंभीर इषारा देऊन त्यासाठी लाईफबॉय साबण वापरण्याचा सल्ला देतील, रमणीच्या केशसंभारात आषाढातल्या घनपंक्तींच्या शामलतेबरोबरच उवा अन् खवडेहि असण्याची शक्यता पटवून एखादं जालीम औषध वापरण्याची शिफारस करतील, मधुचंद्राचे बेत रचणाऱ्या नवपरिणीतांना माथेरान किंवा महाबळेश्वरला जाताना बरोबर पित्तपापडा तेलाची बाटली बाळगण्याची सूचना देतील. सारांश, त्या अमेरिकन् संशोधकांचा प्रयोग यशस्वी झालाच तर मनुष्याला पदोपदी ऐहिकतेची आठवण करून देणाऱ्या, त्याला दिव्यत्वाच्या स्वप्नभूमीवरून खेचून आणणाऱ्या इतर असंख्य दुष्ट शक्तीतच आणखी या नव्या शक्तीची भर पडणार आहे!

पण त्या शक्तीला बळी पडणं वा न पडणं हे सर्वस्वी आपल्याच प्रतिकार-क्षमतेवर अवलंबून नाही का? घरी दहा कॅलेंडरं येऊन पडली तरी त्यातलं कोणतं उपयोगात आणायचं हे ठरविण्याचा अधिकार शेवटी आपलाच आहे ना?

★

वसंत, १९५४

## १३. एकला चलो रे

ऐन श्रावणझडीत माथेरानची सहल काढण्याचा विचार माझ्या एका कविमित्राला सुचला तेव्हा मी त्याला हसत हसत म्हटलं, 'कविराज, माथेरानच्या डोंगरावर पावसाच्या सरीमागून सरी कोसळताना पाहून आपलं हृदय आनंदानं उचंबळून येईल खरं, पण आपल्या फुप्फुसांची काय वाट ? तिथल्या विलक्षण सर्द हवेत प्रतिभेऐवजी पडशाला आवाहन व्हायचं अन तंद्रीऐवजी खोकल्याची दाद मात्र लागायची !'

कविमित्रानं माझा विनोद हसण्यावारी न्यावा यात काहीच नवल नव्हतं. पण त्याला आपल्या पत्नीच्या रडण्याचंहि हसू यावं याचं मात्र आश्चर्य वाटलं मला. गोविंदाग्रजांनी कोणत्याशा कवितेत 'माणसाला या जगात रडायलाहि भाग्य लागतं' असं म्हणून ठेवलंय ते उगीच नाही ! बिचारीनं डोळ्यात आसवं आणून, पदर पसरून आपल्या पतिराजाला ते भयंकर साहस न करण्याविषयी विनवून पाहिलं होतं. पण माथेरानवर कोसळणाऱ्या मुसळधारांना जो महापुरुष भीक घालायला तयार नव्हता तो बळवाच्या सरीला थोडाच दाद देणार होता ?

शाळामास्तरचा आत्मविश्वास, मंत्र्याचा बेदरकारपणा अन् नवकवीची तुच्छता त्याच्या ठिकाणी त्यावेळी संचारली होती.

त्या दिवशी दुपारी आम्ही काहीजण त्या मित्राबद्दल थट्टेनं बोलत बसलो असता मध्येच कुणीतरी म्हटलं, 'लेको, उगाच कशाला बिचाऱ्याची टिंगल करता ? खरं म्हणजे मी सुद्धा त्याच्याबरोबर जायचं ठरविलं होतं... अन् हा देशपांडेसुद्धा गेल्या वर्षी पावसाळ्यात सहल काढण्याचे बेत रचीत नव्हता का ?...'

त्याचं म्हणणं खोटं नव्हतं काही. गतवर्षी आषाढात लोणावळयाची सहल काढण्याची कल्पना मी काही स्नेह्यांजवळ बोलून दाखविली होती, पण साऱ्यांनीच तिची रेवडी उडल्यामुळं मला ती सोडून द्यावी लागली.

माथेरान, लोणावळा यासारख्या निसर्गरम्य ठिकाणच्या वर्षाकालीन दर्शनाची कल्पनाच किती काव्यमय, किती मोहक आहे!

लहानपणी क्रमिक पुस्तकातला 'खंड्याळयाच्या घाटात' हा धडा मी कितीतरी वेळा आधाशीपणानं वाचून काढला असेल. त्यात हरिभाऊ आपट्यांनी वर्षाऋतूतील खंडाळयाच्या वनश्रीचं मोठं सुरस वर्णन केलं होतं. पुढे नोकरीच्या निमित्तानं मी मुंबईला येऊन स्थायिक झालो तेव्हा पुण्याच्या प्रवासाच्या निमित्तानं खंडाळयाच्या परिसरांतली ती अप्रतिम शोभा डोळे भरून पाहण्याची कैक वेळा मला संधि प्राप्त झाली. पण व्यवसायाच्या निमित्तानं प्रवास करताना वाटेत सहज घडलेलं सृष्टिसौंदर्याचं दर्शन म्हणजे देखल्या देवा दंडवत घालण्यासारखाच मला तो प्रकार वाटतो. प्रवासाचा आनंद लुटायचा असेल तर प्रवासाच्या हेतूनंच माणसानं घराबाहेर पडायला हवं, त्याच्या मुळाशी दुसरं कोणतंहि कारण असू नये असं माझं स्पष्ट मत आहे. पुराण ऐकता ऐकता वाती वळणाऱ्या आजीबाईचा 'द्विकर्मयोग' मला साफ नामंजूर आहे! 'कलेकरता कला' हे तत्त्व कुणाला मान्य होवो वा न होवो, पण 'प्रवासाकरिता प्रवास' ही घोषणा उद्या कुणी रूढ करण्याचा यत्न केला तर त्याला सर्वांची मान्यता मिळायला मुळींच विलंब लागायचा नाही अशी माझी खात्री आहे!

पण काय असेल ते असो, अद्यापपर्यंत लोणावळयाला पावसाळयात जाऊन मुक्काम करण्याचा किंवा चार-दोन स्नेह्यांबरोबर तिथली सहल काढण्याचा योग काही जुळून आला नव्हता. येणार कसा? ज्या-ज्या वेळी मी ही कल्पना मित्रमंडळींत बोलून दाखवी त्या त्या वेळीं सारेजण मला मूर्खात काढून माझ्या त्या कल्पनेची टर उडवीत. 'म्हणे पावसाळयातली लोणावळयाची सृष्टिशोभा! मग उन्हाळयात जाकोबाबादची शोभा पहायला काय हरकत आहे?' अशा शब्दांत माझ्या कल्पनेची बोळवण केली जाई!

आतां मात्र मला अगदी मनापासून वाटू लागलं, उगीचच आपण आपल्या स्नेह्यांच्या थट्टामस्करीला भिऊन मनातला बेत सोडून दिला. माथेरानला एकटंच

जाण्याचं त्या कविमित्रानं जसं मनोधैर्य दाखविलं तसं आपणहि दाखविलं असतं तर धारानृत्याचं केवढं मनोहर दृश्य आपल्या दृष्टीस पडलं असतं !

जलवृष्टीनं भिजून चिंब झालेल्या माथेरानच्या पर्वतराजी–यमुनेत जलक्रीडा करणाऱ्या गोपीच्या सुस्नात, पुष्ट देहसंपदाच जणू ! अंतराळात झेप घेणाऱ्या धूसर, तरल मेघपंक्ती–क्षणाक्षणाला प्रकटणारी प्रतिभेच्या नवनवोन्मेषांची साकार प्रतिकंच जशी काही...पर्वतशिखरांना बिलगलेली धुक्याची वलयं सूर्योदयानंतर हळूहळू विरल होत चालली म्हणजे सुरतक्रीडेतला आनंद उपभोगल्यावर संतृप्त मदालसांचे वल्लभांच्या मानेभोवतालचे करपाश आपोआप सैल होत असल्याचा सुखद संभ्रम न झाला तरच नवल !...

...अशा किती उत्कट अनुभूति, किती दिव्य क्षण आपल्या पदरी पडले असते ! 'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूप रमणीयतायाः' असा रैवतक पर्वताला अनुलक्षून माघानं श्रीकृष्णाच्या तोंडी उद्‌गार घातला तो उगीच नाही.

छेः ! छेः ! कविमित्राबरोबर माथेरानाला न जाण्यात आपण फारच मोठी चूक केली असं मला आता वाटू लागलं. तिथली सर्द हवा, निसरड्या वाटा, कोसळणारे कडे या साऱ्या गोष्टींचं भय माझ्या मनात दबा धरून होतंच, पण त्या सर्वांहून आपण एकटेदुकटे गेलो तर 'लोक काय म्हणतील' ही भीति अधिक प्रभावी ठरली !

एखाद्या महान् असाधारण ध्येयाची वाटचाल करणाऱ्या ध्येयवाद्यामागून जाताना सर्वसामान्य लोकहि, मला वाटतं, स्वतःच्या कुवतीपेक्षा आपल्या मुशाफिरीत किती वाटसरू सोबतीला आहेत याचीच मोजदाद करीत बसत असतात. अन् ज्या वाटेवर एकऱ्यादुकट्या प्रवाशाशिवाय फारसे पांथस्थ दृष्टोत्पत्तीस येत नाहीत तिकडे चुकूनहि फिरकण्याचा विचार त्यांच्या मनात येत नाही !

लोकाग्रणी आगरकर, महर्षि कर्वे, राजा राममोहन रॉय या धीरोदात्त पुरुषांनी इच्छित स्थलांकडे जाताना आपल्याबरोबर कितीजणांचा मेळावा आहे याची मुळींच क्षिति बाळगली नाही. येशू, सॉक्रेटिस याची जीवनयात्राहि अशीच एकाकी होती अशी इतिहासाची ग्वाही आहे. लोकांनी साथ–सोबत करावी म्हणून त्यांनी कधीहि अनुनय केला नाही. जे त्यांच्याबरोबर जायला सिद्ध झाले त्यांचं त्यांनी सहर्ष स्वागत केलं. पण आणखी मला सोबत हवी

म्हणून ते अडून बसले नाहीत. त्यांचं एकलेपण हीच त्यांच्या महनीयतेची खरी कसोटी ठरली. ' ग्रेटेस्ट इज़ ही हू स्टॅण्ड्स अलोन ' असं इब्सेननं कुठंसं म्हटलंय ना ? शंभर टक्के खरं आहे ते !

' सत्या असत्यासी मन केले ग्वाही ।
मानीयले नाही बहुमता ॥

या उक्तीत तुकोबारायांनीहि याच सत्याचा निर्भयपणानं पुरस्कार केला नाही का ? टाळवीणा घेऊन हजारो वारकरी आषाढी–कार्तिकीला पंढरीला जात तेव्हा तुकोबा भंडाऱ्याच्या डोंगरावर एकटेच भक्तीचा मळा फुलवीत. स्त्रीशूद्रादिकांना मोक्षाची कवाडे खुली करून देण्याची ईर्षा बाळगणाऱ्या अन् मराठी मायबोलीच्या ' कोवळिकेचा ' रसिकांना प्रत्यय आणून देण्याची प्रतिज्ञा उच्चारणाऱ्या ज्ञानदेवांनी जेव्हा आपल्या ध्येयाचा मुक्काम गाठण्यासाठी प्रस्थान ठेवलं तेव्हा त्यांना कितीजणांची सोबत लाभली ? सामान्य दर्ज्याची, सुखासीन वृत्तीची भीरू माणसं रुळलेल्या धोपट मार्गानं जाण्यासाठी उत्सुक असतात हे लक्षात घेऊनच येशूनं आपल्या अनुयायांना नवी, अक्षुण्ण, निरुंद वाट चोखाळण्याचा आदेश दिला ! अशाच वाटेनं जाणाऱ्या मुशाफिरांचं कर्तृत्व कसाला लागत असतं हे त्यानं स्वानुभवानं ओळखलं होतं.

माझा तो कविमित्र माथेरानहून परत आला तेव्हा आमच्यापैकी कुणीहि त्याला हसला नाही, की त्याची टरहि उडली नाही. उलट, माथेरानच्या परिसरात पाहिलेल्या अद्‌भुतरम्य सृष्टिसौंदर्याचं त्यानं वर्णन केलं तेव्हा साऱ्यांनी ते उत्सुकतेनं ऐकून घेतलं !

' दोज हू केम टू स्कॉफ रिमेन्ड टू प्रेज ' या विधानातल्या सत्याची प्रचीति प्रथमच त्या वेळी मला आली होती.

*

सुदर्शन १९५८

## १४. सतरंजी का कपडा था

कोंड्याचा मांडा करून दाखविणाऱ्या गृहिणी, श्रीखंडाचं पातेलं विसळून त्या 'मंथनातून' पीयूष तयार करणारे हॉटेलवाले आणि लघुकथेची पटकथा, पटकथेची कादंबरी अन् कादंबरीचं नाटक करणारे साहित्यिक या साऱ्यांना गुरुस्थानी मानूनच माझ्या त्या मित्रानं सुग्रणपणाचे पाठ गिरविले असले पाहिजेत असं त्या दिवशी मला राहून राहून वाटत होतं.

त्याचा माझा परिचय झाल्यानंतर प्रथमच मी त्या दिवशी त्याच्याकडे चहासाठी गेलो होतो. बैठकीत पाऊल टाकताच टेबलावरल्या वैश्वदेवाच्या कुंडानं माझं लक्ष वेधून घेतलं. एक दशग्रंथी, घनपाठी, व्युत्पन्न ब्राह्मण म्हणून नावलौकिक मिळवून मित्राच्या वडिलांनी नुकतीच इहलोकीची यात्रा आटोपली होती. त्यांची स्मृति म्हणून कदाचित् त्यानं आपल्या बैठकीत हे कुंड...

पण माझा कयास खोटा ठरला! सिगारेटची राख झाडण्यासाठी मित्रानं त्या कुंडाचा उपयोग केलेला पाहून चाट पडलो मी. पण त्याची व्यवहारनीति एवढ्यावरच थांबली नव्हती! वडिलांचं पुराण वाचण्याचं व्यासपीठ होतं त्याला चार पाय जोडून मित्रानं त्याची घडवंची तयार केली होती. कोणत्याशा पोथीची पानं आलमारीखाली टेकण म्हणून लावली होती. देवघरातल्या शाळीग्रामांचा पेपरवेटसारखा उपयोग केला होता. रुद्राक्षाच्या मण्यांचा लहान मुलीकडून बेंदुलांसारखा उपयोग केला जात होता...

वडिलांच्या विद्वत्तेसंबंधी माझ्याजवळ एकदा बोलताना तो 'चार पुराणं, सहा वेद अन् अठरा शास्त्रे यांचा त्यांनी अभ्यास केला होता' असं म्हणून गेला तेव्हा तपशील चुकीचा असूनहि मी त्याला हसलो नव्हतो. वाटलं वडि-

लांविषयीच्या आदराचं 'तत्त्व' तरी बरोबर असेल! पण त्याचीहि! अशी वासलात लागलेली पाहून हसावं की रडावं असा मला प्रश्न पडला!

त्या दिवशी मी त्याचा निरोप घेऊन घराबाहेर पडलो तो 'सतरंजी का कपडा था, पैजामा बना डाला' हा एका मिस्किल गझलातला सुरुवातीला चरण गुणगुणतच! विळा मोडून खिळा करणाऱ्यांच्या संप्रदायाचा त्या अज्ञात गझलकारानं मोठा मर्मभेदक उपहास केला होता. खरंच! या व्यवहारनीतिविशारदांच्या तावडीत भवानी तलवार सापडली असती तर तिच्या विळ्या नाहीतर दाढीची पाती तयार करून हे महात्मे केव्हाच मोकळे झाले असते, असं कधी कधी मला वाटू लागतं.

संगीताचा जन्म फुफ्फुसाचे विकार बरे करण्यासाठीच झालेला आहे अशी मनोमन श्रद्धा बाळगून त्या हेतूनं गायन क्लास चालविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे काही महाभाग पाहतोच की आपण!

× × ×

आजच्या घटकेला पहावं तिकडे असल्या 'उपयुक्ततावाद्यां'चं पेव फुटलेलं तुम्हाला आढळून येईल. वैज्ञानिकांनी अणुशक्तिविषयक संशोधन केलं ते काय हिटलर, स्टॅलिनसारख्या नृशंसांची युद्धलालसा तृप्त व्हावी म्हणून? विशुद्ध ज्ञानोपासनेतून त्यांच्या संशोधनाची निष्पत्ती झाली नाही का? पण जगातल्या यच्चयावत् हुकूमशहांना हे सारे शोध, सारे खटाटोप आपल्याच हेतुसिध्दीसाठी अवतरले आहेत असा भ्रम झालेला असतो अन् मग ते स्वतःच्या इच्छेस येईल तसं त्यांना वेठीस धरण्याची आकांक्षा बाळगतात!

महर्षि कार्ल मार्क्सचा समाजवाद भूतदयेच्या पोटी जन्मास आला. पण उदात्त तत्त्वज्ञान कम्युनिस्ट नेत्यांनी स्वतःच्या राजकारणाच्या गाड्याला जुंपलेलं पाहिलं की, 'ब्रूटॅलिटी दाय् नेम इज़् कम्युनिझम्" असा उद्गार आपोआपच माझ्या तोंडून बाहेर पडतो.

पूर्वसूरींच्या तत्त्वज्ञानाचा लहरीस येईल तसा खेळखंडोबा करणारे महाभाग जीवनाच्या विविध क्षेत्रात वावरत आहेत. गीतेत अनासक्तीचं नि अहिंसेचं तेवढं तत्त्वज्ञान सांगितलं आहे असं अट्टाहासानं प्रतिपादन करणाऱ्या आधुनिक भाष्यकारांची उठाठेव याच मासल्याची नाही का? अहिंसा व्यवहार्य की

अव्यवहार्य हा प्रश्न इथं अप्रस्तुत आहे. ज्याला ती व्यवहार्य वाटत असेल त्यानं तिचा खुशाल प्रचार करीत सुटावं. लोकशाहीच्या या युगात व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क कोण कसा हिरावून घेऊ शकणार ? पण स्वतःच्या मताचं समर्थन करण्यासाठी इतरांच्या विचारसरणीचा अर्थ लक्षात न घेता किंवा बुद्धया त्याकडे डोळेझाक करून हे महात्मे जेव्हा त्या विचारप्रणालीचा हवाला पुढे करू पाहतात तेव्हा बायबलाचा आधार शोधणाऱ्या सैतानाची मला आठवण होते ! गीतेचा अन् ज्या महाभारतात ती प्रतिपादिली गेली त्या ग्रंथाचा निर्विकल्प, विशुद्ध बुध्दीनं विचार करणारे मेधावी गीतेचं उद्दिष्ट अर्जुनाला युद्धाला प्रवृत्त करणं हेच होतं असाच निर्वाळा देत आले आहेत. भरसभेत आपली विटंबना करणाऱ्या दुःशासनादिकांना यथायोग्य शासन झालंच पाहिजे या द्रौपदीच्या मताशी कुंती, सहदेव यांच्याप्रमाणंच श्रीकृष्णहि सहमत असल्याचं अन् शिष्टाईला जाण्यापूर्वी त्यानं तसा द्रौपदीजवळ स्पष्ट उच्चार केल्याचं महाभारतात नमूद आहे. असे असताना अर्जुनाला अहिंसेचे नि अनासक्तीचे पाठ देण्यासाठी गीतेचा जन्म झाला असं समजणं यात केवढी आत्मप्रतारणा आहे ! सापवाद अहिंसेचं परिपालन करून प्रभू रामचंद्रानं समाजाला भव्योदात्त आदर्श घालून दिला आहे. दुष्टांचं निर्दालन हाच खरा अहिंसा धर्म आहे हे त्यानं सोदाहरण पटवून दिलं आहे. पण त्याचा हा आदर्श तोकडा वाटून त्याला शंभर टक्के अहिंसक बनविणारं नवं रामायण कुणी तरी लिहिणं आवश्यक आहे अशी आजच्या काही विद्वानांना तळमळ लागली आहे. रामकृष्णादि अवतारी पुरुषांचं व्यक्तिमत्व अविकसित होतं असा अभिप्राय प्रकट करणाऱ्यांच्या बुद्धिमांद्याची निदान कीव तरी करता येईल; पण त्या मर्यादा पुरुषोत्तमांच्या चरित्राची मोडतोड करून नंतर डागडुजी करायला निघालेल्या विश्वकल्याणाच्या मक्तेदाराचा हा अव्यापारेषु व्यापार पाहिला म्हणजे त्याला आळा घालणारी एखादी अज्ञात शक्ति प्रकट होणं आवश्यक आहे असं मनापासून वाटू लागतं !

समाजाची धारणा करणं हे धर्मसंस्थेचं खरं उद्दिष्ट. पण हे कितीशा धर्ममार्तंडांनी ओळखलं आहे ? उलट धर्म हा धंदा मानून मोक्षाचा सौदा पटवून देणारे पोटभरू दलालच आजच्या घटकेला तिकडे तिकडे दिसून येत नाहीत का ?

व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, सुधारणा वगैरे तत्त्वांचीहि आज अशीच थट्टा

चालू आहे. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असं समीकरण मनाशी मांडून ज्याच्या जसं इच्छेस येईल तसा तो वागू पहात आहे. लेखक, कवि, चित्रकार, नट, या साऱ्या कलावंतांनी कलामूल्यांचा मनास येईल तसा दुरुपयोग करावयास प्रारंभ केला आहे. कुणी तंत्रविषयक प्रयोगाच्या नावाखाली, कुणी सौंदर्योपासनेच्या नावाखाली, तर कुणी मनोगाहनाचं निमित्त पुढे करून आपल्या व्यक्तित्वाचं हिडिस प्रदर्शन करण्याचा चंग बांधला आहे.! कलेची अंगभूत मूल्ये सांभाळण्याच्या जबाबदारीबरोबरच ती सामाजिकतेशी सुसंवादी असली पाहिजेत हा दंडक साऱ्यांनीच झुगारून दिला आहे.

संगीतातले सप्तस्वर आपल्यापरी स्वतंत्र असूनहि रागदारीच्या विशिष्ट नियमांच्या अनुषंगानंच त्यांचा विलास चालत नाही का? जीवनसंगीताच्या बाबतीत सुसंगतीचं, सुसंवादाचं हे धोरण कुणीच सांभाळीनासा झाला आहे.

आता याच्या अभिव्यक्तिसाठी भाषेची गरज आहे असं समजणं हे प्रतिगामित्वाचं लक्षण मानलं जाऊ लागलं आहे. अर्थावाचून शब्दांची जुळणी करणाऱ्या कारागिराला आज मान्यता मिळत आहे. 'वागर्थाविव संपृक्तौ' असा शब्द आणि अर्थ याच्यातील अभेदाविषयी निर्वाळा देणारा कालिदास, 'वाचमर्थानुधावति' असा अभिप्राय प्रकट करणारा भवभूति किंवा 'अर्थ बोलाची वाट पाहे' या ओवीत शब्दांचं सामर्थ्य सूचित करणारे ज्ञानदेव ही सारी कवि मंडळी आजच्या भाषापंडितांपुढं कोठून टिकाव धरणार?

लोकशाहीचं मर्म न ओळखता आल्यामुळे तिची आज जी विटंबना होत आहे ती तर याहिपेक्षा हास्यास्पद आहे! रात्री हातभट्टीची दारू गाळणारा खलपुरुष दिवसा भक्तिभावानं लोकसेवेची कावड वाहून नेत असलेला दृष्टीस पडतो, ही काय लोकशाहीची बूज म्हणावयाची?

ही व इतर असलीच दृश्ये भोवताली थैमान घालीत असली म्हणजे रागानं मन बेभान होतं! पण असा मनस्ताप दिवसातून किती वेळा अन् कुणाकुणाबद्दल करावा? पावित्र्यविडंबनाचे असे काही प्रकार माझ्या दृष्टीस पडले म्हणजे संतापण्याऐवजी मी मनाशी नुसता गुणगुणत असतो—

'सतरंजी का कपडा था, पैजामा बना डाला!'

★

विवेक १९५४

# १५. आकाशदिवे

एकादा शापभ्रष्ट लहरी गायक नळाच्या रूपानं आमच्या चाळीत जन्माला आला होता की काय कोण जाणे! त्याची तबीयत केव्हा लागेल अन् केव्हा बिनसेल हे काही कुणाला सांगता येत नसे. स्वारीची कळी [ळ?] एकदा खुलली की समोर कुणी असो नसो, ती आपल्या 'रियाजात' मश्गुल झालेली असायची, पण लहर लागली नाही म्हणजे बादल्यांचे कान करून चाहती मंडळी कितीहि वेळ गराडा घालून बसली तरी या कलावंताला बिलकुल घाम फुटायचा नाही.

त्या दिवशी मध्यरात्रीच्या सुमाराला अशीच अचानक लहर लागून स्वारीचा कंठ खुलला. खानदानी उस्तादानं एकेक स्वर पिसून विजेची अस्ताई भरावी त्याप्रमाणे प्रथम टिपटिप करीत पाण्याचा एकेक थेंब पडू लागला. पण थोड्याच वेळात बिलंपदातून दुत लयीतला अंतरा सुरू झाला. त्यासरशी नळाशेजारच्या खोलीतले भिकूतात्या धावतच आपल्या खोलीबाहेर आले आणि झोपलेल्यांना हाका मारून जागे करू लागले. रात्री-अपरात्री जागत बसणाऱ्या भिकूतात्यात भगवंतांनी वर्णन केलेल्या संयमी पुरुषाचं रक्त खेळत होतं की काय कुणास ठाऊक! विसूभाऊंना ही शंका निराधार वाटावयाची. भगवद्गीतेतल्या संयमी पुरुषाचा राहोच, डुलक्या घेत पहारा करणाऱ्या गुरख्याचा कामचलाऊ संयमहि भिकूतात्यांना ठाऊक नाही, अशी त्यांची मिस्किल धारणा होती. खाटेतले ढेकूण मारीत काढत असेल रात्र जागून नाईलाजानं, अशी भिकूतात्यांच्या जागरणाची खवचट मीमांसा ते करीत.

ते काहीहि असो, चाळीत रात्री कुठे खुट्ट झालं की भिकूतात्या साऱ्या

भाडेकरूंना तत्परतेनं हाका मारून जागं करीत. त्या दिवशी त्यांनी असाच एकेकाला जागं करण्याचा सपाटा चालविला.

' अहो रामभाऊ, बंडोपंत, दिगूअण्णा झोपलात काय ? जरा बाहेर येऊन तर बघा, नळ सारखा वाहतोय्...'

भिकूतात्यांच्या हाकेसरशी चाळीतली समस्त निद्रिस्त जनता खाडकन् जागी होऊन गॅलरीत गोळा झाली. ' उत्तिष्ठ, प्राप्य वरान्निबोधत ' या ऋषिवचनाला किंवा ' झोपांकित हिंदुस्थानस्थांनो ! होऊ या खंबीर अन् देऊ गोऱ्यांना हो चांगलीच तंबी ' या दोन तपांपूर्वीच्या गणपतीच्या मेळ्यातील पद्यात समाविष्ट झालेल्या आशयाला कधी काळी मंडळी जागली नसेल इतक्या निरलसतेनं जो तो भिकूतात्यांची हांक ऐकून खोलीबाहेर आला.

' मंडळी, गेल्या महिन्यात आपल्या पाण्याचं बिल सत्तावीस रुपये आलं. अन् चोवीस तास पाणी वाहू लागलं तर सत्ताविसाचे सत्तर रुपये व्हायला काही वेळ लागणार नाही. म्हणजे गेल्या महिन्यात छत्तीस हजार मीटर पाणी सांडलं, तर या वेळीं...'

' मीटर नाही, गॅलन...' बेंद्रे मास्तरांनी ' सकळजन शहाणे करून सोडण्याच्या ' उदात्त हेतूनं मध्येच तोंड घातलं. ' कळलं रे ! शाळेतल्या पोरांना शिकवत बैस गॅलन का मीटर ते ! इतकं पाणी फुकट चाललंय, ते थांबवायची काही अक्कल सापडते का ते पहा आपल्या बुकांत ! '

' बेंद्रे मास्तर काय थांबवणार कपाळ ? या काँग्रेसच्या राजवटीत कारखानदारांची नीतिमत्ताच जिथं वाहवत गेली तिथं बेंद्र्यांची अक्कल काय पुरी पडणार ? ' दिगूअण्णा राजकीय पातळीवरून नळाचा प्रश्न हाताळींत म्हणाले, ' आमच्या लहानपणी तोट्या बंद होत असत त्या फक्त गोखल्यांच्या अंकगणितातल्या हौदाच्या ! एकीनं हौदात पाणी यायचं तर त्याच वेळीं दुसरीनं ते बाहेर निघून जायचं... '

' पण कारखानदारांपेक्षा एकंदर लोकांतच सामाजिक दृष्टीचा अभाव आहे असं मला वाटतं ' सर्वोदय संमेलनाच्या प्रसंगी चहाच्या स्टॉलचं कंत्राट घेणारे भाऊराव पितळे मध्येच म्हणाले, ' सार्वजनिक मालमत्तेचा वापर कसा करावा हे आपल्या लोकाना अद्याप कळलेलं नाही. कवि जाफराबादी म्हणतो ते खरं आहे अगदी. तो म्हणतो, ' अय पागल...'

'जाफराबादी गेला चरायला. कवीपेक्षा वैज्ञानिकांचीच आज देशाला खरी गरज आहे. नळाची तोटी कशी बंद करायची याचं साधं ज्ञानसुद्धा आम्हाला नसतं. अन् म्हणे...'

इतक्यात कुठेसा भजनाला गेलेला गणू माळी परत आला. गॅलरीत भाडेकरू मंडळी का गोळा झाली हे त्याला कळलं तेव्हा नळाकडे पहात तो म्हणाला, 'मेल्यानं बिगरून बसला आजुक! सकालच्यालाच टाकटुक करूनश्यान गप बसविला व्हता...'

असे म्हणून त्यानं आपल्या खोलीतून हातोडी, चिमटा अशी एक दोन हत्यारं आणली, नळाची तोटी खोलली, कुजून गेलेलं रबरी वॉशर काढून टाकलं आणि तात्पुरता उपाय म्हणून चिंधी गुंडाळून तोटी घट्ट बसवली. धो धो वाहणारी धार आता बरीच कमी झाली होती.

चाळीतल्या बुद्धिजीवी प्राण्यांची नळाच्या नादुरुस्तीविषयी मूलगामी चिकित्सा मात्र बराच वेळ चालू होती. गणूसारख्या सामान्य माणसानं केलेल्या तात्कालिक उपाययोजनेचं महत्त्व त्यांना कसं पटावं?

बिघडलेल्या तोटीबाबत चाळीतल्या जाणत्या मंडळींचं जे धोरण तेच समाजातल्या दोषांच्या नि उणीवांच्या बाबतीतहि त्यांनी स्वीकारलेले दिसून येते. सामाजिक जीवनात कुठेहि दोष उत्पन्न झाला, काही न्यून आढळून आलं की लगेच त्यासंबंधी चर्चा, टीका अन् वादविवाद यांची झोड उठत असते, पण कणभर कृतीनं या सामाजिक वैगुण्यांचा वा व्यंगांचा जेवढा परिहार होऊ शकेल त्याच्या शतांशानंहि मणभर शब्दांमुळे होऊ शकणार नाही हा साधा हिशेब काही आमच्या वाचावीरांच्या लक्षात येत नाही.

गोवा आंदोलन सुरू झाले तेव्हा नेहरू सरकारच्या पडखाऊ, भीरू धोरणाबद्दल अनेकांच्या जिव्हा अन् लेखण्या कुरकुरल्या. पण माझ्या परिचयाच्या एका गिरणीकामगाराच्या गरोदर स्त्रीनं आणि साठी उलटलेल्या एका वृद्धानं गोवा सत्याग्रहात भाग घेऊन भारताच्या इभ्रतीची जी चाड राखली, प्रत्यक्ष कृतीतून भारतीय अस्मितेचा प्रत्यय आणून दिला त्याच्या निम्म्यानं तरी या साऱ्या वाचस्पतींच्या वाग्विलासातून कार्यसिध्दी झाली का?

परवा दादर विभागांतील एका दुकानाला आग लागल्यावर हा हा म्हणता आजूबाजूच्या दुकानांनीहि पेट घेतला व ते भयंकर दृश्य बघण्यासाठी रस्त्यात ही

गर्दी जमली. सव्वीस जानेवारीचा दीपोत्सव पाहण्यास ज्या उत्सुकतेने अन् उत्साहाने लोक घराबाहेर पडत असतील त्यापेक्षा त्यावेळचा त्यांचा उत्साह नि उत्कंठा वेगळ्या प्रकारची होती असं मुळीच म्हणता आलं नसतं. आग विझविण्याच्या बाबतीत साहाय्य राहोच, उलट फायरब्रिगेडवाल्यांच्या कामात त्या आगांतुक गर्दीमुळं अडथळाच येत होता. आगीच्या प्रचंड ज्वाळा व धुराचे काळेकुट्ट लोट पहात असताना हे महाभाग 'आग कशी लागली असेल ? तिच्यामुळे झालेलं नुकसान विमा कंपनी भरून देईल किंवा नाही ? फायर ब्रिगेडचे बंब एक तास उशीरा आले असते तर नुकसानीचा आकडा किती लाखाच्या घरात गेला असता ?' इत्यादि प्रश्नांवर, शेकोटीजवळ बसून गप्पा माराव्यात त्याप्रमाणं चर्चा करीत होते.

वेळी-अवेळी आपला वाग्यज्ञ धडधडता ठेवणाऱ्या असल्या बोलघेवड्या 'ऋत्विजां'नी आजवर देशाचं जेवढं नुकसान केलं असेल तेवढं क्वचितच दुसऱ्यानं कुणी केलं असेल.

सरकारी दुकानात शिधापत्रिकेवर मिळणाऱ्या तांदुळाच्या नावानं तुम्ही आम्ही सारेचजण खडे फोडीत असतो. पण सहकारी तत्त्वावर एकादी संस्था स्थापन करून तिच्यामार्फत लोकांना चांगलं निवडलेलं, सकस धान्य पुरविण्याची खटपट करणारे कितीसे लोक निघू शकतील ?

लोक बेशिस्त बनले आहेत, आळशी अश्रद्ध होत चालले आहेत अशी टीका करणं सोपं आहे. पण मनुष्याला शिस्त लावणाऱ्या, त्याच्यात श्रद्धा उत्पन्न करणाऱ्या, त्याच्या मनावर सुसंस्कार करून संघजीवनाची आवड निर्माण करणाऱ्या एकाद्या संघटनेत अगर संस्थेत आपली मुलंबाळं पाठविल्यानंच आपल्या कल्पना साकारणार आहेत अशी कितीजणांना जाणीव झालेली असते !

●

' इट् इज बेटर टू लाईट दि कॅंडल दॅन टू कर्स दि डार्कनेस ! ' असं एक सुभाषित आहे ते किती अर्थपूर्ण आहे ! अंधाराच्या नावाने बोटं मोडीत बसण्यानं का तो उजळणार आहे ? त्यापेक्षा एकादी मेणबत्ती पेटवूनच त्याची भयाणता अंशतः कमी करता येणं शक्य नाही का ?

शकुंतलेच्या मुखमंडलाभोवती रुंजी घालणाऱ्या भ्रमराला कालिदासाच्या दुष्यंताने " वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृति " असे रसिकतेचे

प्रशस्तिपत्र बहाल केले ते स्वतः सत्यान्वेषणाच्या खटाटोपातील फोलपणा ध्यानी आल्यामुळेच नाही का ?

विश्वाच्या आदिकारणाचा नि त्याच्या स्वरूपाचा उलगडा व्हावा म्हणून वेदान्त्यांनी मारे घटपटादि दृष्टान्तांचा खटाटोप करून पाहिला. पण ते अनादि तत्त्व अखेरपर्यंत त्यांच्यापासून दूरच राहिले. उलट ज्यांनी भूतमात्राच्या ठिकाणी ईश्वराचे अस्तित्व कल्पून त्याचीच मनोभावे पूजा बांधली अशा कर्मयोगी संतांनाच ईश्वरी सामर्थ्याचा साक्षात्कार झाला व शेवटी ते ब्रह्मपदी विराजमान झाले.

शब्दांच्या फापटपसाऱ्यात परमात्मतत्व धुंडाळणाऱ्यांना उद्देशून तुकोबाराय म्हणतात, ' ठेवा जाणीव गुंडून । येथे भावचि प्रमाण ।।... तर्कवितर्कासी । पाप न लगे सायासी ।। तुका म्हणे भावेवीण । अवघा बोलती तो शीण ।। '

अनुभूतिवाचून शब्द-ज्ञानाचा तोरा मिरविणाऱ्याच्या उठाठेवीला, ते पोटाला चिंध्या गुंडाळून गर्भारपणाचा आभास निर्माण करणाऱ्या वांझेच्या चावटीची उपमा देतात. म्हणूनच ' भेदाभेद-मते भ्रमाचे संवाद ! आम्हा नको वाद त्याशी देऊं ' असे मागणे ते ईश्वराजवळ मागतात.

कृतीपेक्षा शब्दांना अधिक किंमत देणारे बोलके ढलपे जेव्हा माझ्या पाहण्यात येतात तेव्हा दिवाकरांच्या एका नाट्यछटेची मला हटकून आठवण होते. ' वर्डस्वर्थचे फुलपाखरू ' असे त्या नाट्यछटेचे शीर्षक आहे. वर्डस्वर्थच्या संवेदनक्षम कोमल अंतःकरणाची व त्यातून आविर्भूत झालेल्या काव्यसृष्टीची तोंड भरून स्तुति करता करता या रसिक महाशयाच्या तावडीत एक ढेकूण सापडतो, आणि ते लगेच त्याला दिव्याच्या ज्योतीवर धरून यमसदनाला पाठवितात असं त्या नाट्यछटेत दाखविले आहे. मनुष्याच्या दांभिकतेइतकाच त्याच्या वायफळ पांडित्याचाहि दिवाकरांनी मोठा मार्मिक उपहास केला आहे या नाट्यछटेत !

आग्रा घराण्यातील गायकीचा अभिमान बाळगणारे व तिच्या रियाजात एक तप घालविल्याची फुशारकी मिरविणारे माझ्या माहितीतले एक संगीतप्रेमी गृहस्थ उठल्यासुटल्या आधुनिक संगीतावर तोंडसुख घेत असतात. अलीकडच्या हलक्याफुलक्या भावगीतांनी नि लारीलप्पा छाप सिनेसंगीताने संगीताची चव बिघडविली असे ज्याला त्याला ते सांगत असतात. मुद्दा अगदी मान्य आहे.

पण प्रश्न एवढाच आहे की संगीताच्या अभिरुचिविषयी ज्याला इतकी आस्था अन् तळमळ वाटते त्याने हीन अभिरुचीच्या संगीताविरुद्ध घसाफोड करून उच्च संगीताची प्रतिष्ठा राखण्याचा आटापिटा करायचा की त्या घशातून अभिजात सुरावटीची निपज कशी होईल याची काळजी वहावयाची ?

बोलूकाकांचे असले नैष्कर्म्य पाहिले म्हणजे प्रभु रामचंद्रांनी मानवापेक्षा वानरसेनाच आपल्या साहाय्याला का घेतली याचा सहज उलगडा होऊ शकतो. सेतुबंधनाच्या वेळी तर अबोल खारीनेसुध्दा आपलं इवलंसं बळ एकवटून त्या मर्यादापुरुषोत्तमाला साहाय्य केलं म्हणतात. वाळूत लोळण घ्यायची आणि पाठीला चिकटतील तेवढे वाळूचे कण समुद्रात रिचवायचे असा तिने त्या प्रसंगी अव्याहत उपक्रम चालू ठेवला होता. रामचंद्रानं असल्या मुक्या प्राण्याऐवजी बोलघेवड्यांचीच आपल्या सैन्यात भरती केली असती तर त्यांनी रावणाला निषेधाचा खलिता पाठविण्याचा सल्ला दिला असता; अंगदाबरोबर निरनिराळी कलापथके पाठवून रावणाबरोबर सांस्कृतिक ऐक्य प्रस्थापित करण्याच्या योजना आखल्या असत्या किंवा 'कुंभकर्णाला निद्रानाशाचा विकार जडला होता की जीविताविषयीच्या निश्चितपणातून त्याचा समाधियोग अवतरला होता ?' अशासारख्या प्रश्नाचा परिसंवाद घेऊन युध्दासारख्या क्षुल्लक विषयावरून अन्य विषयांकडे रामाचं लक्ष वेधून घेण्याचा यत्न झाला असता.

स्त्रीशिक्षणाला विरोध करणाऱ्या कर्मठांना महात्मा फुले शब्दांनी उत्तर देण्याच्या भरीस पडले नाहीत. त्यांनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेत शिकवायला शिक्षिका मिळेना तेव्हा त्यांनी स्वतः आपल्या पत्नीला साक्षर करून अध्यापनाचा प्रश्न सोडविला. सभोवती दाटलेल्या अज्ञानाच्या काळोखाची भयाणता कमी करावयाची असेल तर प्रवचनापेक्षा प्रकाशाचीच अधिक गरज आहे हे ज्योतिरावांनी ओळखलं होतं. म्हणूनच त्यांचे जीवितकार्य पांथस्थांची वाट उजळणाऱ्या खडकावरल्या दिव्यासारखं प्रेरक व उपयुक्त ठरलं.

निष्क्रियतेच्या पोटी जन्माला आलेली भाष्ये कितीहि सुंदर असली तरी आकाशदिव्यांचा प्रकाश वाटचाल करण्यासाठी नसतो हेच खरं !

आमच्या चाळीतल्या नळाच्या नादुरुस्तीसंबंधीची वक्तव्यं काय कमी सुन्दर होती? पण गणू माळ्याच्या बोटभर चिंधीनं जे काम झालं ते इतरांच्या शब्दांचे सणंग करू शकले नाहीत !

★

विवेक, १९६०

प्रशस्तिपत्र बहाल केले ते स्वतः सत्यान्वेषणाच्या खटाटोपातील फोलपणा ध्यानी आल्यामुळेच नाही का ?

विश्वाच्या आदिकारणाचा नि त्याच्या स्वरूपाचा उलगडा व्हावा म्हणून वेदान्त्यांनी मारे घटपटादि दृष्टान्तांचा खटाटोप करून पाहिला. पण ते अनादि तत्त्व अखेरपर्यंत त्यांच्यापासून दूरच राहिले. उलट ज्यांनी भूतमात्राच्या ठिकाणी ईश्वराचे अस्तित्व कल्पून त्याचीच मनोभावे पूजा बांधली अशा कर्मयोगी संतांनाच ईश्वरी सामर्थ्याचा साक्षात्कार झाला व शेवटी ते ब्रह्मपदी विराजमान झाले.

शब्दांच्या फापटपसाऱ्यात परमात्मतत्व धुंडाळणाऱ्यांना उद्देशून तुकोबाराय म्हणतात, 'ठेवा जाणीव गुंडून। येथे भावचि प्रमाण ।।... तर्कवितर्कासी । पाप न लगे सायासी ।। तुका म्हणे भावेवीण । अवघा बोलती तो शीण ।।'

अनुभूतिवाचून शब्द-ज्ञानाचा तोरा मिरविणाऱ्याच्या उठाठेवीला, ते पोटाला चिंध्या गुंडाळून गर्भारपणाचा आभास निर्माण करणाऱ्या वांझेच्या चावटीची उपमा देतात. म्हणूनच 'भेदाभेद-मते भ्रमाचे संवाद ! आम्हा नको वाद त्याशी देऊं' असे मागणे ते ईश्वराजवळ मागतात.

कृतीपेक्षा शब्दांना अधिक किंमत देणारे बोलके ढलपे जेव्हा माझ्या पाहण्यात येतात तेव्हा दिवाकरांच्या एका नाट्यछटेची मला हटकून आठवण होते. 'वर्ड-स्वर्थचे फुलपाखरू' असे त्या नाट्यछटेचे शीर्षक आहे. वर्डस्वर्थच्या संवेदनक्षम कोमल अंतःकरणाची व त्यातून आविर्भूत झालेल्या काव्यसृष्टीची तोंड भरून स्तुति करता करता या रसिक महाशयाच्या तावडीत एक ढेकूण सापडतो, आणि ते लगेच त्याला दिव्याच्या ज्योतीवर धरून यमसदनाला पाठवितात असं त्या नाट्यछटेत दाखविले आहे. मनुष्याच्या दांभिकतेइतकाच त्याच्या वायफळ पांडित्याचाहि दिवाकरांनी मोठा मार्मिक उपहास केला आहे या नाट्यछटेत !

आग्रा घराण्यातील गायकीचा अभिमान बाळगणारे व तिच्या रियाजात एक तप घालविल्याची फुशारकी मिरविणारे माझ्या माहितीतले एक संगीतप्रेमी गृहस्थ उठल्यासुटल्या आधुनिक संगीतावर तोंडसुख घेत असतात. अलीकडच्या हलक्याफुलक्या भावगीतांनी नि लारीलप्पा छाप सिनेसंगीताने संगीताची चव बिघडविली असे ज्याला त्याला ते सांगत असतात. मुद्दा अगदी मान्य आहे.

पण प्रश्न एवढाच आहे की संगीताच्या अभिरुचिविषयी ज्याला इतकी आस्था अन् तळमळ वाटते त्याने हीन अभिरुचीच्या संगीताविरुद्ध घसाफोड करून उच्च संगीताची प्रतिष्ठा राखण्याचा आटापिटा करायचा की त्या घशातून अभिजात सुरावटीची निपज कशी होईल याची काळजी वहावयाची ?

बोलकांचे असले नैष्कर्म्य पाहिले म्हणजे प्रभु रामचंद्रांनी मानवापेक्षा वानरसेनाच आपल्या साहाय्याला का घेतली याचा सहज उलगडा होऊ शकतो. सेतुबंधनाच्या वेळी तर अबोल खारीनेसुध्दा आपलं इवलंसं बळ एकवटून त्या मर्यादापुरुषोत्तमाला साहाय्य केलं म्हणतात. वाळूत लोळण घ्यायची आणि पाठीला चिकटतील तेवढे वाळूचे कण समुद्रात रिचवायचे असा तिने त्या प्रसंगी अव्याहत उपक्रम चालू ठेवला होता. रामचंद्रानं असल्या मुक्या प्राण्याऐवजी बोलघेवड्यांचीच आपल्या सैन्यात भरती केली असती तर त्यांनी रावणाला निषेधाचा खलिता पाठविण्याचा सल्ला दिला असता; अंगदाबरोबर निरनिराळी कलापथके पाठवून रावणाबरोबर सांस्कृतिक ऐक्य प्रस्थापित करण्याच्या योजना आखल्या असत्या किंवा ‘ कुंभकर्णाला निद्रानाशाचा विकार जडला होता की जीविताविषयीच्या निश्चिंतपणातून त्याचा समाधियोग अवतरला होता ? ’ अशासारख्या प्रश्नाचा परिसंवाद घेऊन युध्दासारख्या क्षुल्लक विषयावरून अन्य विषयांकडे रामाचं लक्ष वेधून घेण्याचा यत्न झाला असता.

स्त्रीशिक्षणाला विरोध करणाऱ्या कर्मठांना महात्मा फुले शब्दांनी उत्तर देण्याच्या भरीस पडले नाहीत. त्यांनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेत शिकवायला शिक्षिका मिळेना तेव्हा त्यांनी स्वतः आपल्या पत्नीला साक्षर करून अध्यापनाचा प्रश्न सोडविला. सभोवती दाटलेल्या अज्ञानाच्या काळोखाची भयाणता कमी करावयाची असेल तर प्रवचनापेक्षा प्रकाशाचीच अधिक गरज आहे हे ज्योतिरावांनी ओळखलं होतं. म्हणूनच त्यांचे जीवितकार्य पांथस्थांची वाट उजळणाऱ्या खडकावरल्या दिव्यासारखं प्रेरक व उपयुक्त ठरलं.

निष्क्रियतेच्या पोटी जन्माला आलेली भाष्ये कितीहि सुंदर असली तरी आकाशदिव्यांचा प्रकाश वाटचाल करण्यासाठी नसतो हेच खरं !

आमच्या चाळीतल्या नळाच्या नादुरुस्तीसंबंधीची वक्तव्यं काय कमी सुन्दर होती? पण गणू माळ्याच्या बोटभर चिंधीनं जे काम झालं ते इतरांच्या शब्दांचे सणंग करू शकले नाहीत !

★

विवेक, १९६०

## १६. नैवेद्याची वाटी

पंचविशीतल्या मुलींनी आपणाला नायिकेची भूमिका हवी म्हणून हट्ट धरून बसावा हे एक वेळ स्वाभाविक म्हणता येईल, पण चाळिशी उलटलेल्या पोक्त स्त्रियांनीहि सासूची भूमिका वाट्याला येताच चक्क मानेला हिसडा द्यावा हे टॅक्सी ड्रायव्हरनं लॉरी ड्रॉयव्हरच्या धंद्याचा निषेध करण्यासारखंच वेडेपणाचं नव्हतं का ? मिक्श्चर ढवळणाऱ्या कंपाउंडरला काष्ठौषधी खलण्यात कमीपणा वाटावा, किंवा गाईड काढणाऱ्यानं क्लास चालविणाऱ्याला नाक मुरडावं अशापैकीच तो चमत्कारिक ' गंड ' होता ! यामुळं आमच्या चाळींत कुठलंच नाटक बसण्याचं चिन्ह दिसेना ! दुष्यन्त शकुंतला व्हायला बहुतेकजण तयार. पण कण्वबाबा किंवा गौतमी आत्याच्या भूमिकेचा प्रश्न निघाला की तिथंच त्यावर पडदा पडे ? कचाचं काम करायला साऱ्यांची तयारी, पण शुक्राचार्यांचं नाव निघालं की विद्याहरणापेक्षा ' वत्सलाहरण ' काही वाईट नाही असा सर्वांचा अभिप्राय पडे !

खरं पाहता, वृद्धाची भूमिका झाली म्हणून तिच्यात अभिनयकौशल्याला वाव नाही असं थोडंच आहे ? आमच्या वऱ्हाडातल्या एका नाटक मंडळीतला ऐन तिशीतला तरणाबांड तरुण ऐंशी वर्षांच्या शेलारमामाची अशा तादात्म्यानं भूमिका वठवी की प्रेक्षकांना वाटायचे गावातला संभु चौधरी नाहीतर संतोबा हिंगमिरे शेलारमामाच्या वेषात रंगभूमीवर आलाय !

पण आपखुषीनं वृद्धाची भूमिका पत्करणारा नट एकंदरीनं विरळाच ! जीवनाच्या रंगभूमीवरहि प्रायः असाच अनुभव आपणाला येत नाही का ? शैशवातलं रम्यपण आणि यौवनातली मोहकता साऱ्याच कवींच्या काव्यांचा

विषय झाली आहे. पण वार्धक्यावर काही कुणी कविता लिहिल्याचं फारसं आढळात नाही. ' आजोबांची शेंडी कशी भुरू भुरू हाले ' अशासारख्या गंमती-खातर लिहिलेल्या शिशुगीतांचा अपवाद सोडला तर, वृद्धावस्थेतल्या स्निग्ध-गंभीर, चिंतनशील वृत्तीचं दर्शन घडविणाऱ्या कविता हातावरच्या बोटावर मोजण्याइतक्याहि सापडतील की नाही शंकाच आहे !

आपणापैकी सर्वांनाच केव्हा ना केव्हा तरी जीवनाच्या रंगमंचावर वृद्धाच्य भूमिकेत वावरायचं आहे हे ठाऊक असूनहि ती टाळता येईल तितकी टाळ-ण्याचा साऱ्यांचाच प्रयत्न चाललेला असतो ? कुणी केसांना कलप चोपडून, कुणी दाताची कवळी बसवून, तर कुणी गंगावनाच्या आश्रयानं आपलं यौवन काही काळ पुढे रेटीत नेण्याचा बालीश प्रयत्न करीत असलेले दिसून येत आहेत !

तसं पाहिलं तर वृद्धावस्थेबद्दल खंत वाटावी असं तिच्यात काय आहे ? शैशवाची मुग्धता म्हातारपणात नसेल, यौवनातला जोम या कालखंडात दिसून येणार नाही, पण या काळात जे काही दिसेल, जे प्रत्ययाला येईल. त्याचा बाल्यात नि तारुण्यात तरी आपणाला कुठं आढळ होतो ? बालपणातला तो अवखळपणा, चंचलपणा, खेळकरपणा, तसंच युवावस्थेतला तो अनावर उत्साह, ती दुर्दम्य विजिगीषा, ती अमर्याद युयुत्सु वृत्ति हे सारं वृद्धापकाळी दिसणार नाही हे खरं, पण वृद्धावस्थेतला तो संयम, निग्रही स्वभाव, ती शांत प्रेमळ वृत्ति, तो विवेकपूर्ण आचार यांचे मनोज्ञ दर्शन आयुष्याच्या दुसऱ्या कुठल्या अवस्थेत आपणाला घडू शकतं.

नाशिक–त्र्यंबकेश्वरजवळच्या गोदावरीच्या प्रवाहात किंवा भेडाघाटाच्या नर्मदेच्या प्रवाहात डुंबताना मला बरोबरीच्या अवखळ मित्रमैत्रिणींबरोबर हसत-खिदळत असल्याचा सुखद भास झाला होता. पण तेच भडोचजवळ नर्मदेच्या विशाल रुंदावलेल्या पात्राचं दर्शन घडलं तेव्हा मला माझ्या उदारमनस्क, शांत, पवित्र आजीचं रूप पहात असल्याप्रमाणं वाटलं होतं. नांदेडच्या परिसरात धीरगंभीरपणे वाहणाऱ्या गोदेच्या प्रवाहात मी जेव्हा जेव्हा उतरतो तेव्हा तेव्हा आजीच्या प्रेमळ कुशीत विसावल्याचा मधुर साक्षात्कार अनुभवीत असतो !

मुसमुसलेल्या यौवनात पदार्पण करणाऱ्या शकुंतलेचं अतिशय सुंदर चित्र

राजा रविवर्म्यानं रेखाटलं आहे. कविकुलगुरूच्या या प्रतिभेनं शब्दाचं माध्यम टाकून देऊन रंगाच्या नि रेषांच्या आश्रयानं त्या मुग्धकन्येचं लावण्य चित्रित केलं की काय असा आभास व्हावा इतकी चतुराई रविवर्म्याच्या कुंचल्यातून प्रकट झाली आहे! पण त्या रूपवतीचं यौवन रंगरेखांतून साकार करताना त्या थोर कलावंताला जशी धन्यता वाटली असेल तसं तिच्या प्रौढ, वयस्क अवस्थेचं चित्रण करतानाहि त्याला सार्थकतेचं समाधान लाभलं असेल यात मुळीच संदेह नाही! भरताला विजनवासात नेमबाजीचे धडे देत असलेल्या वयस्कर शकुंतलेची रंगरेखा दुष्यंताचा लक्ष्यवेध करणाऱ्या आश्रमातल्या शकुंतलेच्या चित्राइतकी मोहक नाही असं कुणीतरी म्हणू शकेल का?

वाऱ्याबरोबर डोलणाऱ्या शिवारावर पसरलेली श्रावणमासातली हिरवी नवलाई डोळ्याचं पारण फेडण्याइतकी सुंदर खरी, पण पुढे माघात त्या शिवाराला पिवळा जरठपणा येतो तेव्हाच जीवनसाफल्याची नि तृप्तीची आभा त्याच्या कणाकणातून ओसंडताना आपणाला दिसते ना!

काही वर्षांपूर्वी मद्रासनजीकच्या अड्यारचा आश्रम पाहण्याची संधि मला मिळाली होती. हजारो वर्षांपूर्वीचा एक विशाल वटवृक्ष त्या आश्रमाच्या परिसरात जोपासून ठेवला आहे. वृक्षासभोवतालच्या विस्तीर्ण बागेमुळं अतिथि अभ्यागताचं मन प्रसन्न होतंच, पण अनंत शाखांनी विस्तारलेला तो प्रचंड प्राचीन वटवृक्ष पहात असताना मनावर एका वेगळयाच अननुभूत जाणीवेचा ठसा उमटल्यावाचून रहात नाही. पोराबाळांनी, नातवापणतवांनी गजबजलेल्या प्रपंचात एखाद्या वृद्धाचं व्यक्तिमत्व आगळ्या वैशिष्ट्यानं उठून दिसावं तसा हा पुरातन वटराज पाहताच मला चटकन गुरुवर्य अण्णासाहेब कर्व्यांची आठवण झाली. मुलं, नातू, सुना, नातसुना यांच्या मेळाव्यात अण्णांची ती गूढगंभीर, काहीशी ठेंगणी, वाकलेली मूर्तिहि अशीच सर्वांचं लक्ष वेधून घेत नसेल का?

अण्णांच्या पाठोपाठ आणखी कितीतरी तसल्याच तपस्वीतुल्य वृद्धांच्या आकृति माझ्या मनश्चक्षूंसमोर तरळू लागल्या. शांतिनिकेतनच्या रम्य वातावरणात शिष्यांच्या परिवारात उभे असलेले गुरुदेव टागोर, सत्तरी उलटली तरी पूर्वीच्या उत्साहानं अन् उल्हसित वृत्तीनं कादंबऱ्यांच्या कथानकांचे आराखडे निश्चित करण्यात गढून गेलेला सर हॉल केन, साहित्यात साधुत्वाचा आविष्कार करणारा टॉलस्टॉय, मिस्किल शैलीनं जीवनावर भाष्य करणारा

बर्नार्ड शॉ या साऱ्यांच्या साहित्यकृती माझ्या मनाला जशी भुरळ घालतात तशा पांढऱ्याशुभ्र दाढीमिशामुळं अधिकच गंभीर नि प्रसन्न वाटणाऱ्या त्यांच्या चर्याहि मला आदरणीय वाटतात ! अनादि कालापासून चालत आलेल्या ज्ञान-साधनेच्या सनातन, समुज्ज्वल परंपरेत खंड न पडू देणारे हे आधुनिक ऋषि-मुनीच नव्हेत काय ?

'बालकांचं मनोरंजन करणारांचं नातं परमेश्वराशी जडतं' अशा आशयाची सानेगुरुजींची एक कविता आहे. घरोघरी बाळगोपाळांना राजाराणीच्या कहाण्या सांगून त्यांना सदा हसतखेळत ठेवणाऱ्या आजीबाई–आजोबांवर ईश्वर खरोखरच वरदहस्त ठेवीत असला पाहिजे ! म्हातारपणाचा मरणाशी संबंध जोडणारांनी सानेगुरुजींनी सुचविलेलं नातं अवश्य ध्यानी घ्यावं.

वार्धक्यात पिकू लागलेले केस म्हणजे पांढरी निशाणं घेऊन येणारी कृतांताची सेना आहे असं एका कविवर्यांनी म्हटलं असलं तरी मला मात्र या वयात केसांना प्राप्त होणारी पांढुरकी छटा नगाधिराजाच्या हिमाच्छादित शिखराची आठवण करून देते आणि त्या पाठोपाठच त्या गिरिवराच्या भव्योदात्ततेचा, शुचितेचा अन् उत्तुंगपणाचा माझ्या अंतर्यामावर असा काही ववघवीत ठसा उमटतो, की म्हातारपणाला कुणी कितीहि नावं ठेवली, बोटं मोडली तरी तो त्यामुळं यत्किंचित्‌हि पुसट होत नाही. म्हणूनच भास्करराव तांब्यांनी कलत्या आयुष्याला दिलेली रिकाम्या मधुघटाची उपमा मला निराशेची द्योतक वाटत नाही. यौवनातल्या यच्चयावत् भोगाचा आस्वाद घ्यायला लागणारी रसवत्ता उतारवयात शिल्लक राहिली नाही हे त्या कवितेत त्यांनी सुचवलं खरं, पण त्याबरोबरच उरल्यासुरल्या आयुष्याचं नैवेद्याच्या दुधाच्या वाटीशी साम्य कल्पून त्यांनी जरावस्थेचा किती मार्मिकपणे गौरव केला आहे ! 'भोगलालसा क्षीण झाल्या, स्वार्थवृत्ति गळाल्या, भौतिका-बद्दलची ओढ संपुष्टात आली, आता शिल्लक राहिली ती परमार्थाची आंस, आत्मोद्धाराची तळमळ, परमात्म्याच्या साक्षात्काराचा निदिध्यास' हा विचार सूचित करताना अशा उदात्ताच्या अनुभूतीसाठी आयुष्याची अंतिम अवस्थाच अनुकूल असल्याचंहि त्यांनी ध्वनित केलं नाही का ? या अवस्थेला तांब्यांनी कोरांटीचं फूल म्हटलं खरं, पण या उपमेत त्या अवस्थेचा अधिक्षेप केला आहे असं मला वाटत नाही. गुलाबाचा गंध नि रंगरूप कोरांटीला

नसेल, पण भक्तिभावाचा, निरहंकाराच्या जाणीवेचा निस्यंद ज्या अवस्थेत निथळत असतो तिला कोरांटीची उपमा देण्यातच औचित्य नाही का ?

हे औचित्य जोपर्यंत आम्हाला जाणवणार नाही तोपर्यंत कण्वाच्या नाहीतर गौतमी आत्याच्या भूमिकेबद्दल आम्ही अशीच नाराजी प्रकट करीत राहू ही गोष्ट वेगळी !

*

भानकरी दिवाळी अंक, १९६३

## १७. नेणीवेतील जादू !

अवघ्या साडेतीन रुपयांत त्रिकालदर्शी आरसा पोस्टानं पाठविण्याचं आश्वासन देणाऱ्या अलीगड, अमृतसरवाल्या जाहिरातदारांना हसावं की रडावं, हेच मला कळेनासं होतं ! गेलेलं तारुण्य आणि जोम परत मिळविण्यासाठी वनस्पती तुपाचा उपयोग करायला बिनदिक्कतपणे सांगणाऱ्या मुंबईच्या कारखानदारांच्या विज्ञापनातसुद्धा यापेक्षा कमी विनोद असेल, असं माझं प्रामाणिक मत आहे ! देवादानवांनी केलेल्या समुद्रमंथनातून अमृतकलशाऐवजी डालडाचा डबा बाहेर आला होता, अशी उद्या एखाद्यानं लोणकढी ठेवून दिली तर एक वेळ तिच्यावर विश्वास ठेवता येईल; पण साडेतीन रुपयात त्रिकालदर्शी आरसा पाठविण्याचं अभिवचन देणाऱ्या उत्तर हिंदुस्थानातल्या कंपन्यांवर माझा काडीचाहि भरवसा बसणं शक्य नाही ! लहानपणी हिंदुस्थानचा भूगोल शिकताना, लांब व मोठ्या नद्यांमुळे उत्तरेकडील प्रदेश सुपीक बनल्याचं मी वाचलं होतं ! पण जमिनीपेक्षाहि तिकडील जाहिरातदारांचा मेंदू कितीतरी पटीनं सुपीक असल्याचं आता माझ्या लक्षात येऊ लागलं होतं !

साडेतीन रुपयांत तिन्ही काळांचंच काय, पण साध्या दाढीचं यथार्थ प्रतिबिंब उमटेल, असा चांगला आरसा बाजारात मिळणं हल्ली दुर्मिळ झालंय. एका न्हाव्याच्या साधनसामुग्रीचं वर्णन करताना कुणीतरी विनोदानं म्हटलंय ना, की 'अल्लाउद्दीन खिलजीनं असल्या आरशात पद्मिनीचं प्रतिबिंब पाहिलं असतं तर इतिहासाला निराळंच वळण मिळालं असतं !' पद्मिनीऐवजी बुद्ध भिक्षुणीची छवी पहात असल्याचा आभास उत्पन्न करणारा बेढब आरसा इतिहासाला वळण लावणार नाही तर काय ?

नसेल, पण भक्तिभावाचा, निरहंकाराच्या जाणीवेचा निस्यंद ज्या अवस्थेत निथळत असतो तिला कोरांटीची उपमा देण्यातच औचित्य नाही का?

हे औचित्य जोपर्यंत आम्हाला जाणवणार नाही तोपर्यंत कण्वाच्या नाहीतर गौतमी आत्याच्या भूमिकेबद्दल आम्ही अशीच नाराजी प्रकट करीत राहू ही गोष्ट वेगळी!

*

भानकरी दिवाळी अंक, १९६३

' वर्तमाना 'शीहि इमान न राखणारे आरसे जिथं सर्वत्र दृष्टीस पडत आहेत तिथं भूत, वर्तमान नि भविष्य या तिन्ही काळाचं दर्शन घडविणाऱ्या आरशाची पैदास होऊ शकेल असा कशाच्या आधारावर विश्वास बाळगावा ?

आरशाच्या जन्मकुंडलीच्या नाही तर हस्तरेषांच्या सहाय्यानं अनिश्चित, अनियमित नि अथांग अशा मानवी जीवि नाच्या भवितव्याचा वेध घेऊ पाहणंच मला मुळीं बालीशपणाचं द्योतक वाटतं ?

आजपर्यंत दहा-पंधरा भविष्यवेत्त्यांनी माझं भविष्य वर्तविण्याचा यत्न केला असेल. काहींनी राशीवरून, काहींनी रेषावरून तर काहींनी प्रचारातल्या नावावरून (पण खरं पाहिलं तर तोंड पाहून भविष्य वर्तविणाऱ्याच्या वर्गातच त्यातले बहुतेकजण मोडण्यासारखे होते!) भाकित केलं होतं. पण एकाचं निवेदन दुसऱ्याच्या निवेदनाशी जुळण्यासारखं नव्हतं! अन् मला त्यानंतरच्या वीस-पंचवीस वर्षांत जे जे अनुभव आले, जी जी सुखदुःखं भोगावी लागली, त्यांचा तर एकाहि ज्योतिषानं उच्चार केला नव्हता.

' ऐन तारुण्यात दाराशी हत्ती झुलू लागेल ' असं एका ज्योतिषीमहाशयांनी माझं भविष्य वर्तविलं होतं. हत्तीच काय पण दरवाज्यावर डुलक्या घेणारा गुरखा किंवा पुरभय्यासुद्धा ठेवण्याची ऐपत अद्याप माझ्या ठिकाणी आली नव्हती अन् यापुढेहि ती कधी काळीं येईल असं मला वाटत नाही !

माझ्या नशीबात लहानपणीच विदेशगमनाचा योग असल्याचा एकाला शोध लागला होता. विलायतेत सर्व काही स्वस्तात मिळतं हे आमच्या आजीला आधीच कुणीतरी सांगितलेलं असल्यामुळं तिनं ते भविष्य ऐकून युरोपात खरेदी करावयाच्या जिनसांची एक भलीमोठी यादीच तयार केली! सहाण, गोपीचंदनाचा खडा, शिवलीलामृत पोथी, आमसूल, केरसुणी...

त्या वेळचं माझं वय दुसऱ्याची थट्टा करण्याचं नव्हतं म्हणून बरं! नाही तर मी आजीला हसत हसत म्हटलं असतं, ' विलायतेहून स्वदेशी परतताना दोनच गोष्टी आणायच्या असतात आजी बरोबर! बाई अन् बाटली ! '

बाकी वयाच्या चौथ्या वर्षी आई अन् पाचव्या वर्षी वडील दिवंगत झाल्यामुळं मी ' परदेशी ' ठरलो नि निराळ्याच अर्थानं त्या ज्योतिषाचं भाकित खरं ठरलं, हे मला कबूल करायला हवं !

साप्ताहिक राशी–भविष्य वर्तविणाऱ्यात तर मंत्री, कवि, आणि ऋणको या

तिघांचाहि एका वेळीं संचार झालेला असतो की काय कुणास ठाऊक! थापा मारण्याच्या यांचा कोणीहि हात धरू शकणार नाही. माझ्या पत्नीला असल्या भविष्यातला फोलपणा पुरेपूर पटला म्हणून ठीक आहे, नाही तर पूर्वी स्त्रियांचा नव्याने परिचय घडेल असं एखाद्या आठवडयात माझं भविष्य छापून आलं की नव्या चेहऱ्याऐवजी आमच्या घरातल्या चिरपरिचित भांडयांची पूर्वीची ओळख नव्यानं पटवून घ्यावी लागत असे मला! आदळआपटीमुळं जागजागी बोचे पडलेल्या भांडयांची पूर्वीची ओळख बुजून जाणार नाही तर काय? पण आता एखाद्या भविष्यकारानं माझ्या आयुष्यात योग द्विभार्या असल्याचा उल्लेख केला तरी माझी सहधर्मचारिणी स्थितप्रज्ञाच्या निश्चिंतपणानं डाराडूर झोप काढू शकते!

अचानक द्रव्यलाभाचा योग असल्याचं वाचून नंदनवनात विहार करीत असल्याप्रमाणं अस्मादिकाला वाटावं, पण प्रत्यक्षात धनलाभाऐवजी व्ही. पी. अन् नॉटपेड पत्रांशीच गाठ पडल्यावर खांडव वनात सापडल्यासारखी स्थिति व्हावी, असा कैक वेळा मला अनुभव आला आहे!

कळसूत्री बाहुल्यांच्या हालचालीप्रमाणं मानवी जीवनातील घटना नियंत्रित करणारी अज्ञात शक्ति या विश्वात वास करीत असावी, ही कल्पनाच मला हास्यास्पद वाटते!

असल्या शब्दांना कवि नियतीच्या सामर्थ्याची कितीहि भलावण करोत, 'हरिणापि हरेणापि ब्रह्मणा त्रिदशैरपि' 'ललाटलिखिता रेखा न शक्या परिमार्जितुम्', 'लिखितमिह ललाटे प्रोज्झितुं कः समर्थः' वगैरे वचनांनी सुभाषितकार दैवाच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् शक्तीचा केवढाहि निर्वाळा देवोत, माझं मन काही केल्या त्याला शरणचिठ्ठी लिहून द्यायला तयार होत नाही. सुभाषितांच्या सहाय्यानंच एखाद्या गोष्टीचं अस्तित्व सिद्ध करायचं असेल तर प्रयत्नवादाच्या बाजूनंहि थोडीथोडकी वचनं देता येण्यासारखी नाहीत! 'तस्मात् पुरुषकारेण विना दैवं न सिद्धति', 'दैवमाश्वनामात्रं दुःखे पेलव बुद्धिषु', 'मुढै प्रकल्पितं दैवं तत्परास्ते क्षमं गताः। प्रज्ञास्तु पौरुषार्थेन पदमुत्तमतां गताः।' इत्यादि सुभाषितांत दैववादातला फोलपणा दाखवून घेऊन प्रयत्नवादाची केवढी थोरवी गायली आहे! 'असंशय दैवपरः क्षिप्रमेय विनश्यति' (दैववादी मनुष्य सत्वर नाश पावतो) असा निःसंदिग्ध निर्वाळा देणाऱ्या महाभारतकारांनी

' उदाराणां तु सत्कर्म देव क्लीबा उपासते ' (श्रेष्ठ प्रकारचे लोक सत्कर्माची कास धरतात, दुबळे लोक दैवावर हवाला ठेवतात) असाहि सडेतोड शब्दांत अभिप्राय व्यक्त केला आहे!

रामायणकारांनीहि प्रयत्नवादाचा पक्ष उचलून धरताना रामाच्या तोंडी असाच उद्‌गार घातला आहे. ' या त्वं विरहिता नीता चलच्चित्तेन रक्षसा। दैवसंपादितो दोषो मानुषेण मया जितः।' (चंचल चित्ताच्या राक्षसानं तुला एकटी पाहून नेलं, हा अनर्थ दैवामुळे पडला व तो मानवी प्रयत्नानं मी नाहीसा केला!)

एके ठिकाणी तर महाभारतकारांप्रमाणंच त्यांनीहि दैववाद्यांचा निषेध करतांना अगदी स्पष्ट शब्दांत म्हटलं आहे, ' विप्लवो वीर्यहीनो यः सः दैवमनुवर्तते। वीराः संभावितात्मानो न दैवं पर्युपासते ' (जो भित्रा बनतो आणि ज्याच्या अंगी पराक्रम नसतो, तो दैवाच्या मागे लागतो. परंतु प्रतिष्ठित वीर पुरुष दैवाची कांस धरून बसत नाहीत.)

अशा प्रकारे दैव आणि प्रयत्न या दोहोंचीहि तरफदारी करणारी वचनं पाहिली म्हणजे मी क्षणभर गोंधळून जातो. पण दुसऱ्याच क्षणी स्वतःशी असा विचार करतो– प्रयत्नवादाची महति गाणाऱ्या मेधावींना त्याच्या मर्यादा कळल्या नसतील असं नाही. उलट श्रीकृष्णासारख्या प्रज्ञावंतांनीसुद्धा कर्मसिद्धीची मीमांसा करताना अधिष्ठान, कर्ता इत्यादि पाच घटकांचा जो उल्लेख केला आहे त्यात दैवाला पांचवं स्थान दिलं आहे हे सर्वविश्रुत आहे.

पण काही झालं तरी दैव ही एक जिवंत शक्ति असून ती हेतुपुरःसरपणे मानवाच्या जीवननाटकातील प्रवेशाची आगाऊ आखणी करीत असते हा काही श्रीकृष्णाच्या मीमांसेचा अर्थ होऊ शकत नाही!

आयुष्यात जे अकल्पितपणे घडून येतं, जे योगायोगानं जुळून येतं; जे मानवी प्रयत्नांना अनुकूल बनून यशापयशाला कारणीभूत होतं अशा गोष्टीला ' परिस्थिती ', ' दैव ', ' योगायोग ' इत्यादि नावं पूर्वसूरींनी योजली आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, मनुष्यानं भविष्याविषयी बांधलेले संकेत, ग्रहांच्या अन् नक्षत्रांच्या हालचालींशी मानवी जीवितातील घटितं निगडित करण्याचा व त्यावर ज्योतिषशास्त्राची उभारणी करण्याचा चालवलेला आग्रह फोलच म्हणू नये का?

‘ माझ्या भावी कालाविषयी ज्योतिषांनी केलेली अनुमानं साफ चुकली ’ असं मी आपल्या स्नेह्यांना सांगू लागलो म्हणजे त्यापैकी काहीजण म्हणत असतात, ‘ तुझं भविष्य चुकलं म्हणून सारं ज्योतिषशास्त्रच खोटं आहे असं कसं म्हणतोस ? तुझी कुंडली कदाचित जन्मवेळेबरहुकूम तयार झालेली नसेल. आजवर शेकडोजणांना भविष्याचा ठोकताळा पटला तो उगीचच काय ? ’

माझ्या मित्रांच्या म्हणण्याप्रमाणं फलज्योतिष्य हे अनुभवसिद्ध शास्त्र आहे, असं घटकाभर मानलं तरी माझा त्याला विरोध आहे तो निराळ्याच कारणानं ! ‘ तुमच्या आयुष्यात अमुक अमुक घडणार आहे ’ असं कुणी मला सांगू लागला म्हणजे मी लगेच त्याला म्हणत असतो, ‘ पुरे झालं बाबा ! माझ्या आयुष्यात ज्या काही बऱ्यावाईट, कडूगोड, सुखदुःखमिश्रित घटना विधीनं लिहून ठेवल्या असतील त्यांचं स्वरूप माझं मलाच प्रत्यक्ष अनुभवानं ठरवू दे ! ’

जीवन हे शर्यतीचं मैदान आहे असं मानणाऱ्यांनी फार तर आपापलं भविष्य आगाऊ पाहून ठेवावं ! पण मला जीवन म्हणजे शर्यतीचं मैदान वाटत नाही. ते क्रिकेटचं रम्य क्रीडांगण आहे असा माझा विश्वास आहे. खेळाच्या अनिश्चितपणामुळं क्षणाक्षणाला जिथं खेळाडू नि प्रेक्षक आशानिराशेच्या हिंदोळ्यावर झोके घेत असतात, खेळाच्या निर्णयाकडे जिथं सारेजण वाढत्या उत्कंठेनं डोळे लावून बसलेले असतात, त्यांना त्या खेळाची भवितव्यता अगोदरच कळली तर खेळातलं स्वारस्यच संपल्यासारखं वाटणार नाही का ? मनुष्य जोपर्यंत भविष्यकालाविषयी साशंक आहे, संदेहावस्थेत आहे तोपर्यंत त्याला जीवनांत गंमत वाटणार आहे ! ‘ मनुष्याला आपला ललाटलेख वाचता येऊ नये म्हणून ब्रह्मदेवानं त्याची योजना डोळ्यांच्या वर करून ठेवली आहे ’ अशा अर्थाचं गडकऱ्यांचं एक मार्मिक वाक्य आहे. मनुष्याची जीविताविषयीची ओढ विटू नये या हेतूनंच ईश्वरानं ही योजना करून ठेवली नाही का ?

ज्याच्या आयुष्यांत संपत्तीचा योग दैवानं लिहून ठेवला आहे त्याला भाग्याची आगाऊ चाहूल लागल्यावर काय म्हणून उद्योग करावासा वाटेल ? आणि धनप्राप्तीचा अपेक्षित क्षण उगवल्यावर आनंद तरी कोणत्या गोष्टीचा होईल ?

बळी देण्यासाठी फुलांच्या माळांनी शृंगारलेल्या एका बोकडाला आपल्या

भवितव्याची कल्पना नसल्यामुळं आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत तो आनंदात असतो, अशा आशयाची कोणत्याशा आंग्ल कवीची एक कविता आहे ना ? आपण सारे मानवहि भविष्यकालाविषयी असेच अज्ञानात असल्यामुळे उत्सुकतेनं जीवनाची वाटचाल करीत आहोत ! हे अज्ञान ज्या क्षणी नाहीसं होईल, ही नेणीवेतली जादू ज्या दिवशी संपुष्टात येईल, त्या दिवसापासून मनुष्याला हा संसार नीरस, शून्य, चैतन्यहीन वाटू लागेल ! प्रीतिसाफल्याच्या आशेनं पहिलंवहिलं प्रेमपत्र लिहायला बसणारा प्रेमिक, कीर्तिलाभाच्या इच्छेनं पहिली वहिली कविता करणारा कवि, स्वातंत्र्यप्राप्तीच्या तळमळीनं पाशवी-शक्तीबरोबर झुंज द्यायला सिद्ध झालेले क्रांतिवीर...या साऱ्यांना भवितव्याची नुसती पुसट कल्पना आली तरी हे कर्तव्याच्या आनंदाला पारखे होतील, अनपेक्षितपणातल्या मौजेला आचवतील !

कमळांच्या पाकळ्यात बंदिस्त होऊन पडलेला भ्रमर 'रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्' इत्यादि शब्दांनी स्वतःच्या भविष्यकालाचं मनोरम चित्र रेखाटून काव्यात्म वृत्तीची जोपासना करू शकतो ते त्याला 'उद्या' अज्ञात असतो म्हणूनच ना ?

पण ज्यांच्या शब्दकोशात मेष, वृषभ अथवा अवकहडा चक्र या पलीकडे फारसे शब्दच नाहीत त्यांना काव्यमय जीवन जगण्याचा अर्थ तरी काय कळणार म्हणा, कपाळ !

★

महाराष्ट्र, दिवाळी अंक १९५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

## १८. वर्तुळातले प्रवासी

आकाश दिव्यातील ज्योतीभोवती निरनिराळ्या प्राण्यांच्या आकृती फिरत असलेल्या पाहून आमच्या शालूला अन् दिलीपला एकदा प्रश्न पडला होता, ' त्यातला कोणता प्राणी सर्वांच्या पुढे धावत आहे ? '

खरं पाहता, सारख्या अंतरावर कापलेल्या अन् सारख्या वेगानं फिरणाऱ्या सिंह, वाघ, घोडा अन् हरीण यांच्या आकृतीत कोणती मागे नि कोणती पुढे हे कुणी कसं ठरवायचं ?

पण मुलांच्या तर्कशास्त्राची उभारणी प्रौढांच्या तर्कशास्त्रापेक्षा फार वेगळ्या सिद्धान्तावर झालेली असते हेच खरं! कुत्र्याला शेपटी असते त्या अर्थी मांजराला मिशा असल्याच पाहिजेत अशा प्रकारची विलक्षण कार्यकारण-मीमांसा ज्या बाळगोपाळांच्या सृष्टीत लावली जाते तिथं तर्कशुद्ध विचारसरणीची अपेक्षा करणंच मुळी चुकीचं नाही कां ?

' सिंह हा पशूंचा राजा असल्यामुळं तोच सर्वांना धावण्याच्या शर्यतीत मागं टाकील ' या आपल्या युक्तिवादाला शालूनं जोडलेली पुस्ती मोठी मजेदार होती. ती म्हणाली, ' दुसरा बाजीराव हा राज्यकर्ता पळण्याच्या बाबतीत कुणालाहि हार जात नसे, असं कालच आमच्या बाईंनी सांगितलं ! '

छोट्या दिलीपनं लढविलेला युक्तिवाद शालूच्या युक्तिवादापेक्षाहि मासले-वाईक होता. त्याचं म्हणणं पडलं, ' सिंहाला चांगलं पळता आलं असतं तर शर्यतीसाठी घोड्याऐवजी त्याचाच उपयोग माणसांनी केला नसता काय ? '

पण काही झालं तरी या वादाचा निकाल आपसात लागणं शक्य नाही असं वाटून दोन्ही मुलं माझ्याकडे आपलं भांडण घेऊन आली. अशा वेळी न्याया-

धीशापेक्षा नारदाची भूमिका स्वीकारणंच मी पसंत करीत असतो.

'सूर्य सायंकाळीच का मावळतो ? सकाळी का मावळत नाही ?'

किंवा 'आजोबा झोपताना चष्मा काढून ठेवतात, मग त्यांना स्वप्नं दिसत असतील की नाही ?' अशा प्रश्नांवरून उपस्थित झालेल्या वादंगाचा निवाडा तरी काय करणार मी ? अशा परिस्थितीत मुलांत भांडण लावून गंमत पहात बसणंच सोयीस्कर नाही का ? हे विधान करीत असताना एस्. टी. सी. परीक्षे-पुरता मुलांच्या मानसशास्त्राचा अभ्यास केलेला माझ्यातला मास्तर मिस्किल-पणानं हसत आहे याची मला पूर्ण कल्पना आहे. पण माझ्या एका फटकळ मित्रानं 'सरड्या' वर केलेला अँग्लोव्हर्न्याक्युलर श्लेष लक्षात घेता त्याच्या मानसशास्त्राची धाव शाळेच्या कुंपणापर्यंत मर्यादितच असते हे ओघानंच मान्य करावं लागतं !

वर्षातून एक दिवस डोळे मिटून सत्यवानाची कथा ऐकणं अन् वडाभोवती दोरा गुंडाळणं हा झाला नैमित्तिक आचार आणि डोळयात तेल घालून पति-देवाच्या हालचालीवर पहारा ठेवणं नि पतिभक्तीचं तत्त्वच गुंडाळून ठेवणं हा झाला नित्याचार ! मानसशास्त्रातील सिद्धान्तांच्या सहाय्यानं मुलांच्या प्रश्नाची उत्तरं देणं हा झाला शाळा तपासणीच्या दिवशीचा आचार आणि टेबलावर डस्टर आपटून त्यांच्या शंकांची वासलात लावणं हा झाला दैनंदिन आचार !

त्या दिवशी मी लेखनात किंवा वाचनात व्यग्र असतो तर मुलांत भांडण लावून गंमत पहात बसण्याऐवजी कदाचित त्यांच्यावर खेकसलोहि असतो !

शालूला चिडविण्याच्या हेतूनं मी म्हणालो, 'घोड्याला मागे टाकून पुढे पळत सुटायला सिंहाला काय वेड लागलंय ? घोड्याला पकडण्यासाठीच तर तो त्याच्या पाठीमागून धावतोय ! दिलीपचंच म्हणणं बरोबर आहे !...'

पण भांडण रंगात येण्यापूर्वीच दोघांनाहि झोप लागली आणि माझ्या मनातल्या विचारचक्रांना गति मिळाली.

युगानुयुगं विश्वाच्या विशाल वर्तुळात प्रवास करीत असलेल्या मानवी पिढ्यांना पुरोगामी वा प्रतिगामी ठरविणारी तुम्ही आम्ही प्रौढ माणसंहि दिलीप–शालूप्रमाणं हास्यास्पद वाद घालीत बसलो नाही का !

विसाव्या शतकातला मनुष्य स्वतःला एकोणिसाव्या शतकातील माणसापेक्षा सुधारलेला समजत असतो. पण त्याच्या आचाराविचारातलं 'पुरोगामित्व

एकोणिसाव्या शतकातल्या नसलं तरी त्याच्या आधीच्या एखाद्या कालखंडातील समाजपुरुषानं अगोदरच जगाच्या निदर्शनास आणून दिलेलं असतं ही वस्तुस्थिति नाकारता येत नाही.

बुशकोटासारखा सुटसुटीत पोशाखाचा प्रकार आपणच प्रथम शिवून दाखवून फॅशनच्या क्षेत्रात गतकाळाला मागं टाकलं आहे असा अभिमान आजच्या शिंप्यानं खुशाल वहावा हवा तर; पण महाराष्ट्रात एकेकाळी प्रचारात असलेली बाराबंदी कालांतरानं बुरसटलेली ठरून पुनः बुशकोटाच्या रूपानं फॅशन म्हणून उदयाला आली आहे, हा आगापिछा ज्यांना ठाऊक आहे ते बुशकोटाला नाविन्याचं प्रशस्तीपत्र कधीच बहाल करणार नाहीत !

दाढीमिशांच्या आधारावर एकाकाळी मनुष्य स्वतःला ' पुरुषसिंह ' म्हणून म्हणवून घेत असे. पण त्याच आधारावर सुधारकांनी त्यांना ' जंगली ' ठरवून ' ज्याला नाही मिशी तो आधुनिक ऋषि ' अशी नवीन व्याख्या रूढ केली !

रुपयाएवढं कुंकू लावणाऱ्या बायकांना सोळा आणे मागतलेल्या ठरवून काही पुरोगामी स्त्रियांनी गुंजेएवढी बारीक टिकली लावायला सुरुवात केली आणि सुधारणेचे सुवर्णयुग सुरू केल्याचा दावा मांडला. पण ते युग पंधरावीस वर्षांच्या आतच संपुष्टात आलं. त्यानंतरच्या युगात मोठं कुंकू अद्ययावत्पणाचं, आधुनिकतेचं लक्षण समजलं जाऊ लागलं. याच युगात दंडापर्यंत कांचेची भिंगे शिवलेली चिटाची चोळी, दोन्ही हातात डझन-डझन बांगड्या आणि सरळ मधोमध भांग ही एका काळी जुन्या जमान्याची निदर्शक ठरलेली प्रसाधनं नाविन्याची प्रतीकं म्हणून तोऱ्यानं मिरवू लागली.

असा हा पाठशिवणीचा खेळ केवळ वेषभूषा आणि सौंदर्यप्रसाधनं यांच्याच बाबतीत चालू आहे असं नाही. आहार, साहित्य, संगीत, सामाजिक नीतिनियम, कायदेशास्त्र इत्यादि विषयांच्या क्षेत्रांतहि हाच प्रकार चालू असल्याचं आपल्या दृष्टोत्पत्तीस येतं.

पशुपक्षांच्या मांसावर गुजराण करता करता मानवाला धान्योत्पादनाचं रहस्य गवसलं आणि तो स्वतःला आपल्या पूर्वजांपेक्षा सुसंस्कृत समजू लागला ! पण त्याच्या या अभिमानाचा बुडबुडा फार वेळ टिकला नाही. ज्याला अंड्याच्या आम्लेटचा स्वाद कळला नाही अशा एखाद्या वेदांत्याला ब्रह्मांडाचं आकलन

झालं तरी ते फुकट आहे, अशा प्रकारच्या अभिप्रायातून शाकाहाराचं प्रतिगामित्व सूचित केलं जाऊ लागलं !

उघड्यावरल्या नाट्यप्रयोगाची कल्पना आम्हाला नवीन वाटून आम्ही मनापासून तिचं स्वागत केलं. पण अलल डुर्रर्रच्या किंवा ललिताच्या दिवसांत प्रेक्षकवर्ग उघड्या मैदानात बसूनच नाट्यानंद लुटीत असे ही इतिहासाची साक्ष पाहिली म्हणजे आमच्या समजुतीतलं वैयर्थ्य चटकन् उमजून येतं !

एक अंकी, एक प्रवेशी नाटकाची कल्पनाहि आपणाला वाटते तितकी नवी नाही. पेशवाईतले तमासगीर रंगभूमीवरच चार-पाच वर्तुळाकार फेऱ्या मारून भवानी पेठेतून बुधवार चौकात जाऊन पोचल्याची प्रेक्षकांना जाणीव करून देत; आणि यांत रसिकांना कुठंहि खटकल्याप्रमाणं किंवा विरस झाल्याप्रमाणं वाटत नसे ! सवाई माधवरावांचा दरबार असो नाहीतर गांजेकसांची बैठक असो, चतुःश्रृंगीचा डोंगर असो नाहीतर भाऊमहाराजांचा बोळ असो, सर्व प्रकारची दृश्यं एकाच पडद्याच्या पार्श्वभूमीवर प्रेक्षकांना प्रतीत होत असत !

देवाब्राह्मणांच्या साक्षीनं विवाहबद्ध होण्याचा विचार आम्हाला शिळा वाटून अनिर्बंध स्त्रीपुरुषांच्या सहवासात ताज्या नीरेची उत्साहवर्धकता असल्याचा शोध लागला. पण जी नीरा मानवसमाजाच्या उदयकालानंतर थोड्याच अवधीत आंबून दारू बनल्यामुळं आमच्या पूर्वजांनी निषिद्ध मानली होती ती 'अपूर्व' समजून हुरळून जाणाऱ्या उतावळ्या जिवांना काय म्हणावं !

'धर्म ही अफू आहे ! ईश्वर हा गांजा आहे !' इत्यादि घोषणा करणारे स्वतःला नवमतवादी समजतात. परंतु चार्वाकाच्या नि त्याच्याहि पूर्वीच्या कालखंडात वेळोवेळी या पाखंडानं वर डोकं काढलं होतं. अर्थात् या विचारसरणीतलं नाविन्य सहा वेळा काडीमोड करून सातव्यांदा गृहप्रवेश करणाऱ्या पन्नाशीतल्या 'नववधूप्रमाणं' जरठ झालेलं आहे याची आमच्या नवमतवाद्यांना दखलहि नसते !

जगाच्या आरंभकालापासून आतापर्यंत मनुष्यानं अनेक संकेत हृदयाशी कवटाळून धरले, कालांतरानं सोडून दिले नि पुनः ते जवळ केले ! जुन्या बाजारात जीर्ण उतारेच साफसुफ करून, घड्या घालून ठेवतात आणि त्याचे ग्राहक नवं सणंग खरेदी केल्याच्या फसव्या आनंदात निमग्न होतात, त्याप्रमाणं एकदा साकार झालेल्या कल्पना, रूढ झालेले विचार कोरे करकरीत असल्याच्या

समजुतीनं आम्ही स्वीकारून इतरांचा उपहास करतो, नव्या नवलाईचं जीवन जगण्याच्या कलेत आम्हीच मागच्या काळापेक्षा आघाडी मारली आहे अशा अहंतेनं जुन्या पिढीतल्या लोकांना तुच्छ लेखतो!

कालचक्राच्या आऱ्यांना धरून आपण सारे मानव जोपर्यंत त्याच्याबरोबर भ्रमण करीत आहोत तोपर्यंत एका पिढीनं दुसऱ्या पिढीला मागं टाकल्याची भाषा बोलणंच व्यर्थ नाही का? वावटळीत सापडून गिरक्या घेणाऱ्या एका वाळलेल्या पानानं दुसऱ्याला निंदावं अशासारखीच आमची ही अस्मिता आहे!

ज्यांना कालाचं आवर्त फोडून बाहेर पडता आलं त्यांनाच खऱ्याखुऱ्या अर्थानं आपली प्रगति करून घेता आली. अशा प्रगत पुरुषोत्तमांत प्रभु रामचंद्र, योगेश्वर श्रीकृष्ण, वसिष्ठादि मुनिवर्य, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम इत्यादि संतश्रेष्ठ गणावे लागतील. दिक्कालाचं महान् वलय भेदून दृष्टिपलीकडे जाणाऱ्या या महात्म्यांनी तुम्हा-आम्हाला केव्हाच मागं टाकलं आहे! वासनेच्या रिंगणांत घोडदौड करीत असलेले आपण पामर जीव नुसती फेऱ्यांच्याच संख्येत भर घालीत आहोत! लक्ष चौऱ्याऐंशीचा फेरा पूर्ण करूनहि त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग आम्हाला दिसत नाही, नव्हे तो जाणून घ्यायची उत्कंठाहि आम्हाला लागलेली नाही!

एकाच परिघात भ्रमंती करीत असूनहि शालू अन् दिलीपप्रमाणं मागासलेला कोण नि पुढारलेला कोण याबाबतीत नसती हुज्जत घालीत बसलो आहोत!

१८३६८

★

वसंत, १९५४

## १९. टिपटॉप हॉटेल

त्या अतिथिगृहाचं नाव होतं टिपटॉप हॉटेल. पण तिथल्या आतिथ्याचा अन् एकंदर कारभाराचा नमुना लक्षात आल्यावर तिथं उतरणाऱ्या प्रवाशाना वाटे, ' हे कसलं आलंय टिपटॉप हॉटेल ? नुसतं टिनपाट आहे टिनपाट ! '

बाकी दुसऱ्या एका अर्थानं ते नाव समर्पक असल्याचं ध्यानात येत होतं म्हणा ! ' समदी टमरलं अशीच गळल्यात साहेब इथली ' अशी उतारूंच्या ज्ञानात जुजबी भर घातल्याच्या उपकाराखातरहि जिथं ' टिप् ' मागण्याची वहिवाट होती, तिथं बक्षिसीच्या बाबतीत हा ' कळस ' त्या हॉटेलच्या नावाची अन्वर्थकता पटवीत नव्हता तर काय ?

पण ते अतिथिगृह माझ्या आठवणीत राहणार आहे ते निराळ्याच वैशिष्ट्यामुळं ! त्या हॉटेलच्या कळकटलेल्या भिंती, मळकट बिछाने, पॉलिश नसलेलं फर्निचर, न सारवलेली जमीन, बिनकल्हईची भांडी नि सडल्या-पाखडल्यावाचून शिजवलं जाणारं धान्य......असा हा थाट पाहताना आपण पुरातन तत्त्वविभागाच्या एखाद्या दालनातूनच फेरफटका मारीत आहोत की मनुष्याच्या उत्क्रांतपूर्व जीवनक्रमाचं प्रात्यक्षिक पाहण्यासाठी इथं आलो आहोत हे माझं मलाच कळत नव्हतं. पाथरवटाचे संस्कार न झालेल्या स्वयंभू मूर्तीप्रमाणे त्या हॉटेलातली एकूणएक वस्तुहि स्वयंभू असावी असाहि एक अर्धवट उदात्त, अर्धवट मिस्किल साक्षात्कार माझ्या मनाला होई !

गॅलरीबाहेर लटकविलेल्या हॉटेलच्या इंग्रजी नावाच्या पाटीवर अधलीमधली चार सहा अक्षरंच शिल्लक राहिली होती. डोळे तपासण्याच्या दवाखान्यातली लहानमोठ्या अक्षरांची पाटी तर चुकून बाहेर लावली गेली नाही ना, अशीहि

पाहणाऱ्याला शंका येई. खाद्यपदार्थांच्या पाटीनं तर मोठी मौजच उडवून दिली होती. बाहेरच्या पाटीवरली बहुतेक सर्व अक्षरं पुसली जाऊन फक्त रम, बीर आणि करी एवढेच अर्धेमुर्धे शब्द शिल्लक राहिले होते. ते वाचल्यावर आपण चुकून भलत्याच ठिकाणी आलो आहोत असं वाटून माझ्यासारख्या सोवळ्या ब्राह्मणाच्या तोंडचे पाणी पळे, तर काहीजणांच्या तोंडाला पाणी सुटे! पण वस्तुस्थिति निराळी होती. गरम, भाकरी, कोशिंबीर या शब्दांतील एक-एक, दोन-दोन अक्षरं उडाल्यामुळं तो अभावित विनोद जन्माला आला होता असं मला कळलं तेव्हा हसता हसता पुरेवाट होऊन माझं पोट दुखू लागलं! या श्रेयात त्या हॉटेलातल्या कच्च्या कठांच्या पोळ्यांचा वाटा किती हा प्रश्न अलाहिदा!

स्वच्छता, व्यवस्थितपणा, सौंदर्य यांच्या संस्काराचा स्पर्शहि न झालेल्या त्या अतिथिगृहाची मला जेव्हा आठवण होते तेव्हा तेव्हा आजच्या आपल्या संस्कारहीन, विस्कळित समाजजीवनाचं हास्यास्पद चित्र माझ्या डोळ्यांपुढे उभं राहून मी अस्वस्थ होतो. एके काळीं आमच्या वैयक्तिक स्वरूपाच्या यच्चयावत् गोष्टींना संस्कारांचं अधिष्ठान असे. याच्या अतिरेकातून कर्मकांडाचा उदय झाला, ही गोष्ट वेगळी. कर्मकांडात पर्यवसित होणारं संस्कारांचं आवडंबर जितकं निषेधार्ह मानावं लागेल, तितकंच संस्कारहीन कर्माचं अनिर्बंध, स्वैर स्वरूपहि त्याज्य समजावं लागेल.

अज्ञानातून किंवा प्रतिकूल परिस्थितीतून संस्कारांविषयीची ही उदासीनता जन्माला आली असती तर एक वेळ क्षम्य मानली असती. पण वस्तुस्थिति तशी नाही. आजच्या जीवनांतली अनिर्बंधता ही सुधारणेची निदर्शक असल्याचा विश्वास पुरोगामी म्हणविणाऱ्यांना वाटत असतो.

बादलीतल्या पाण्याचे दहा-बारा तांबे अंगावर रिचविताना 'तेरे घर के सामने' हे फिल्मी 'स्तोत्र' गुणगुणण्यात कोणतं पुरोगामित्व भरलं आहे ते एकट्या परमेश्वरालाच ठाऊक! स्नान-मग ते विहिरीवर असो, तलावावर असो वा नदीकाठी असो-करीत असताना आमचे श्रद्धाळू पूर्वज पुण्यसलीला गंगा-यमुनादि नद्यांना आवाहन करीत; त्या विशुद्ध, निर्मल सरित्प्रवाहाचं भुक्ति-मुक्ति प्रदान करणारं सामर्थ्य ज्यांत वर्णिलं आहे अशा स्तुतिस्तोत्रांचं भक्ति-भावानं पठण करीत; नि शरीराच्या अमंगलतेबरोबरच त्या स्तवनांतल्या उदात्त आशयाच्या शिडकाव्यानं आपलं मनोमालिन्यहि नाहीसं होवो अशी लोक

मातांची प्रार्थना करीत. स्नानापूर्वीहि प्रातःस्मरणाचे जे दहावीस श्लोक म्हणण्याची प्रथा असे, त्यांतसुद्धा उदात्ततेची अनुभूति देण्याचं केवढं तरी सामर्थ्य सामावलेलं आहे. ' पन्नास गॅलन दारू पकडली ! ' ' मिस् गावदेवीचा सातवा घटस्फोट ! ' ' गटार योजनेबाबत अमेरिकन तज्ज्ञांचा सल्ला ! ' असल्या बातम्या चहाच्या घुटक्याबरोबर गिळता गिळता हल्लीची आमची दिनचर्या सुरू होते. देशाच्या सद्यःपरिस्थितीविषयी जिज्ञासा असणं अस्वाभाविक आहे असं कोण म्हणेल ? पण देशहिताच्या तळमळीपेक्षा तिखटमीठ लावलेल्या भडक बातम्यांविषयीची भूकच आम्हापैकी बहुतेकांना वृत्तपत्र वाचायला प्रवृत्त करते असं म्हटलं तर ते वस्तुस्थितीला सोडून होईल का ? आणि देशहिताच्या प्रेरणेनं आम्ही खून दरोड्याच्या अन् आत्महत्या-घटस्फोटाच्या बातम्या अधाशीपणानं वाचून काढतो असं घटकाभर गृहीत धरलं, तरी त्यासाठी दिवसाचे इतर तास राखून ठेवता येणार नाहीत असं थोडंच आहे ?

प्रातःकालच्या सुमंगल क्षणी ज्याचं आम्ही चिंतन करावं, ज्याच्या चिंतनानं देशाचाच काय, अखिल विश्वाविषयीचा कळवळा अंतःकरणात उपजण्याइतकी आत्मौपम्य बुद्धि मनुष्याला प्राप्त होते त्याच्याविषयी आम्हाला कुतूहल वा' नये ही खेदाची गोष्ट आहे !

मनावर उदात्ततेचे, दिव्यत्वाचे संस्कार झाल्यानंतरच राजकारणाची काय किंवा अन्य कोणत्याहि सत्कार्याची काय, धुरा पेलण्याचं सामर्थ्य मनुष्यात निर्माण होते, असा आमच्या पूर्वजांचा विश्वास होता. ' दुसरे ते राजकारण ' असे म्हणणाऱ्या समर्थ रामदासस्वामींनी राजकारणाच्याहि आधी 'हरि-कथा-निरूपणाचा ' क्रम लावला तोहि त्यांना बुद्धीवरच्या संस्काराचं महत्त्व अभिप्रेत होतं म्हणूनच !

उदात्ततेचं अधिष्ठान न उरलेल्या राजकारणाचे जगात कसे धिंडवडे निघत आहेत हे प्रत्यही पहात आहोत आपण. पण मला मुख्यतः सांगावयाचं आहे ते सामान्यांविषयीच ! दैनंदिन जीवनातल्या संस्कारांची तोंडओळख बुजत चालल्यामुळं तुम्हा–आम्हा सामान्य माणसांच्या जीवनाला जी अवकळा येत चालली आहे, मनःपूत वागण्याच्या सवयीमुळे जीवनात जी बेशिस्त, जो बेछूटपणा निर्माण होत चालला आहे तो पाहून कोणाहि समंजस माणसाचं मन विषण्ण बनल्याशिवाय राहणार नाही.

प्रापंचिक आधि–व्याधि कुणालाहि चुकल्या नाहीत. मुलीबाळींची लग्नं, सावकाराचं देणं, अपयश, फसगत, आजार, मनोभंग... या आघाडीवरल्या सेनेबरोबर झुंजताना आपणा सर्वांनाच शक्तिसर्वस्व वेचावं लागत आहे. आमचे पूर्वजहि याला अपवाद नव्हते. पण जीवनकलहाच्या धुमश्चक्रीत तुम्ही आम्ही जे गमावून बसलो आहोत ते आपल्या वडिलांनी जीवाभावानं जतन करून ठेवलं होतं हे विसरता कामा नये.

पदाघातानं भूमीला नमवू पाहणाऱ्या कोणत्याशा नाटकातल्या नायकाच्या तोऱ्यानं आम्ही धरणीकडं पाहतो. आम्ही पृथ्वीला देवतास्वरूप मानून तिच्याविषयी कृतज्ञता व्यक्तविणाऱ्या पूर्वसूरींची लीनता पाहिली म्हणजे आमच्या औद्धत्याची विशेषच तीव्रतेनं जाणीव होऊ लागते! सकाळी उठून नित्याच्या उद्योगाला लागण्यापूर्वी पृथ्वीमातेला वंदन करायला लावणाऱ्या संस्कारात केवढी उदात्तता भरली आहे! 'समुद्रवसने देवि! पर्वतस्तनमंडिते। विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥' अशा काव्यमय स्वरूपाच्या आश्रयानं वसुंधरेविषयी पूर्वी नितांत आदर प्रकट केला जात असे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत जे जे व्यवहार, ज्या ज्या क्रिया आमच्या हातून घडतील त्या संस्कारपूत असतील अशा प्रतिज्ञेनंच जणू पूर्वीची आचारसंहिता बनविण्यात आली होती.

भाकरीच्या तत्त्वज्ञानानं आज साऱ्या जगाला भुरळ घातली आहे. पण तिच्याबद्दल तरी कृतज्ञता प्रकट करण्याची बुद्धि आम्हाला कुठं होते? ज्या अन्नब्रह्माच्या कृपेनं जीवसृष्टीचा व्यापार निर्वेधपणे चालू आहे त्याच्या उपकारित्वाची कितीजणांना जाणीव होते? चष्मा, स्वेटर, बेल्ट, गुंड्या या जशा निरनिराळ्या गरजा भागविणाऱ्या वस्तु, तशीच भाकरीहि एक, असा या परब्रह्मस्वरूप जीवनदात्रीकडे पाहण्याचा आमचा हृदयशून्य, भौतिक दृष्टिकोन! अन्नाची योग्यता छत्री, हॅट किंवा गमबूट याहून अधिक असल्याचा जुन्या मंडळींना विश्वास होता म्हणूनच––

'ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ हरिर्दाता हरिर्भोक्ता हरिरन्नं प्रजापतिः। हरिः सर्वशरीरस्थो भुंक्ते भोजयते हरिः ॥' अशा निर्मम, विनम्र वृत्तीनं ते अन्नब्रह्माविषयीचा आदर-

भाव व्यक्त करीत. जेवणापूर्वी अशा काही मंत्रांनी अन्नब्रह्माचं आवाहन करायला हवं ही कल्पनाच आजच्या पिढीला हास्यास्पद वाटते! उसळ–पावाशी किंवा राईस प्लेटशी ब्रह्माचं नातं असेल यावर अलीकडल्या मंडळींचा विश्वासच बसत नाही. अन्नाचा संबंध फार तर भूताशी ('असतील शिते तर–' यातली भूतं! 'अन्नाद्भवंती' मधली नव्हेत!) असू शकेल एवढंच माफक ज्ञान त्याच्या संग्रही असतं याला ते तरी काय करणार?

ज्या अन्नावर आपली शारीरिक नि मानसिक धारणा अवलंबून आहे ते स्वच्छ, शुद्ध नि सात्विक असणं आवश्यक आहे. तसंच ते अंगी लागण्यासाठी मन निकोप नि प्रसन्न असणंहि जरूरीचं आहे. ज्या संस्कारांनी मनाची ही निकोप व शुद्ध वृत्ति कायम राखता येते तेच लुप्त होऊ लागले मग त्या सुप्रसिद्ध सुभाषितातल्या 'आहारनिद्रा भय' वाल्या मंडळीत अन् आपणात कुठं फरक उरला?

संध्याकाळच्या वेळी मंद, स्निग्ध दीपज्योतीला अभिवादन करून तिच्या साथीनं विश्वकल्याणाच्या कामनेचा उच्चार करणारी बालकं पूर्वी घरोघर आढळून येत. 'भो दीप ब्रह्मरूपस्त्वं ज्योतिषां प्रभुरव्ययः। आरोग्यं देहि पुत्रांश्च मतिः स्वच्छाऽस्तुमे सदा'॥ अशी ज्योतिर्मयी दीपशिखेच्या सानिध्यात जिथं शुभेच्छा व्यक्त केली जात असेल तिथलं वातावरण दीपकळीबरोबरच त्या पवित्र संस्कारांच्या दीप्तीनंहि उजळून निघत नसेल का?

घरबांधणी काय किंवा त्यात प्रवेश करणं काय दोन्हीसाठी प्राचीन मेधावींनी विशिष्ट विधि सांगितले आहेत. पण पागडी किंवा डिपॉझिट भरणं यापलीकडे गृहप्रवेशाच्या सांगतेचा वेगळा विधि असू शकेल ही कल्पना तरी आज कुणाला पटण्यासारखी आहे का? धन्यधान्य, पुत्रपौत्र यांची जिथं समृद्धि आहे, अतिथि–अभ्यागतांचा जिथं सत्कार होतो, कलह, विद्वेष, मत्सर यांना जिथं थारा नाही ते घर आदर्श वाटावं असेच त्यावेळचे संस्कार होते. आजच्याप्रमाणं बाथरूम, गॅलरी, गच्ची आणि लिफ्ट या चतुःसीमांनी त्यावेळच्या घराचं आदर्शत्व मर्यादित झालं नव्हतं!

लुप्त होत चाललेले असे किती म्हणून संस्कार सांगावेत? आमच्या वऱ्हाडातल्या 'टिपटॉप हॉटेल' मध्ये मी उतरलेल्याला आज कितीतरी वर्षं झाली.

पण अंवतीभवतीचं संस्कारहीन वातावरण मी जेव्हा जेव्हा पाहतो तेव्हा, भांड्यांना कल्हई अन् भिंतींना गिलावा नसलेल्या त्या हॉटेलात उतरल्याचा चमत्कारिक आभास मनाला होत असतो !

*

विवेक १९६४

## २०. सुभद्रेचा शालू

'खेड्याकडे चला!' या आपल्या आवडल्या संदेशाला एक पुरवणी जोडायला महात्माजी विसरले असावेत असं त्या दिवशी मला वाटलं. 'खेड्याकडे चला—पण खिशात दहा-पाच रुपयांची मोड घेऊन!' असा त्यांनी संदेश द्यायला हवा होता!

दारव्ह्याच्या मोटारस्टँडवरली पाच-सहा दुकानं पालथी घालूनहि पाच रुपयांच्या नोटेची चिल्लर मिळेना, तेव्हा एकापेक्षा अनेक अर्थांनी त्या भिकार गावाचा उद्धार करण्याची मला लहर आली!

पण मी निराश झालो नाही. कवि, पाद्री अन् विमाएजंट या तिघांचाहि आशावाद माझ्या एकट्यात त्या वेळीं संचारला होता. एक आण्याचा सिंगल कप चहा पोटात गेल्यावाचून माझ्या आशावादाला ओहोटी लागणं शक्य नव्हतं. गुलामगिरीत पिचत पडलेली माणसंच बंडाचं निशाण उभारू शकतात या ऐतिहासिक सत्याचा पडताळा येण्याची चिन्हं दिसू लागली! बजरंग विश्रांतिगृहाच्या मालकाशी ओळखदेख नसताहि, 'आमच्या नावे एक आणा मांडा, आम्ही पुढील खेपेस देऊ!' हा पेशवाईच्या उत्तर अमदानीतील कर्त्या पुरुषास साजेसा हुकूम सोडण्याचा बेछूट विचार माझ्या डोक्यात घोळत होता तो चहाच्या गुलामीमुळेच नव्हे का?

'बेहिंमते मर्दा तो मदते खुर्दा!' अशी एका रूढ म्हणीची मिस्किल आवृत्ति तमाम दुकानदारांच्या तोंडावर फेकून मी बजरंग विश्रांतिगृहाकडे वळलो. पण दुसऱ्याच क्षणी माझ्या मनात असा विचार आला, 'हॉटेलवाल्यानं उधारीनं चहा द्यायचा नाकारला तर? छेः छे! अशा ठिकाणी खिशात मोड नसता

जाणंच वेडेपणाचं नाही का? बरोबर पुरेशी मोड न घेता प्रवासाला निघण्यात आपल्या हातून मोठीच चूक झाली म्हणायची! त्या चुकीबद्दल प्रायश्चित्त— मोड मिळेपर्यंत कुठलाच चहा घ्यायचा नाही! बस ठरलं!'

उधारीवर चहाची तल्लफ भागविण्याचा विचार डोक्यातून काढून टाकून मी शकुंतलेला प्रयासानं दृष्टिआड करू पाहणाऱ्या विश्वामित्राच्या 'पोज' मध्ये उभा राहिलो अन् डोळ्यासमोर हात धरून बजरंग विश्रांतिगृहातल्या उकळत्या किटलीकडे दुर्लक्ष केलं!

लहानशा बाजारपेठेतल्या नोटेप्रमाणंच पंडितांचं शाब्दिक ज्ञानहि व्यवहारी जगाच्या आवाक्याबाहेरचं ठरत नाही का? रडणाऱ्या बालकाला 'तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि' हे गीतेतलं वचन ऐकवून त्याची समजूत काढू पाहणारे प्रो. कोंटिबुद्ध्यांचे अवतारच आज सर्वत्र दृष्टीला पडतात!

आजचे आमचे मंत्री, पुढारी, प्राध्यापक, लेखक, शास्त्री या सर्व सुशिक्षित मंडळींना पाठ असलेले सिद्धान्त काय कमी मोलाचे आहेत? ते जोपर्यंत सामान्य जनतेला स्वीकारता येत नाहीत तोपर्यंत त्यांची किंमत शून्यच नाही का?

राजकारणातले सिद्धांत नि सूत्रं घोकून फार तर पाठांतराच्या चढाओढीत बक्षीस मिळविता येईल, पण असले राजकारणी पोपट वक्तृत्वमंडळ सोडून विधिमंडळात शिरले की देशाच्या कारभाराला राणीच्या बागेची शोभा आलीच म्हणून समजा!

लोकमान्य टिळकांना तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणून संबोधणाऱ्या चतुर अनुयायांनी त्यांच्या राजकीय मतप्रणालीची व्यवहार्यताच मोठ्या खुबीनं सुचविली नाही का?

राजकारणाचा कोर्स घेऊन शिवबांनी कुठल्याहि विद्यापीठाची पदवी मिळविली नव्हती. पण मोठमोठ्या राजनीतिविशारदांनीं अन् धुरंधर मुत्सद्द्यांनी स्तिमित व्हावं असं युक्तीचं नि हिकमतीचं राजकारण त्या मराठमोळ्या वीरानं करून दाखविलं की नाही? शिवबांच्या यशाचं मर्मही त्यांनी अंगिकारलेल्या व्यवहारसुलभ राजकीय धोरणातच सापडत नाही का? सामदामदंडभेदादि राजनीतिपैकी काळवेळ पाहून जिचा जसा उपयोग करता येईल तसा करून महाराजांनी राजकारणाची प्रतिष्ठा राखली.

दगलबाज शत्रूनं वाघनखं बाहेर काढल्यावर सुरक्षासमितीकडे धाव घ्यायची नसते, हा शिवबाचा दृष्टिकोन साध्यासुध्या माणसालाहि उमजू शकतो. बायको पळविल्याची तक्रारहि यूनोकडे नोंदायला सांगणाऱ्या अखिल जागतिक शांततावाद्यांचं समेटाचं राजकारण सामान्य जनतेला कळणं मात्र दुरापास्त आहे !

भरल्या पोटावर हात फिरवीत 'युक्ताहारविहारस्य...' या श्लोकावर प्रवचन झोडणारे खंडोगणती शास्त्रीबोवा मी पाहिले आहेत. पण अर्धपोटी राहून अन् घरीच दळणकांडण करून आम्हा नातवंडांच्या फीसाठी पैसे जमा करणाऱ्या आमच्या आजीच्या संयमी बृत्तीत त्या श्लोकाचा जो करुण मधुर आविष्कार झालेला पहायला मिळाला त्याच्या शतांशानंहि या पढिक पंडितांच्या विवेचनात मला आढळून येत नाही.

आसन्नप्रसव मातेच्या फिकट पांडुरक्या मुखावर उमटलेला जीवनविषयक अनासक्तीचा वेदान्त जितका हृदयस्पर्शी, आकलनीय वाटतो, तितका "मरणं प्रकृति शरीरिणाम्..." या श्लोकपंक्तीवरला हरिभक्तपरायणांचा पूर्वरंग परिणामकारक वाटत नाही.

सोशलिझम्, कम्युनिझम्—मार्क्सीझम् इत्यादि विषयांवर वक्तव्य करताना वाचावीरांनी कितीहि मुठी आवळल्या तरी प्रत्यक्षात त्या फुकाच्याच ठरतात हे कुणाच्या अनुभवास आलेलं नाही ? वरेरकरी विनोद करून म्हणायचं झालं तर असं म्हणता येईल, 'प्रत्यक्ष कृतीच्या वेळी सर्वजण एकाच 'झम्नं' पछाडले जातात ! अन् तो म्हणजे ऱ्हुमॅटिझम् ! कृतीची वेळ आली की सर्वांचेच हातपाय आखडतात ! भाकरीचं तत्त्वज्ञान बडवणाऱ्या या वावदुकांपेक्षा भाकरीचं दान करणारा एखादा भाबडा खेडूतच भूतदयेचा अर्थ अधिक स्पष्ट करू शकतो यात तिळप्राय शंका नाही !

मोटमोठ्या तत्त्वांची जोपासना करून त्यातलं एकहि वेळेवर उपयोगी पडण्यासारखं नसेल तर त्याचं अस्तित्व असून नसून सारखंच नाही का ? महान् तत्त्वं ही सुभद्रेच्या अंगावरल्या भरजरी शालूसारखी शोभिवंत म्हटली, तर लहानसहान पण कृतीत उतरलेली तत्त्वं द्रौपदीनं फाडलेल्या पैठणीसारखी उपयुक्त म्हणता येतील. अंगावरली पैठणी फाडून द्रौपदीनं बंधुरायाची कापलेली करंगळी बांधली. लहानसहान पण आचरणात आलेली तत्त्वंच मानवी दुःखाचा परिहार करायला समर्थ ठरू शकतील.

विश्वबंधुत्व, अहिंसा, समता इत्यादि लाख मोलाच्या तत्त्वांपुढे प्रांतभेद, भाषाभेद, असत्य, रक्तपात इत्यादि गोष्टींना रुपयात एक आणासुद्धा किंमत नसेल. पण पुष्कळ वेळा एक आण्यावाचून व्यवहार अडून बसतो त्याला काय करायचं ?

*

वसंत, १९५२

## २१. मोठेपणाची मूल्ये

माझ्या ओळखीच्या एका गृहस्थांनी चालवलेल्या 'भवसागर' या वृत्त-पत्रातलं व्यक्तिपरिचयाचं सदर वाचताना मी मनातल्या मनात म्हणत असतो, 'भवसागर' याऐवजी 'नवसागर' असं या पत्राचं नाव ठेवलं असतं तर ते अधिक खुलून दिसलं असतं!

जगाच्या सांदी–कोपऱ्यात पडलेल्या, स्वार्थानं गंजलेल्या कुठल्या तरी कळ-कट 'पात्रां'ना शब्दांच्या कल्हईनं उजळू पाहणारा हा 'भवसागर' नवसाग-राच्याच जातीचा नव्हता तर काय?

कालचीच गोष्ट पहा ना! भवसागरच्या कालच्या अंकात तर्ककुशल दाजी-शास्त्री (त्यांच्या पदवीवरून लोक त्यांना 'अंदाजीशास्त्री' असं म्हणत!) यांचा परिचय आला होता. सदर शास्त्रीबोवांचा तर्कशास्त्रात काय अधिकार असेल तो असो, पण प्रत्यक्षात मात्र एखाद्याच्या हाती मडकं अन् बांबू हा सरंजाम पाहून त्या दोहोतला कार्यकारणभाव न उमगण्याइतकी त्यांची अनु-मानशक्ति क्षीण होती!

गेल्या अंकात आयुर्वेदार्क सोनापुरेशास्त्री यांची ओळख करून देण्यात आली होती. वडाची साल पिंपळाला लावण्यापलीकडे ज्यांच्या काष्ठौषधि ज्ञानाची फारशी मजल गेली नव्हती, रेशनमधल्या आस्याचं प्रवाळभस्म अन् माकडछाप टुथपावडरीचा 'मकरध्वज' बनवण्यात ज्यांची तीन तपं गुजरली होती अशा या भिषग्वर्याची प्रशंसा करताना 'भवसागरा'ला केवढं तरी आनंदाचं उधाण आलं होतं!

तसेच ते स्वरभैरव हंबरडेबुवा! बुवांची स्वर लावण्याची क्रिया थेट 'गळा

काढण्या 'च्या प्राकृत थाटात बसण्यासारखी असल्यामुळे ते 'पंचमा 'ला पोचण्याच्या आतच श्रोते आपापल्या घरी जाऊन पोचत !

पण 'भवसागर 'कारांनी मात्र त्याच्या गायकीचे मुक्त कंठानं गोडवे गायिले होते !

शुद्ध 'डालडा वनस्पती 'चे प्रचारक बाबूराव माखणे यांचा जीवनपरिचय देतानाहि ते असेच पाघळले होते !

खात्रीच्या 'खोट्या मोत्यांचे व्यापारी' रुद्राक्ष मेरुमणी, पित्तशामक गोळ्यांचे कारखानदार जमदग्नी अँड सन्स, 'माथेरान हेअर ऑईल 'चे उत्पादक श. हा. जोग, ओंकारेश्वर लाईफ इन्शुअरन्स कंपनीचे तहहयात सल्लागार झो. क. देव किंवा वर्षा डेअरी फार्मचे मालक तुलसीविहार तान्सावाले (मूळ राहाणार चेरापुंजीचे) या सर्वांची तोंड भरून स्तुति करताना संपादकमहाशयांना त्यांच्यात असा कोणता विशेष गुण आढळून येई हेच मला पूर्वी कळत नसे !

पण आता त्या स्तुतीचं कारण पूर्णपणे माझ्या लक्षात आलं होतं. संपादकमहाशय स्वतः अत्यंत सनातनी वृत्तीचे असल्यामुळे कपाळाला गंध न लावणारे पुरुष त्यांच्या दृष्टीनं संस्कृतीचा गंध नसलेले पामर जंतू ठरत ! दिवसातून दोन वेळ आंघोळ न करणाऱ्यांना ते कोरडे पाषाण म्हणून संबोधीत आणि सिनेमा पाहणाऱ्यांना तमोयुगातील प्राण्यांच्या पंक्तीला नेऊन बसवीत !

'भवसागर' कारांचा माणुसकी पारखण्याचा 'दगड' असा हा विलक्षण असल्यामुळं सटरफटर इसमालाहि ते मानवतेची महावस्त्रं बहाल करीत आणि जगाच्या दृष्टीनं वंद्य ठरलेल्या विभूतिमत्वांच्या चिंध्या–चिंध्या करण्यात पुरुषार्थ मानीत.

इंग्रज राजवटीत राजद्रोहाच्या आरोपावरून फाशी गेलेल्या एका तरुणाबद्दल या संपादकांनी लिहिलं होतं—'...या क्रांतिकारक तरुणास दिनांक सोळा माहे आगस्त खिस्ताब्द १९४३ या दिवशी फाशी देण्यात आलं याबद्दल कुणाचंहि दुमत होणार नाही असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे. यात शंका नाही हे लिहावयास पाहिजे अशांतला भाग नाही हे उघड आहे. तथापि एका गोष्टीबद्दल आम्हाला परम खेद होतो. हा फाशी गेलेला तरुण इसम श्मश्रु ठेवीत

नसे असे आम्हास समजले. अरेरे! विश्वातला पौरुष हा पदार्थ नष्ट झाला असे आम्ही समजावयाचे की काय? का की... ' वगैरे वगैरे!

मिशा काढण्यासारख्या यःकश्चित् स्वरूपाच्या आचारस्वातंत्र्याबद्दल संपादक-महाशयांचा इतका रोष, तर मग खरोखरच ज्यांच्या वर्तनात नैतिकदृष्ट्या आक्षेपार्ह भाग असेल अशा व्यक्तीविषयी त्यांना काय वाटत असावं हे पाहणं मोठं मनोरंजक आहे!

दाजीशास्त्री, सोनापुरेशास्त्री किंवा हंबरडेबुवा यांचं खासगी जीवन 'भवसागर'कार समजत असत त्याप्रमाणं धुतल्या तांदुळाप्रमाणं विशुद्ध असेलहि कदाचित्! ज्यांच्या वैयक्तिक आचरणाबद्दल कुणालाहि नाव-बोट ठेवता येणार नाही, अशी कितीतरी उदाहरणं माझ्याहि माहितीत आहेत. पण व्यक्तिगत चारित्र्याच्या मुद्यावर त्यांना सर्वश्रेष्ठ थोर पुरुषांच्या मालिकेत गोवता येईल असं मला कदापि वाटणार नाही. उलट महान् नरपुंगवांच्या आचरणात क्वचित् नैतिकदृष्ट्या आढळून येणारी शिथिलता लक्षात घेऊनहि त्यांच्या महत्ते-बद्दल मला वाटणारा आदर यत्किंचितहि कमी होत नाही!

केवळ वैयक्तिक आचरणावरून मनुष्याचा मोठेपणा मापता आला असता तर सुपारीच्या खांडालाहि न शिवणारा एखादा शाळामास्तर शुक्राचार्यापेक्षा श्रेष्ठ ठरला असता, अन् सुंदर स्त्रियांसमोर बोबडी वळल्याच्या पुण्याईवर रेशनिंग ऑफिसातला भेदरट कारकून विश्वामित्राहून थोर गणला गेला असता!

याच न्यायानं, पित्याच्या आज्ञेवरून मातृवध करणाऱ्या परशुरामापेक्षा अहिंसेवर प्रवचन झोडणारा कोणीहि खादीधारी अधिक योग्यतेचा म्हणावा लागेल; सापाला धरून पत्नीच्या महालात प्रवेश करणाऱ्या तुळशीदासापेक्षा, बायकापोरांवाचून चारचार, पाचपाच वर्षं तबेल्यात काढणारे मुंबईतले 'भय्ये' अधिक धीरोदात्त प्रकृतीचे मानावे लागतील! आणि मुलुखगिरी करून खजिना लुटणाऱ्या सम्राटापेक्षा हिशेबात पैचीहि अफरातफर न करणाऱ्या पोस्टमास्तरची नैतिक मूल्यं अधिक स्थायी स्वरूपाची समजावी लागतील!

चुकीच्या मूल्यांनी मनुष्याचं महत्त्वमापन करण्याचा प्रयत्न केला म्हणजे हास्यास्पद स्वरूप यायचं!

कालपरत्वे या मूल्यांत फरक पडणं अपरिहार्य आहे असं मानलं तरी एकाच

काळात वावरणाऱ्या व्यक्तींचा मोठेपणा आजमवतानाहि आपण कळत-नकळत असलेच चुकीचे मानदंड वापरून आपलं हसं करून घेत असतो !

स्वतःच्या हातानं कातलेल्या सुताची खादी वापरणाऱ्याच्या स्वावलंबी वृत्तीची किंमत नाही असं कोण म्हणेल ? पण या सुतानं मंत्रिपदाचा स्वर्ग गाठल्यावर निष्क्रीय दौरे, निःसत्व हास्य, नीरस प्रवचनं अन् नाटकी श्रद्धांजलि यापलीकडे ज्यांच्या जीवनाचा व्याप विस्तृत होत नाही, त्याच्या मोठेपणाच्या मर्यादा समुद्राच्या मापानं कशाला मोजायला हव्यात ?

लिहिण्याच्या ओघात मी सहज समुद्राचा उल्लेख केला खरा; पण थोर पुरुषांच्या जीविताला समुद्राशिवाय दुसरी कोणती समर्पक उपमा देता येणार ?

आपल्या अंवतीभंवती वावरणाऱ्या सद्‌गुणी, सदाचारसंपन्न पण समाजजीवनापासून अलिप्त असलेल्या प्रापंचिकांचं जीवन झुळझुळ वाहणाऱ्या निर्झरासारखं निर्मळ असेल, स्निग्धगंभीर सरित्प्रवाहाप्रमाणं पवित्र असेल; सुगंधित पुष्करिणीप्रमाणं मोहक असेल, पण त्या जलसंचयांना आत्मकेंद्रित्वाच्या, आत्मनिष्ठेच्या, स्वार्थाच्या मर्यादा पडल्यामुळं त्यांत अमर्याद सिंधूची विशालता नि सखोलता कुठून येणार ?

ते व्यापकत्व महात्माजींच्या जीवनात, सुभाषबाबूंच्या कर्तृत्वात, सावरकरांच्या देशभक्तीत नि शरच्चंद्रांच्या साहित्यसाधनेत आढळून येईल. संतांच्या आचरणात, कलावंतांच्या तपस्येत अन् वैज्ञानिकांच्या ज्ञानलालसेत तिचा आढळ होईल.

सागराच्या पांढऱ्याशुभ्र फेसाळ लाटा किनाऱ्यावर आदळू लागल्या म्हणजे मी मनात म्हणतो, ' जोपर्यंत ही भव्य, विराट प्रकृती आपल्या समानधर्म्यांवर जाईजुईची फुलं उधळून त्यांचं शुभचिंतन करीत आहे, तोपर्यंत ' भवसागरा '-सारख्या क्षुद्र वृत्तीच्या वर्तमानपत्रांनी त्यांच्यावर कितीहि लाखोल्या वाहिल्या तरी त्याबद्दल विषाद कशाला वाटायला हवा ? '

★

वसंत, १९५३

## २२. फुकटेगिरी

स्वराज्याप्रमाणंच फुकटेगिरी हाहि माझा जन्मसिद्ध हक्क आहे, अशी आमच्या गावच्या प्रत्येक रहिवाशाची समजूत झाली होती की काय कुणास ठाऊक! मोफत वाचनालयात येणाऱ्या केसरीवर ग्रामस्थ बंधू ज्या आवेशानं झडप घालीत त्याच उत्साहानं प्लेग-कॉलऱ्यासारख्या साथीविरुद्ध लढा देण्यासाठी अर्थात मोफत लस टोचून घेण्यासाठी अस्तन्या वर सारीत!

सहज असो अथवा सायासाने असो, कोणतीहि गोष्ट फुकटात पदरात पाडून घेण्याची ही प्रवृत्ति आमच्या गावकरीबंधूंनी पिढीजात गुणाचा मोलाचा वारसा म्हणून मोठ्या भक्तिभावानं जोपासली होती. दुसऱ्या बाजीरावाला चटण्या-कोशिंबिरींचा नजराणा देऊन त्याच्याकडून जहागिरी उपटल्याच्या अनेक किंवदंति पुण्या-साताऱ्याच्या पंचक्रोशीत कानावर येत असतात. पण चटण्या-कोशिंबरीच्याही खर्चाची तोशीस न लागू देता नुसत्या तिखटमीठ लावलेल्या गोष्टी निजामाच्या कानावर घालून त्याच्याकडून रुसूम अन् वतनं मिळविण्याची अपूर्व बहादुरी आमच्या वऱ्हाडातल्या जमीनदारांनीच गाजवावी.

गडकऱ्यांच्या तिंबुनानांनी 'एक मुलगी करणाऱ्यास दोन मुली इनाम' अशी लालूच दाखविली असूनही तिला एकहि नवरा मुलगा बळी पडला नव्हता. पण गडकऱ्यांना आमच्या गावाची प्रसिद्धी ठाऊक असती तर त्यांनी आपल्या मानस-पुत्राला वरसंशोधनाची पहिली मोहीम आमच्याच गावाच्या रोखानं काढायला लावून चुटकीसरशी ठकीच्या व तिच्या बहिणीच्या लग्नाची समस्या सोडविली असती!

एकदा पुण्याच्या संततिनियमन प्रसारक मंडळानं आमच्या गावी येऊन

‘ निःसंतान टॅबलेट्स ’ मोफत वाटावयास सुरुवात करताच समस्त गावकरी मंडळींनं केवढ्या उत्साहाने त्या गोळ्या घरी आणून ठेवल्या. पण सुदैवाने दुसरे दिवशीच ‘ गांधारी लॅबोरेटरीच्या ’ एका एजंटानं ‘ लटांब्रोशिया ’ नावाच्या नव्या औषधाचा नमुना घरोघर फुकट वाटल्यामुळं व ‘ निःसंतान ’ टॅबलेट्स-पेक्षा ‘ लटांब्रोशिया ’च अचुक गुणकारी ठरल्यामुळे आमच्या गावाच्या सातत्याबाबत उत्पन्न झालेला धोका आपोआपच टळला.

फर्मास बिडीचा झुरका असो नाही तर तमाशातल्या रंगीचा मुरका असो, भाजी खाण्याचा छंद असो अथवा नाट्याविषयीचा आनंद असो, क्रिकेट-विषयी उमाळा असो किंवा संगीताविषयी जिव्हाळा असो, प्रत्येक गोष्ट विनामूल्य पदरात पाडून घेण्याचा आपला हव्यास आर्थिक बचतीपेक्षा विनोदाच्या निर्मिती-लाच कारणीभूत होत आहे ही वस्तुस्थिति बिचाऱ्या गावकऱ्यांच्या ध्यानी-मनीहि येत नाही !

दुसऱ्यानं टाकून दिलेलं थोटूक ‘ चेतविल्यानेच चेतते ’ या प्रेरक विश्वासानं कार्यप्रवृत्त होणारा, चटक आणि चटके यांचा एकाच वेळीं अनुभव घेणारा प्राणी हास्यरसाचीच निष्पत्ती करीत नाही तर काय ? दोन आण्याचे पैसे वाचविण्यासाठी रात्रभर तमाशाच्या तंबूबाहेर तिष्ठत उभा राहणारा नि एखाद्या फटीतून किंवा छिद्रातून नर्तकीच्या पदविन्यासाऐवजी सोंगाड्याचा चेहरा, तुण-तुण्याची खुंटी किंवा प्रेक्षकाच्या शेमल्याचा तुरा न्याहाळणारा जीव विनोदाच्या सामुग्रीचीच साठवण करून ठेवीत नाही तर काय ?

ऐन संध्याकाळी भाजीबाजारात फेरफटका मारून अवघ्या दोन पैशात उरलेली पाटी खरेदी करणारी अन् घरी आल्यावर आपल्या सौंदर्यांत चाकवत, गवत आणि मंगळागौरीचं पूजासाहित्य ( इति अघाडा केना ! ) यांचं १ः २ : ३ : असं प्रमाण असल्याचा शोध लावणारी मंडळीहि वरील रसिक राजाच्या पंक्तीलाच बसविण्याच्या योग्यतेची नाहीत का !

एकदा आमच्या गावच्या काही लोकांनी सौभद्र नाटकाचा प्रयोग झाडावर बसून पाहिला. पण सहा आंधळ्यांनी हत्तीविषयी घेतलेल्या निरनिराळ्या निर्णयाप्रमाणं प्रत्येकाच्या दृष्टीला पडलेलं नाट्यप्रयोगाचं स्वरूप वेगवेगळं होतं ! एकाला वक्रतुंड, एकाला राक्षस, एकाला गॅसबत्ती आणि एकाला विंगबाहेर आलेला पायपेटीचा कोपरा प्रामुख्यानं दिसल्यामुळं त्या–त्या पात्राभोवती अथवा

वस्तुभोवती नाट्यप्रसंगाची गुंफण झाली असावी असा प्रत्येकाचा अभिप्राय पडला !

जिल्ह्याच्या गावी तिकिट लावून क्रिकेटचे सामने चालतात, तेव्हा आमच्या गाववाल्यांकडून होणारे सदरहू खेळाचं निरीक्षणहि याच मासल्याचं असतं ! कुणाच्या तरी घराच्या कौलारावर चढून क्रिकेटचा खेळ पाहण्याची कल्पना परदेशी गेलेल्या प्रियकरानं आपल्या प्रियतमेच्या तोंडची ठुमरी ट्रंककॉलच्या सहाय्यानं ऐकण्याइतकीच हास्यास्पद नाही का ? पूर्वी पडदानशीनपणाच्या जमान्यात सुलतानाच्या बेगमा आजारी पडल्या म्हणजे त्यांच्या हाताला देखील दोरी बांधून ती अंतःपुराबाहेर बसलेल्या हकीमाच्या हातात नाडीपरीक्षेसाठी देण्यात येई, असं सांगतात. कौलारावरून क्रिकेटच्या खेळाचं निरीक्षण करण्याचा प्रकारही यापेक्षा कोणता कमी बालिश स्वरूपाचा आहे ?

क्रिकेटप्रमाणंच गावकऱ्यांच्या संगीतप्रियतेलाहि फुकटेपणाची साथ मिळाल्यामुळं घरंदाज गायिकेला बाजारी बुलबुलतरंगाची संगत लाभावी असा काहीसा विचित्र प्रकार घडला आहे !

एखाद्याच्या घरी गवयाचं गाणं ठरलं म्हणजे गावातल्या अखिल गानलुब्ध आत्म्यांचं मोहळ रस्त्यात जमा होऊन जिवाचं कान करीत असतं. पण दारंखिडक्या बंद केलेल्या माडीतून पंचमानंतरचेच स्वर जिथं कसेबसे बाहेर येण्याची शक्यता असते तिथं संगीताच्या अर्ध्यामुर्ध्या तुकड्यावर जगू पाहणाऱ्या रसिकतेत भिकेच्या डोहाळ्याची लक्षणंच प्रतीत होत नाहीत का ?

आज जगात सर्वत्र थैमान घालीत असलेली भांडवलशाहीसुद्धा याच फुकट्या वृत्तीचं विक्राळ स्वरूप म्हणता येणार नाही का ? कमरेचं सोडून डोक्याला गुंडाळणारा एखादा माथेफिरू फार तर चेष्टेचा विषय होऊ शकेल, पण द्रौपदीसमोर मांडी उघडी करणारा दुःशासन——

आमच्या गावकऱ्यांच्या फुकट्या वृत्तीचं मला हसू येत असलं तरी उन्मत्तपणानं नंगा नाच घालून मानवतेची अब्रू चव्हाट्यावर आणू पाहणाऱ्या भांडवलशाहीवर मात्र कुणीतरी गदेचा प्रहार घालायलाच हवा असं तीव्रतेनं जाणवल्यावाचून राहात नाही. जमीनदार, गिरणीमालक, व्यापारी या शकुनी-दुर्योधनादिकांच्या रूपानं वावरणाऱ्या कौरवसभेतल्या प्रभावळीलाहि निष्प्रभ करणारा एखादा पार्थधनुर्धर निर्माण व्हावा असं उत्कटतेनं वाटू लागतं !

पण हा दिव्य क्षण आता फार दूर राहिलेला नाही ! समाजवादाच्या रणभेरी झडू लागल्या आहेत... क्रांतीची पहाट होताक्षणीच...

बाकी, या धुमश्चक्रीत आमच्या गावच्या फुकट्यांचं कसं होणार--

पण युद्धनीतीत अतिरथी-महारथींचा विचार करावयाचा असतो. बाजारबुणग्यांचा प्रश्न उपस्थित करणं फुकटच नाही का ?

★

भालचंद्र : दिवाळी अंक, १९५४

# २३. ठोकून देतों ऐसाजे !

कालिदासविरचित नमनपर श्लोकांतील ‘ पार्वतीपरमेश्वरौ ’ या शब्दसंहतीतून पार्वतीप ( शंकर ) व रमेश्वर ( विष्णु ) असा श्लेष काढणाऱ्या भाष्यकारांची बुद्धिमत्ता वेगळी आणि ‘ छटा कपोलीं लव ही पाटल ’ या काव्य॰ पंक्तीचा ‘ छटाकभर पोळीं आणि तिच्याबरोबर थोडी पातळ भाजी ’ असा अन्वयार्थ लावणाऱ्या शाळामास्तरची प्रतिभा निराळी ! ‘ वंदे मातरम् ’ ही दहशतवादी घोषणा असल्याचा संशय येऊन तिचा ‘ बंध के मारो ’ असा अन्वयार्थ लावणाऱ्या ब्रिटिश नोकरशाहीच्या चातुर्यानंसुद्धा शाळामास्तराच्या बुद्धिमत्तेपुढे साष्टांग नमस्कार घालावा असा तिचा थोर अधिकार !

माझ्या शालेय जीवनात भाषाविषयाच्या गुरुमाउलींनी स्वतःच्या बुद्धीला कौल लावून पाठ्यपुस्तकांतील कवितांतून वेळोवेळीं जो आशय निष्पन्न केला तो मनाशी आठवू लागलो म्हणजे एकाच पोतडीतून तऱ्हेतऱ्हेच्या चीजा बाहेर काढणाऱ्या जादुगाराची करामत त्यापुढे काहीच नव्हे असा मनात विचार येऊ लागतो !

हे लिहिताना मी गुरुद्रोहाचं पातक जोडीत आहे याची मला जाणीव आहे. पण विद्येऐवजी विद्या अन् ‘ नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ’ या सुभाषिताऐवजी ‘ ठोकून देतो ऐसाजे ’ ही विचारसरणी ज्यांचं सारं जीवन व्यापून टाकू शकते अशा महाभागांविषयी आदर तरी कसा उत्पन्न व्हावा ? सखोल ज्ञान आणि विशुद्ध चारित्र्य या बाबतीत ज्यांच्यापुढे विनम्र भावानं माथा लववावा असे उच्च श्रेणीचे अध्यापक मला लाभले नाहीत असं नाही. पण अशांची संख्या वरील प्रकारच्या गुरुजनांच्या तुलनेनं फारच थोडी !

‘ माथा लेवुनि केवडा विचरते आता शरत्सुंदरी ’ या केशवसुतांच्या एका कवितेतील ओळींचा अर्थ लावताना आमच्या एका शिक्षकाने ‘ विचरते ’ या शब्दाचा ‘ विंचरते ’ असा अर्थ गृहीत धरला होता ! अध्यापकमहाशयांची ही अगाध विद्वत्ता पाहून बिचाऱ्या शरत्सुंदरीला मात्र केवड्याऐवजी आपल्या डोक्यात राख घालून घेण्याची इच्छा झाल्यावाचून राहिली नसेल असं आता मला वाटू लागतं !

‘ पांडुकुमारा ’ या संबोधनानं सुरू होणारी एक चीज मैफलीत आळवली जात असताना एक श्रोता ताडकन् उठून म्हणाला म्हणतात, ‘ अजीसाहब, पांडू को मारा यह ठीक है, लेकिन किसने मारा, कब मारा, क्यों मारा यह भी तो बतायीये ! ’

हरिदासी नकलेतला हा उथळ विनोद सोडून दिला तरी मैफलीतल्या श्रोत्यां-प्रमाणं इच्छेस येईल तशी काव्यातल्या अर्थाची ओढाताण करणारे अनेक महाभाग प्रत्यक्षात वावरत आहेत ही गोष्ट काही खोटी नाही !

आणि काव्यापेक्षाही जीवनाचा अर्थ लावताना जी विलक्षण ओढाताण तुमच्या–आमच्याकडून होत असते, ती पाहिली म्हणजे शाळामास्तराचं अज्ञान त्यापुढे काहीच नव्हे असा एक विचार मनाला स्पर्शून जातो.

जीवन हा धूर आहे असं कुणाला वाटतं, तर जीवन म्हणजे दारूचा गुत्ता आहे अशी उमरखय्यामसारख्या भोगवाद्यांची कल्पना झालेली असते. जीवन हे एक फसवे मृगजळ आहे अशी काहीजणांची समजूत, तर जीवन म्हणजे असंबद्ध घटनांनी भरलेलं एक नाटक असा कित्येकांचा विश्वास. जीवन हा विषाचा प्याला आहे असं काहीजणांचं म्हणणं, तर जीवन म्हणजे काठोकाठ भरलेला अमृताचा प्याला असल्याची दुसऱ्या टोकाला गेलेल्या लोकांची श्रद्धा. जीवन हा जुगार आहे असा बऱ्याचजणांचा समज, तर जीवन हा संग्राम असल्याचं कित्येकांचं मत...

या साऱ्या अभिप्रायांपैकी कोणता विश्वसनीय समजायचा ? सामान्य माणसांचं राहोच, मोठमोठ्या लेखकांनीहि मानवी जीवनाबद्दल आपलं मत प्रकट करताना अशीच एकांगी, क्वचित् नेणतेपणाची भूमिका पत्करलेली पाहिली म्हणजे विशेषच नवल वाटू लागतं ! जीवनाला उद्देशून दुपारची सावली, पाण्यावरला बुडबुडा, धुळीचे कण इत्यादींसारख्या दिलेल्या विविध उपमांत

थोडाफार सत्यांश असेल, पण संपूर्ण सत्याचं दर्शन घडविण्याच्या दृष्टीनं त्या निरुपयोगी आहेत यात शंका नाही.

माय लाईफ इज लाईक द समर रोज
दॅट ओपन्स टू द मॉर्निंग स्काय !

या शब्दांत आपल्या जीवनपुष्पाचं वर्णन करणारा रिचर्ड हेन्री वाईल्ड——

बट् अर् दि शेड्स ऑफ इव्हिनिंग क्लोज
इज स्कॅटर्ड ऑन् दि ग्राऊंड टू डाय् !

अशा प्रकारे मानवी जीविताच्या क्षणभंगुरतेच्या जाणीवेनं व्यथित झालेला दिसून येतो.

लाईफ इज अॅज टिडीयस अॅज ए ट्वाईस-टोल्ड टेल
व्हेक्सिंग दि डल् इयर ऑफ ए ड्रॉऊजी मॅन !

या शब्दांत शेक्सपीयरनं जीवनाला शिळ्या कथेची उपमा दिली आहे. चॉसरनं—

दि वर्ल्ड इज बट् ए थ्रूफेअर फुल् ऑफ वो
अॅड वुई पिलग्रिम्स पासिंग टू अॅड फ्रो !

वगैरेसारख्या शब्दांत मानवी जीवन दुःखपूर्ण असल्याची कुरकुर केली आहे. याच्या उलट, जीवन म्हणजे मनसोक्त क्रीडा करण्याची पुष्पवाटिका आहे, ते एक रमणीय नंदनवन आहे अशा अर्थाचे उद्‌गार काढणारे कवि-लेखकहि कमी नाहीत. उलटसुलट अर्थांची ही कविवचनं वाचू लागलो म्हणजे मी अधिकच बुचकळ्यात पडतो. पण हा संभ्रम फार वेळ टिकत नाही. ज्यांनी शब्दाऐवजी कृतीनं जीवनाचा अर्थ उलगडून सांगितला आहे अशा अनेक महाभागांच्या जीवितासंबंधी मी जसजसा विचार करू लागतो तसतसा जीवनाच्या अर्थाविषयीचा माझ्या मनातला संदेह वितळत जातो. प्रभु रामचंद्र, भगवान् श्रीकृष्ण इत्यादि मर्यादा-पुरुषोत्तमांपासून तो शिवराय, राणा प्रतापादि धीरोदात्त नरश्रेष्ठांपर्यंत सार्‍या महाभागांनी 'त्याग' या एकाच पर्यायानं जीवनाचा अर्थ स्पष्ट करून सांगितला नाही का ? जीवन म्हणजे त्याग, जीवन म्हणजे यज्ञ, जीवन म्हणजे दान हा खरा अर्थ नाही का ? अहंभाव गळून जाऊन जे विश्वाच्या जीवनाशी एकरूप झाले त्यांनाच जीवनाचं वास्तव स्वरूप कळतं असं कविवर्य बोरकरांनी एका कवितेत म्हटलं ते यथार्थ आहे. त्या कवितेत ते म्हणतात—

जीवन त्यांना कळले हो
मीपण ज्यांचे पक्व फळापरि
सहजपणाने गळले हो...
चराचराचे होउनि जीवन स्नेहासम
पाजळले हो
सिंधूसम हृदयांत जयांच्या रस
सगळे आकळले हो
आपत्काली अन् दीनांवर घन
होऊनि जे वळले हो
दुरित जयांच्या दर्शनमात्रे मोहित
होऊनि जळले हो ।

आणि कृतीनं जीवनाचा अर्थ विशद करून सांगणाऱ्या निष्ठावान् स्त्रीपुरुषांची परंपरा जोपर्यंत अखंडित आहे, त्यांच्या जीविताचं मर्म ओळखणारे प्रतिभा-संपन्न कवि जोपर्यंत अस्तित्वात आहेत तोपर्यंत जीवनाचा वेडावाकडा किंवा अर्धामुर्धा अर्थ लावण्याची कशाला पर्वा करावी ?

★

वसंत, १९५८

## २४. खलनायक

वऱ्हाडच्या भौगोलिक सीमा कोणत्याहि असोत; पण तात्त्विकदृष्ट्यां आम्हा विदर्भवासीयांचं जीवन तक्क्या, तरट, तंटे आणि तगादा या चतुःसीमेत सामावलं आहे, अशी अलीकडे माझी खात्री होत चाललीय.

वैदिक कालात चातुर्वर्ण्य, वैयक्तिक जीवनात चार आश्रम, सामाजिक जीवनात चार पुरुषार्थ, योगसाधनात मुक्ति चतुष्टय, युद्धनीतीत चतुरंग सेना किंवा अगदी अलीकडील राजकारणात चतुःसूत्री जितकी प्रसिद्ध आहे तितकीच आम्हा वऱ्हाडी जनतेच्या बाबतीत ही चार वैशिष्ट्ये विख्यात आहेत!

लग्नामुंजीपायी काढलेली कर्जे अन् घराण्याच्या इभ्रतीपायी सुरू केलेले कज्जे पिढ्यान्‌पिढ्या चालू ठेवण्यात वऱ्हाडी वतनदारांना कसलीच दिक्कत वाटत नाही. ठमीच्या पहिल्या पहिल्या डोहाळजेवणासाठी काढण्यात आलेल्या कर्जाचे हप्ते पुढे तिचा नातू आपल्या पेन्शनीतून फेडीत असतो अन् इमाद-शाहीच्या जमान्यात दिवाणपदाच्या वस्त्रासाठी सुरू करण्यात आलेला लढा विसाव्या शतकात खणाळाचं दुकान थाटून बसणारे पणतू, खापरपणतू लढवीत असतात!

कित्येक वेळा तर भांडणाच्या मुळाशी असलेल्या कारणाचासुद्धा पक्षकारांना पत्ता नसतो! भाऊबंदांनी अंगणातल्या भिंतीला दार बसवलं की दाराला भिंत बसवली असा त्यांना प्रश्न पडतो! कोपऱ्यात छत्री उभी करून अंथरुणावर अंग टाकावं की अंथरुणावर छत्री ठेवून कोपऱ्यात उभं रहावं असं स्वतःशी विचारणाऱ्या गोकुळानंसुद्धा या बाबतीत यांचा गंडा बांधावा!

पोळ्याच्या दिवशी सर्वात आधी आपली बैलजोडी मारुतीच्या पाराभोवती

फिरावी म्हणून सतत दोन महिने तहसीलदाराच्या बंगल्याभोवती प्रदक्षिणा घालणारा अन् शिमग्याच्या दिवशी प्रथम स्वतःला शंखध्वनि करण्याची संधि मिळावी म्हणून अधिकाऱ्यांच्या कानात कुजबुजणारा वऱ्हाडचा वतनदार अन्यत्र पहायला मिळेल का ?

या हास्यास्पद प्रकारांच्या मुळाशी असलेली वऱ्हाडी लोकांची भावनाप्रवणता पाहिली म्हणजे वाटतं, भावनेचा हा प्रचंड ओघ एखाद्या ज्ञात वा अज्ञात शक्तीला विधायक कार्याकडे वळविता आला तर ? क्षुद्र हेवेदावे नि स्वार्थ यांच्या पूर्ततेऐवजी जगाच्या कल्याणाकडे या शक्तीचा विनियोग करता आला तर ? अन् तसा तो करता आला नाहीच तर निदान अपरिणत, असंस्कृत अवस्थेत का होईना पण ही भावना वऱ्हाडी जनतेच्या ठिकाणी सदैव जागृत असावी असं मला नेहमी वाटतं.

आज जगातून या ' पदार्था 'ची कायमची हकालपट्टी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्या प्रयत्नांस यश येणारच नाही असं नाही. पण आलंच तर भावनेवाचून उदयाला येणारं ते जग कशा प्रकारचं असू शकेल याचं चित्रण करायला व्यास-वाल्मिकीच्या तोलाचे महाकवीसुद्धा समर्थ होतील की नाही... पण या गोष्टीची मी आताच कशाला चिंता वाहू ? सुधारलेल्या या विज्ञानयुगात कविता करणाऱ्या यंत्राचासुद्धा शोध लागेल की !

चिंता कवीच्या प्रतिभासामर्थ्याविषयी नाही. ज्याचं वर्णन कविप्रतिभेला करावं लागणार आहे त्या नव्या, भावनाशून्य जगाबद्दल खरी काळजी वाटते !

भावनेला जीवनातून हद्दपार करून केवळ बुद्धीच्या तंत्रानं पावलं टाकण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या आजच्या बुद्धिनिष्ठ मानवाला हसावं की रडावं हेच मला समजेनासं होतं !

द्रौपदीची वेणी धरून तिला भर सभेत ओढीत आणल्याच्या कारणावरून युद्धप्रसंग निर्माण व्हावा ही कल्पना आजच्या प्रगत बुद्धिवादाला पटत नाही. फार तर एखाद्या गंगावनाच्या मागणीनं पांडवपक्षाला कौरवांकडून नुकसानभरपाई करून घेता आली असती, असा आजच्या बुद्धिनिष्ठेचा संभावित दृष्टिकोन आहे !

कौरवांबरोबर बौद्धिक पातळीवरून समझोत्याची भाषा करण्याऐवजी दुःशासनाची मांडी विदीर्ण करून रक्तरंजित हातानं द्रौपदीची वेणी घालणाऱ्या

भीमाचा प्रकोप किंवा एकट्या सीतेपायी लंकेतल्या बहुजनसमाजाचं अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या रामाचा त्वेष आधुनिक युगातल्या नाजुक मुलायम बुद्धिवादाला आकलन करता येईनासा झाला म्हणजे हॅम्लेटच्या आवेशानं मला ओरडून म्हणावंसं वाटतं, ' विनाशा ! तुझं नाव बुद्धिवाद ! '

मध्यंतरी एकदा दामोदर हॉलमध्ये लागलेला ' पुण्यप्रभाव 'चा प्रयोग पहायला गेलो होतो. अर्ध्यावर नाटक आलं तेव्हा माझ्या समोरच्या रांगेत बसलेले साधारण ओळखीचे गृहस्थ जांभई देऊन चुटक्या वाजवीत म्हणाले, ' छे बुवा ! अगदीच डल् स्टोरी आहे नाटकाची ! अन् प्राब्लेमसुद्धा किती जुनाट ! ... '

पुढचे शब्द ऐकण्याच्या भरीस मी पडलो नाही. विवाहसंस्थेविरुद्ध मुठी आवळीत खानावळीत जन्म काढणाऱ्या अन् सिनेमाकंपन्यांना ' एक्स्ट्रॉ ' पुरविण्याचे कंत्राट घेणाऱ्या त्या महाशयांना पातिव्रत्याच्या प्रभावावरलं नाटक कुठून खपायला ?

पण त्या टीकाकारालाच दोष लावायला नको. ' वीस वर्षांपूर्वी पुण्यामुंबईचे रसिक प्रेक्षक ज्या उत्कंठेनं या प्रयोगाचं स्वागत करीत असत तो उत्साह, आता त्यांच्या ठिकाणी दिसून येत नाही ' असे एका नाटक कंपनीच्या चालकांनी कुठल्याशा नाट्य संमेलनाच्या प्रसंगी काढलेले उद्‌गार मला आठवतात !

बोलपटाच्या प्रभावापेक्षाहि प्रस्तुत नाट्यकृतीतील विषयासंबंधी समाजात दिवसेंदिवस बळावत चाललेली अनास्थाच या घटनेच्या मुळाशी आहे असंच त्या वक्त्याला सुचवायचं नव्हतं का ?

देशाभिमानाची धारहि दिवसेंदिवस अशीच बोथट होत चालली आहे. कापडावर कैची चालविणाऱ्या शिंप्याच्या निर्विकार मुद्रेने आम्ही देशाचे फारोळे केलेच की नाही !

भाषाशुध्दीच्या कल्पनेच्याहि अशाच चिंधड्या उडवून आम्ही बुद्धिवादाचीच बूज राखली ना !

एकदा निश्चित् झालेलं भवितव्य प्रत्यक्ष ब्रह्मदेवालासुद्धा फिरविता येत नाही, असं म्हणतात. भवितव्याप्रमाणंच भूतकाळहि त्याला बदलता येत नाही. पण आम्ही मानव असे वस्ताद की, इतिहासातली पानं फाडून अगर त्यात नवी

घुसडून नवा सोयीस्कर इतिहास घडवीत असतो; आणि हे सारं बुद्धिवादाच्या नावाखाली खपवून नेतो !

मग उद्या संततिनियमनाच्या प्रचारासाठी कर्व्यांनी गांधारीला पेसरी वापरायला भाग पाडलं, किंवा मिताहाराचं महत्त्व बिंबवण्यासाठी एखाद्या आरोग्यप्रसारक मंडळाच्या सभासदानं बकासुराला राईसप्लेटवर रहायला भाग पाडलं तर त्यांना दोषी कसं समजता येईल ?

संस्कृतीचा जसजसा विकास होत जाईल. तसतसा काव्याचा ऱ्हास होईल अशा अर्थाचं मेकॉलेचं एक विधान साहित्यापुरतं खरं ठरो. पण अश्रद्ध, तर्कदुष्ट विचारसरणीमुळं आम्ही जीवनातल्या 'काव्याला' दिवसेंदिवस पारखे होत चाललो आहोत येवढं खरं !

यामुळंच आम्हाला गायीच्या ठिकाणी असलेली जन्मदात्रीची उपकारिता उमजत नाही. उलट 'गायीला माता मानायचं तर मग म्हशीला मावशी का म्हणू नये ?' असा प्रश्न विचारून आम्ही आपल्या अरसिकतेचं प्रदर्शन करीत असतो !

कालिदासाचा यक्ष मेघासारख्या अचेतन प्रकृतीकडूनहि सहानुभावाची अपेक्षा करून त्याला मोकळ्या मनानं विरहव्यथा सांगू शकतो. पण मेघ म्हणजे 'एच् टू ओ' असा फॉर्म्युलाच तेवढा ठाऊक असणाऱ्यांना त्याच्यातली करुणार्तता कशी उमगणार ?

तिन्ही संध्याकाळी देवापुढचं निरांजन विझल्यावर हळुवार स्त्रीहृदयाला जी अबोध, अनामिक हुरहुर लागते त्यातलं काव्य केवळ पदार्थविज्ञानालाच चिकटून राहिल्यानं कसं अनुभवता येणार ? 'ऑक्सिजनचा फाजील पुरवठा झाला की दिवा विझणारच, त्यात कसली हुरहुर आणि टुरटुर आली ?' असा गद्य शेरा मारण्याकडे मात्र असल्या मंडळींचा कल झुकल्याशिवाय राहणार नाही !

उत्फुल्ल गुलाब पाहताना अज्ञात शक्तीच्या कलात्मकतेचा साक्षात्कार अनुभवण्याऐवजी भौतिकवादी म्हणणार, 'त्यात कसला ईश्वरी साक्षात्कार आलाय ? गुलाबाच्या बुडाशी चांगलं शेणखत घातलं की त्याला अशी टपोरी, सुंदर फुलं येणारच !'

ईश्वराचंच काय पण प्रत्यक्ष जन्मदात्या पितरांचंसुद्धा ऋण अमान्य करण्या-

इतकं कृतघ्न धाष्टर्य असल्या नागड्या बुद्धिवादामुळं मनुष्याच्या ठिकाणी उत्पन्न होऊ शकतं! संतान म्हणजे पितराच्या भोगलालसेला येणारं अनिवार्य फळ अशी एकदा व्याख्या केल्यावर आनृण्यसंपादनाचा प्रश्न उरतोच कुठं?

पिढ्या न् पिढ्या सावकाराचं कर्ज फेडीत बसणारे वऱ्हाडचे लोक खुळे असतील, पण पूर्वजाचं ऋण नाकबूल करणारे हे बुद्धिवादी जीव खलच म्हटले पाहिजेत!

भाबड्या विदुषकाचा प्रवेश झाल्यावर जीवननाट्याला फार तर थिल्लर प्रहसनाची अवकळा येईल; पण खलनायकाचा प्रवेश झाला की याला शोकांतिकेचं स्वरूप येण्याचाच अधिक संभव नाही का?

★

महाराष्ट्र, दिवाळी अंक १९५२

मराठा ग्रंथ ... ठाणे. स्थापना
दि. ...
अनुक्रम ... नों: दि: ...
... ...

## २५. विश्वसुंदरी

गुलाबाची फुलं वेणीत खोवणारांची सौंदर्यदृष्टि किंवा ती फुलदाणीमध्ये ठेवणाऱ्यांची रसिकता मला आक्षेपार्ह वाटत नाही. एवढेच नव्हे तर त्यांपासून अत्तर अगर गुलकंद बनविणाऱ्याचा उपयुक्ततावादहि मला उपक्षेणीय वाटत नाही. पण त्या सुंदर, सुकुमार, सुवासिक सुमनांचं जीवितकार्य एवढ्यापुरतंच मर्यादित असावं असा कुणी दुराग्रह धरू लागला म्हणजे मात्र त्याच्या असमंजसपणाची मला कीव येते, रागहि येतो!

चष्म्याच्या काड्यांना आधार मिळावा म्हणून परमेश्वराने मनुष्याला कान दिले असा एखाद्या ऑप्टिशियननं गैरसमज करून घ्यावा, किंवा पडेल नाट्य-प्रयोगावरला राग व्यक्त करण्याची सोय व्हावी म्हणून कोंबड्या अंडी घालीत असतात असा एखाद्यानं विश्वास बाळगावा, अशापैकीच तो दुराग्रह म्हणावा लागेल!

उत्फुल्ल गुलाबपुष्पांच्या सौंदर्यावर दृष्टि खिळून बसावी, त्याच्या मधुर सौरभानं घ्राणेंद्रियाची तृप्ति व्हावी यात कोणतंच नवल नाही. पण एवढ्यावरच मनुष्यानं संतुष्ट व्हावं असं मात्र मला वाटत नाही. गुलाबच काय, कोणत्याहि फुलाचं जीवनसाफल्य मानवांना केवळ इंद्रियसुख देण्यात सामावलं आहे असा माझा विश्वास नाही.

गाभाऱ्यातल्या देवाच्या मूर्तीवर किंवा एखाद्या सत्पुरुषाच्या समाधीवर वाहिलेल्या फुलांकडे पाहताना मनाला जो एक वेगळाच, उदात्त, विशुद्ध आनंद अनुभवावयास मिळतो तसा तो फुलांना हुंगताना किंवा त्याची शोभा दृष्टि-संपुटात साठविताना मिळत नाही असं मला मनापासून वाटतं! उदात्ततेची

प्रचीति आणून देणारं फुलांतलं हे सामर्थ्य अज्ञानानं म्हणा वा इंद्रियसुखाविषयीच्या आत्यंतिक लालसेमुळं म्हणा, मनुष्याला कळेनासं झालेलं पाहून जसा मला विषाद वाटतो तसा, किंबहुना त्याहून सहस्रपटीनं अधिक आणखी एका गोष्टीमुळं माझ्या मनाला जाणवत असतो.

फुलांप्रमाणंच स्त्रियांच्या बाबतीतहि मनुष्य कळत–नकळत असाच अन्याय करीत आला आहे. फुलांच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याच्या भरात, उदात्ततेचा साक्षात्कार घडविणाऱ्या त्याच्या सामर्थ्याचा आपणाला जसा विसर पडला तसा स्त्रीसौंदर्याच्या दर्शनानं हरखून जाता जाता तिच्या इतर गुणविशेषांचा, तिच्या समर्थ, विशाल व्यक्तिमत्वाचा आम्ही अनादर केला ! स्त्री म्हणजे केवळ उपभोग्य वस्तु एवढीच माफक जाणीव आम्ही तिच्याविषयी मनात बाळगली.

‘ भूत निघाला तव उदरातुन
वर्तमान घे अंकी लोळण
भविष्य पाही मुलि रात्रंदिन
तव हाकेची वाट मनी ! ’

अशा शब्दांत भास्करराव तांब्यांनी ज्या स्त्रीसामर्थ्याचा यथोचित गौरव करून ‘ भयचकित नमावें तुज रमणी ’ असा तिच्याविषयी विनम्र उद्‌गार काढला, तिच्या केवळ शारीरिक सौंदर्याचीच आम्हाला परवड वाटावी हा केवढा दैवदुर्विलास म्हणायचा ! शिवरायांनी सुभेदाराच्या सुनेच्या सौंदर्याचं मूल्यमापन ज्या मूल्यांनी केलं त्याचा आठव आम्हाला होऊ नये या करंटेपणाला काय म्हणावं ? प्रेयसीच्या आग्रहाखातर स्वतःच्या जन्मदात्या मातेचं काळीज कापून, ते आपल्या हातात घेऊन तिला दाखवायला निघालेल्या एका विषयलंपट पुरुषाची गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे का ? धावता धावता तो विषयांध मनुष्य वाटेत एका दगडाला ठेच लागून खाली पडला, तेव्हा त्याच्या हातातल्या काळजाच्या तुकड्यानं कळवळून आपल्या मुलाला विचारलं म्हणतात, “ बाळ, लागलं का रे तुला कुठं ? ”

लोकविलक्षण वाटणाऱ्या या कथित मातृहृदयाची जी असाधारण महनीयता सूचित झाली आहे, तिच्या वात्सल्यपूर्ण अंतर्विश्वाचा जो मनोज्ञ आविष्कार झाला आहे तो वास्तवाला धरून नाही असं कोण म्हणेल ?

वात्सल्य, सोशिकपणा, त्याग, संयम, निष्ठा इत्यादि गुणांनी मंडित झालेल्या

स्त्री जीवनाची केवळ भोगमय बाजूच तेवढी आम्हाला विलोभनीय वाटावी या आमच्या शवल, दूषित दृष्टिकोनाबद्दल आम्हाला कुणीच जाब विचारणार नाही का? सीतेच्या सौंदर्याची अभिलाषा धरणाऱ्या लंकापतीचा प्रभु रामचंद्रानं निःपात केला, सैरंध्रीला शीलभ्रष्ट करू पाहणाऱ्या दुर्मति कीचकाला भीमानं यमसदनाला पाठविलं, याच कारणानं त्यानं दुर्योधनाची मांडी गदाप्रहारानं विदीर्ण करून त्याचीहि तीच गत करून टाकली! पण स्त्री जातीच्या सौंदर्याचे अन् शीलाचे हवे तसे वाभाडे काढणाऱ्या आजच्या कविलेखकांना, चित्रकारांना, संपादकांना अन् चित्रपटनिर्मात्यांना मात्र शासन करणारी एकहि शक्ति, पुढे सरसावू नये याचं मला राहून राहून वैषम्य वाटतं!

कुणी भावा-वहिणीच्या संभोगाचं निर्लज्ज वर्णन करावं, कुणी कुलटेच्या व्यभिचाराचं दृश्य रंगवून वाचकांच्या अगर प्रेक्षकांच्या वासना चाळवाव्यात, कुणी बलात्काराचे प्रसंग चित्रित करून वखवखलेल्या कामुकतेचं हिडीस प्रदर्शन करावं...आणि हा सारा बीभत्स, ओंगळ प्रकार कलाविलासाच्या, वास्तवतेच्या अन् पुरोगामित्वाच्या नावाखाली आम्ही खपवून न्यावा— आमच्यातली माणुसकी ठार झाल्याचा यापेक्षा दुसरा सबळ पुरावा सापडू शकेल काय?

संभोग, बलात्कार, व्यभिचार हेच स्त्री-जीवनाचे ठळक विशेष आहेत असा आजच्या साहित्यावरून अन् चित्रपटांवरून आम्ही बोध घ्यायचा का? मांगल्याचं, पावित्र्याचं, त्यागाचं नि सहिष्णुतेचं प्रतीक म्हणून पुराणकारांनी, इतिहासकारांनी नि महाकवींनी ज्या स्त्री-जातीचा आदरानं उल्लेख केला तिच्याविषयी असा विकृत दृष्टिकोन बाळगण्यात आम्ही पुरुषार्थ मानावा ना? अहिल्या, सीतादि साध्वींची ज्वलंत पतिनिष्ठा, गार्गीमैत्रेयांची अगाध विद्वत्ता, जिजामातेचा देशाभिमान, झाशीच्या राणीचा पराक्रम, मीराबाईची कृष्णभक्ति... हे सारे गुणविशेष आम्हाला स्त्री-जातीपुढे नतमस्तक होऊन आदराने प्रणाम करायला लावीत नाहीत काय? नैतिक मूल्यांची फारशी कदर न करणाऱ्या, भोगप्रवण पाश्चात्य राष्ट्रांतल्या विचारवंतांनीहि स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाचे उज्ज्वल पैलू दुर्लक्षित केले नाहीत, ही वस्तुस्थिति लक्षात घेतली म्हणजे आमचा स्वैरपणा विशेषच लज्जास्पद वाटू लागतो. वॉल्टर स्कॉट, डिकन्स, ठॅकरे, ब्लॅकमूर, स्टिव्हनसन, शेले, टेनिसन, वर्डस्वर्थ इत्यादि शेकडो कवींनी व लेखकांनी मुक्तकंठानं स्त्रियांची महती वर्णिली आहे ' व्हेअर वुमन इज्ञ्, नो होम बट् हॅथ

ए श्राइन' असा मार्टिन स्विफ्ट या कवीनं सार्थ उद्गार काढला आहे. ऑटवे नावाच्या दुसऱ्या एका कवीनं स्त्रियांच्या सामर्थ्याची, सद्गुणाची नि सौंदर्याची प्रशंसा करताना अशाच समर्पक काव्यपंक्ती रचल्या आहेत. तो म्हणतो--

ओ वुमन! ल्व्हली वुमन! नेचर मेड दी!
टू टेम्पर मॅन, वुई हॅड बीन ब्रूट्स विदाऊट यू!
एन्जल्स आर पेण्टेड फेअर टू लुक् लाईक यू
देअर इज इन् यू ऑल दॅट वुई बिलीव्ह ऑफ हेवन
अमेझिंग ब्राईटनेस, प्युरिटी ॲन्ड ट्रूथ
इटर्नल जॉय, ॲन्ड एव्हरलास्टिंग ल्व्ह!

पण या काव्यपंक्तीतला उदात्त आशय ध्यानात घेण्याइतका समंजसपणा आज उरलायच कुठं आमच्या ठिकाणी?

पाश्चात्य राष्ट्रांत उपटलेल्या 'विश्वसुंदरी' स्पर्धेच्या खुळाचं मनोभावानं कोड-कौतुक करण्यात दंग झालो आहोत तुम्ही आम्ही सारेजण! शरीरसौष्ठ-त्वाच्या निकषावर 'विश्वसुन्दरीची' निवड करण्याची कल्पना तिकडच्या देशा-तल्या कुणातरी भोगवादी महाभागाच्या डोक्यात प्रथम शिरली आणि इतरांनी त्याची री ओढली! आश्चर्य हे की आमच्या ललनांनीहि या कल्पनेचं मनापासून स्वागत केलं! हिप्नॉटिझमनं प्रभावित झालेला मनुष्य त्या विद्येचा प्रयोग करणाऱ्याच्या सर्वस्वी आधीन होऊन त्याच्या इच्छेनुसार बोलतो, चालतो, त्याला स्वतःचं म्हणून वेगळं अस्तित्व उरत नाही, अशीच आजच्या महिलांचीहि स्थिति झाली आहे. भोगापलीकडे स्त्रीजीवनाला दुसरा हेतु नाही हा आधुनिक पुरुषांनी मंत्र उच्चारताच स्त्रियांनीहि भक्तिभावानं त्याचा उच्चार केला आणि तो आचरणात आणण्यासाठी त्या धडपड करू लागल्या.

माझा एक विनोदी मित्र म्हणत असतो, 'वर्गात पाऊल टाकण्यापूर्वी आजच्या गुरुमाऊली चॉकस्टिकबरोबर घेतला आहे की नाही हे पाहण्यापेक्षा लिपस्टिक बरोबर लागली आहे की नाही याचीच अधिक काळजी घेत असतात. लेखनकलेचं व्रत अंगिकारणाऱ्या स्त्रिया, समाजाऐवजी आपल्या केसांना वळण लावण्याच्या बाबतीत दक्षता घेतलेल्या दृष्टोत्पत्तीस येतात, आणि डॉक्टरीणबाई बोरिक पावडरपेक्षा फेसपावडरच्या गुणधर्माची चिकित्सा करण्यात गढून गेलेल्या असतात!"

माझ्या त्या मित्राच्या टीकेतला मिस्किलपणाचा भाग सोडून दिला, तरी त्यात अनुस्यूत असलेलं विदारक सत्य आम्हाला विचारात घ्यावंच लागेल. पाश्चात्यांचं ऊठसूट अंधानुकरण करण्याच्या हव्यासापायी आम्ही स्वतःचं हसं मात्र करून घेत आहोत.

तसं पाहता ' विश्वसुंदरी 'ची कल्पना युरोप–अमेरिकेतील लोकांनाच सुचली आहे अशातला भाग नाही. आमच्या पुराणकारांच्या उन्मेषशाली प्रतिभेला हजारो वर्षांपूर्वी ही कल्पना स्फुरली असल्याची प्राचीन साहित्यातून साक्ष मिळते. पण त्या विश्वसुंदरीत अन् आजच्या विश्वसुंदरीत काडीचंहि साम्य नाही. आमच्या पुराणकारांनी विश्वसुंदरी निर्माण केली ती शुंभनिशुंभा-सारख्या नि महिषासुरासारख्या उन्मत्त दैत्यांचा निःपात करणारी, उद्धटांच्या अंतःकरणात धडकी भरेल अशी उग्र मुद्रा धारण करणारी, हातात तळपती तलवार घेऊन व्याघ्रावर आरूढ होणारी, गळ्यात नररुंडमाला घालून साक्षात् काळालाहि चळचळा कापायला लावणारी ! आदिमाया, जगदंबा, भवानी, कालिका, दुर्गा, महालक्ष्मी अशी वेगवेगळ्या युगांत वेगवेगळी नावं नि रूपं धारण करून समस्त नृशंसांचा संहार करणारी, निर्दाळण करणारी, दुरात्म्याचं निर्दाळ करायला उद्युक्त होणारी शक्ति पुराणकारांनी रंगविली तशीच उग्र, भीषण, विक्राळ असणं स्वाभाविक नाही काय ? या शक्तीचं सोज्वळ, सौम्य, सौंदर्यपूर्ण स्वरूप त्या प्रज्ञावंतांनी रेखाटलं ते हंसाधिष्ठित, वीणाधारी भगवती सरस्वतीच्या रूपानं. कालिकेच्या रूपानं त्यांनी मूर्तिमंत रौद्राचा साक्षात्कार घडविला, तर शारदेच्या चित्रणातून महन्मंगलाचं दर्शन घडविलं.

विश्वधारणेसाठी या दोन्ही गुणांची आवश्यकता असल्याचं पटवून देणारी कुठं प्राचीन मेधावीची चातुरी अन् कुठं स्त्रियांच्या सौंदर्याचा उघड्यावर लिलाव पुकारणाऱ्या आधुनिक ( अव ) कलावंताची पुचाट बनियेगिरी !

सौंदर्यप्रसाधान, अत्तर नाहीतर गुलकंद यासाठीच गुलाबाचा जन्म असल्याचा विश्वास बाळगणारे भोगात्मे एकपट अपराधी असतील तर भोगापलीकडे स्त्री-जीवनाला दुसरा हेतु नाही असं सांगणारे महाभाग अनंत पटीनं गुन्हेगार आहेत असं नाही तुम्हाला वाटत !

★

बलवंत, दिवाळी अंक १९६४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८३६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

ए श्राइन' असा मार्टिन स्विफ्ट या कवीनं सार्थ उद्गार काढला आहे. ऑटवे नावाच्या दुसऱ्या एका कवीनं स्त्रियांच्या सामर्थ्याची, सद्गुणाची नि सौंदर्याची प्रशंसा करताना अशाच समर्पक काव्यपंक्ती रचल्या आहेत. तो म्हणतो--

ओ वुमन ! ल्व्हली वुमन ! नेचर मेड दी !
टू टेम्पर मॅन, वुई हॅड बीन ब्रूट्स विदाऊट यू !
एन्जल्स आर पेण्टेड फेअर टू लुक् लाईक यू
देअर इज इन् यू ऑल दॅट वुई बिलीव्ह ऑफ हेवन
अमेझिंग ब्राईटनेस, प्युरिटी अॅन्ड ट्रूथ
इटर्नल जॉय, अॅन्ड एव्हरलास्टिंग लव्ह !

पण या काव्यपंक्तीतला उदात्त आशय ध्यानात घेण्याइतका समंजसपणा आज उरलायच कुठं आमच्या ठिकाणी ?

पाश्चात्य राष्ट्रांत उपटलेल्या 'विश्वसुंदरी' स्पर्धेच्या खुळाचं मनोभावानं कोड–कौतुक करण्यात दंग झालो आहोत तुम्ही आम्ही सारेजण ! शरीरसौष्ठ-त्वाच्या निकषावर 'विश्वसुन्दरीची' निवड करण्याची कल्पना तिकडच्या देशा-तल्या कुणातरी भोगवादी महाभागाच्या डोक्यात प्रथम शिरली आणि इतरांनी त्याची री ओढली ! आश्चर्य हे की आमच्या ललनांनीहि या कल्पनेचं मनापासून स्वागत केलं ! हिप्नॉटिझमनं प्रभावित झालेला मनुष्य त्या विद्येचा प्रयोग करणाऱ्याच्या सर्वस्वी आधीन होऊन त्याच्या इच्छेनुसार बोलतो, चालतो, त्याला स्वतःचं म्हणून वेगळं अस्तित्व उरत नाही, अशीच आजच्या महिलांचीहि स्थिति झाली आहे. भोगापलीकडे स्त्रीजीवनाला दुसरा हेतु नाही हा आधुनिक पुरुषांनी मंत्र उच्चारताच स्त्रियांनीहि भक्तिभावानं त्याचा उच्चार केला आणि तो आचरणात आणण्यासाठी त्या धडपड करू लागल्या.

माझा एक विनोदी मित्र म्हणत असतो, 'वर्गात पाऊल टाकण्यापूर्वी आजच्या गुरुमाऊली चॉकस्टिकबरोबर घेतला आहे की नाही हे पाहण्यापेक्षा लिपस्टिक बरोबर लागली आहे की नाही याचीच अधिक काळजी घेत असतात. लेखनकलेचं व्रत अंगिकारणाऱ्या स्त्रिया, समाजाऐवजी आपल्या केसांना वळण लावण्याच्या बाबतीत दक्षता घेतलेल्या दृष्टोत्पत्तीस येतात, आणि डॉक्टरीणबाई बोरिक पावडरपेक्षा फेसपावडरच्या गुणधर्माची चिकित्सा करण्यात गढून गेलेल्या असतात !''

माझ्या त्या मित्राच्या टीकेतला मिस्किलपणाचा भाग सोडून दिला, तरी त्यात अनुस्यूत असलेलं विदारक सत्य आम्हाला विचारात घ्यावंच लागेल. पाश्चात्यांचं ऊठसूट अंधानुकरण करण्याच्या हव्यासापायी आम्ही स्वतःचं हसं मात्र करून घेत आहोत.

तसं पाहता ‘ विश्वसुंदरी ’ची कल्पना युरोप–अमेरिकेतील लोकांनाच सुचली आहे अशातला भाग नाही. आमच्या पुराणकारांच्या उन्मेषशाली प्रतिभेला हजारो वर्षांपूर्वी ही कल्पना स्फुरली असल्याची प्राचीन साहित्यातून साक्ष मिळते. पण त्या विश्वसुंदरीत अन् आजच्या विश्वसुंदरीत काडीचंहि साम्य नाही. आमच्या पुराणकारांनी विश्वसुंदरी निर्माण केली ती शुंभनिशुंभा-सारख्या नि महिषासुरासारख्या उन्मत्त दैत्यांचा निःपात करणारी, उद्धटांच्या अंतःकरणात धडकी भरेल अशी उग्र मुद्रा धारण करणारी, हातात तळपती तलवार घेऊन व्याघ्रावर आरूढ होणारी, गळ्यात नररुंडमाला घालून साक्षात् काळालाहि चळचळा कापायला लावणारी ! आदिमाया, जगदंबा, भवानी, कालिका, दुर्गा, महालक्ष्मी अशी वेगवेगळ्या युगांत वेगवेगळी नावं नि रूपं धारण करून समस्त नृशंसांचा संहार करणारी, निर्दाळण करणारी, दुरात्म्याचं निर्दाळ करायला उद्युक्त होणारी शक्ति पुराणकारांनी रंगविली तशीच उग्र, भीषण, विक्राळ असणं स्वाभाविक नाही काय ? या शक्तीचं सोज्वळ, सौम्य, सौंदर्यपूर्ण स्वरूप त्या प्रज्ञावंतांनी रेखाटलं ते हंसाधिष्ठित, वीणाधारी भगवती सरस्वतीच्या रूपानं. कालिकेच्या रूपानं त्यांनी मूर्तिमंत रौद्राचा साक्षात्कार घडविला, तर शारदेच्या चित्रणातून महन्मंगलाचं दर्शन घडविलं.

विश्वधारणेसाठी या दोन्ही गुणांची आवश्यकता असल्याचं पटवून देणारी कुठं प्राचीन मेधावीची चातुरी अन् कुठं स्त्रियांच्या सौंदर्याचा उघड्यावर लिलाव पुकारणाऱ्या आधुनिक ( अव ) कलावंताची पुचाट बनियेगिरी !

सौंदर्यप्रसाधान, अत्तर नाहीतर गुलकंद यासाठीच गुलाबाचा जन्म असल्याचा विश्वास बाळगणारे भोगात्मे एकपट अपराधी असतील तर भोगापलीकडे स्त्री-जीवनाला दुसरा हेतु नाही असं सांगणारे महाभाग अनंत पटीनं गुन्हेगार आहेत असं नाही तुम्हाला वाटत !

★

बलवंत, दिवाळी अंक १९६४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८३६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## श्री. बाळशंकर देशपांडे यांचे वाङ्मय

प्रकाशित

* ★ श्रावणातल्या विजा ( कथासंग्रह ) ★ यमुनाजळी (कथा व ललित निबंध) दुसरी आवृति( आग्रा विद्यापीठाने बी. ए. च्या अभ्यासक्रमात समाविष्ट केलेला )
* ★ माझे जग (स्व. सा. कादंबरी) ★ शोभेचे सौभाग्य ( लघुकथा व ललित निबंध )
* ★ शिव्या आणि ओव्या ( लघुनिबंध )
* ★ तांडव आणि लास्य ( लघुकथा व लघुनिबंध )
* ★ वऱ्हाडी कणसे ( लघुनिबंध ) ★ रसरंग ( कवितासंग्रह )
* ★ विद्यार्थी मित्रहो ( ललितलेख व परीक्षणे )
* ★ स्वातंत्र्यवीर सावरकर ( व्यक्ति व वाङ्मय )
* ★ माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास
* ★ शब्दसृष्टीचे ईश्वर ( संतवाङ्मय समीक्षा )
* ★ दक्षिणद्वार देवगिरी ( सांकृतिक दर्शन )
* ★ " परस्या वैजनाथंच: " ( सांस्कृतिक दर्शन )
* ★ ललित लेखनाचे तंत्र ( विवेचक प्रबंध )
* ★ मराठीचे मानकरी ( व्यक्ति व वाङ्मय )
* ★ माणसे, तत्त्वे आणि वहाणा ( विनोदप्रचुर ललितनिबंध )

आगामी

* ★ कल्पद्रुमांच्या प्रदेशात ( प्रवासवर्णन )
* ★ नमस्कार माझा तया–(विनोदी लेख ) ★ गडकऱ्यांचे टीकाकार
* ★ मराठीचे मानकरी ( भाग २ रा ) ★ नाट्यलेखनाचे तंत्र ( प्रबंध )
* ★ सागराच्या सीमा (स्व. सा. कादंबरी) ★ अग अग म्हशी ( विनोदी नाटक )
* ★ ढगाआडचा चंद्र ( स्व. सा. कादंबरी )
* ★ हॉलकेनच्या कादंबऱ्या (प्रबंध) ★ कादंबरीलेखनाचे तंत्र ( प्रबंध )
* ★ पाश्चात्यांचा प्रतिभाविलास ( व्यक्ति व वाङ्मय )
* ★ मराठी वाङ्मयातील विनोद ( श्री. कृ. कोल्हटकर ते पु. ल. देशपांडे )

REFBK-0014368